# १अ

## शहरीकरण, महानगरीकरण प्रक्रिया व महानगरीय संस्कृती (समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून)

**घटक रचना :**


१.अ.१ उद्दिष्ट्ये

१.अ.१ प्रास्ताविक

१.अ.२ विषय विवेचन

१.अ.३.१.शहरीकरण- संकल्पना व स्वरूप

१.अ.३.२ महानगरीकरणाची प्रक्रिया

१.अ.३.३ महानगर :तात्विक विचार

१.अ.३.४ नागर, अनागर व महानगर या संकल्पना

१.अ.३.५. महानगरीय संस्कृती: समाजवास्तव व स्वरूप वैशिष्ट्ये

१.अ.४. सारांश

१.अ.५ सरावासाठी स्वाध्याय/नमुना प्रश्न

१.अ.६ पूरक अध्ययन/ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.अ.१. उद्दिष्टे

- स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तरकाळात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक स्वरूपात झालेले बदल व त्याच्या प्रभावातून निर्माण झालेल्या महानगरीय साहित्याचा अभ्यास करणे.
- दोन महायुद्धांच्या दरम्यान भारतीय समाज जीवनात जे अमुलाग्र परिवर्तन झाले, त्याचे स्वरूप समजावून घेणे.
- सर्वच क्षेत्रावर त्यातही कला व साहित्यावर त्याचा पडलेला प्रभाव व झालेले दूरगामी परिणाम याचा शोध घेणे.
- खेड्यापाड्यातील समाजनोकरी - व्यवसायाच्या हेतूने मोठ्या शहरांकडे स्थलांतरित झाला त्यातून शहरीकरणाची जी प्रक्रिया सुरु झाली त्याचे स्वरूप समजून घेणे.
- शहरीकरणाचा मानवी जीवनावर झालेले परिणाम त्या प्रभावातून निर्माण झालेली महानगरीकरणाची प्रक्रिया सामाजिक दृष्टीने समजावून घेणे.

munotes.in

- औद्योगिकीकरण, भौतिक विकास, आधुनिकीकरण, बदलती शहरीसंस्कृती, धावपळ याचा मानवी जगण्यावर झालेला परिणाम लक्षात घेणे.
- या बदलत्या महानगरीय संस्कृतीची, समाज वास्तवाची स्वरूप वैशिष्ट्ये वत्यातून निर्माण झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण साहित्याचा अभ्यास करणे.

## १.अ.२. प्रास्ताविक

दोन महायुद्धांच्या दरम्यानचा स्वातंत्र्यपूर्व आणि त्यानंतरचा स्वातंत्र्योत्तरकाळ हासामाजिक-सांस्कृतिकदृष्टया परिवर्तनशील काळ आहे. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाल्याने सर्वच क्षेत्रात महत्वपूर्ण बदल घडले. कापडउद्योग, कारखानदारी, चित्रपटनिर्मिती, शिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यकीय इ.क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडत गेले. खेड्यापाड्यातील लोक नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने मोठ्या शहरांकडे स्थलांतरित होऊन त्यातून शहरे वेगाने विकसित होत गेली. त्यातूनच मोठीमहानगरे निर्माण झाली. स्पर्धा, श्रमविभागणी यामुळे महानगरीय समाजजीवनाची एक जीवनशैली आकाराला आलेली दिसते. सांस्कृतिकविश्व, मानवी संबंध, गर्दी, गतिमानता, एकटेपणा महानगरात गजबजलेल्या गर्दीतही माणूस एकटा जाणवतो.महानगरातला जीवनसंघर्ष, कामगारविश्व, मध्यमवर्गीयांचे भावविश्व, जीवघेणीस्पर्धा, स्त्रियांचे दुःखवव्यथा- हे सर्व बदल शहरीकरणाच्या प्रक्रियेत घडतगेलेले दिसतात.

शहरीकरणाची ही जी प्रक्रिया सुरु झाली त्याचे स्वरूप समजून घेणे गरजेचे ठरते. शहरीकरणाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम, त्या प्रभावातून निर्माण झालेली महानगरीकरणाची प्रक्रिया सामाजिक दृष्टीने समजावून घेणे आवश्यक आहे. वाढत्या औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत शहरे निर्माण झाली व नंतर त्यांचीच महानगरे बनली. महानगरात जीवन जगणारा माणूस व त्याच्या आशा-आकांक्षा, जगण्यातली धावपळयाची संगती लावण्याचा प्रयत्न महानगरीय जाणिवेच्या साहित्यातून सर्जनशील लेखक-लेखिकांनी केलेला दिसतो. भिन्न-भिन्न भारतीय भाषेतून व विविध साहित्य प्रकारातून हा महानगरीय जाणिवांचा आविष्कार घडलेला आहे. मराठी साहित्यातील समकालीन साहित्यप्रवाह व प्रकारांमधून या प्रश्नांचा, जाणिवांचा व वास्तवाचा आविष्कार कसा घडतो आहे, हे अभ्यासाने गरजेचे ठरते.साहित्यकृतीत कोणत्या प्रकारचे अनुभवविश्व असले म्हणजे त्या अनुभवविश्वाचे वर्णन, मूल्यमापन 'महानगरी साहित्य' असे करता येईल हा विचार करणे आवश्यक ठरेल.

## १.अ.३. विषय विवेचन

### १.अ.३.१. शहरीकरण- संकल्पना व स्वरूप

शहरीकरण म्हणजे शहराच्या लोकसंख्येची व त्याच्या क्षेत्राची होणारी वाढ होय. खेड्याकडून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर यांचासुद्धा शहरीकरणात समावेश होतो. देशाच्या विकासाच्या दृष्टीने शहरीकरणसुद्धा आवश्यकआहे. शहरीकरणाला चांगली बाजूही आहे पण विकासाबरोबरच शहरीकरणाची दुसरी बाजूसुद्धा ठळकपणे दिसून येते.

शहरीकरणाचा परिणाम पर्यावरणावरही मोठय़ा प्रमाणावर होत असतो. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार, त्यातून उदयाला आलेला नवमध्यमवर्ग, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन, अस्तित्वासाठी चाललेली जीवघेणी स्पर्धा,तडजोड या सर्वांमधून अनेक प्रश्न निर्माण झाले. एकविसाव्या शतकात शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे, विशेषतः आशिया, आफ्रिका खंडांत, शहरीकरणाचा वेग अभूतपूर्व वाढत जाईल.भारतात देखील शहरीकरणाचा वेग आशियातील सर्वाधिक वाढीच्या बरोबरीचा आहे. राज्यात १० लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली अनेक शहरे आहेत आणि ती भारतातील इतर कुठल्याही राज्यापेक्षा सर्वाधिक आहेत. गेल्या काही वर्षात भारतात शहरीकरणाचा वेग लक्षणीय वाढलेला दिसतो.

शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चालकशक्ती असल्याचे मानले जाते. शहरीकरण वाढीच्या प्रक्रियेत स्थलांतर ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. जगाच्या बहुतेक विकसनशील देशांमधे शहरी वाढीचा दर तुलनेने उच्च आहे. शहरातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित असणे, अस्वच्छता, अतिप्रमाणातील झोपडपट्ट्या आणि अनधिकृत वसाहतीं यामुळे अनेक प्रकारची रोगराई वेगाने पसरते.असुरक्षिता, कचरा विल्हेवाट ही शहरी क्षेत्रातील एक गंभीर समस्या आहे आणि कचरा व्यवस्थापन तर एक कायम मोठे आव्हान आहे.

शिक्षण आणि आरोग्य हे मानवी विकासाचे महत्त्वाचे संकेतक मानले गेले आहेत. शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही बाबतीत ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी वस्त्यांमधील आरोग्य स्थिती जास्तच प्रतिकूल असते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था दिवसेंदिवस संकुचित होत चालल्या आहेत आणि नागरिकांना अधिकाधिक खासगी आरोग्य सेवांवर अवलंबून राहावे लागत आहे. शिक्षणाची देखील अशीच स्थिती आहे. सरकारी शिक्षण व्यवस्थेचे देखील असेच संकुचन होत चालले आहे. त्यामुळे लोकांना खाजगी शिक्षण संस्थांवर आवलंबून राहावे लागत आहे. मर्यादित जागा आणि उच्च शुल्क आकारणी यांना तोंड द्यावे लागते आहे.शहरातील सार्वजनिक वाहतूक,पर्यावरण संतूलनबिघडणे, मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्ती ओढवून धोकादायक परिस्थिती आणि जोखीम निर्माण होते आहे. घनतेमुळे आणि प्रचंड संख्येने शहरी भागात हे धोके जास्त दिसतात. शहरी भागात उष्णतेचे प्रमाण वाढते आहे. भूजल पुनर्भरण सोपे नसते आणि जलसंपत्ती आपोआप वाढत नाही. शहरी गुन्हेगारी हे देखील एक मोठे आव्हान आहे. थोडक्यात, वाढत्या शहरीकरणाबरोबर दाट लोकवस्त्या, अपुऱ्या पायाभूत व्यवस्था, परवडणारी घरे, पूर, पर्यावरण, झोपडपट्ट्या, गुन्हेगारी, दाटीवाटी आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न तयार होतात.

### १.अ.३.२ महानगरीकरणाची प्रक्रिया

महानगरीय जीवनशैली ग्रामीण व नागरी जीवनव्यवस्थेपेक्षा अनेक बाबतीत वेगळी असते. शिवाय गेल्या पन्नास वर्षात नगरांचा मोठ्या वेगाने विकास झाला असून त्यांचे रूपांतर महानगरात झाले. या काळात भारताने अर्थव्यवस्थेच्या संदर्भात जे निर्णय घेतले,त्यात बदल घडवून आणले त्याचे दृश्य परिणाम नजीकच्या काळात जनमानसात दिसू लागले. याच कालखंडात शैक्षणिक संस्था, बांधकाम व्यवसाय, आदी अमाप आर्थिक फायदा देणाऱ्या व्यवसायात राजकारण्यांनी मोठ्या संख्येने प्रवेश केला. त्यामुळे त्यांच्या आर्थिक हितसंबंधांची गणिते जुळवितांना दारिद्र्य रेषेखालील समाजासोबत कनिष्ठ व मध्यमवर्गीय

माणूस मात्र भरडला जाऊ लागला. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेचा तो कणा आहे. त्यामुळे तेथे घडणाऱ्या घटना- घडामोडींचा जीवन जाणिवांचा विचार कथा साहित्यातून केला जाणे अपेक्षित आहेत.

महानगरीय जीवन वास्तव अनेक बाबतीत बदलत गेले. समाजजीवनाची अनेक रूपे व अनेक स्तरीय लोकसमूह हे महानगराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. उद्योग व्यापाराचे केंद्र महानगर असल्याने तेथे सत्तास्पर्धा, डावपेज, राजकारण, पैशाला आलेले प्रचंड महत्त्व हे दिसते. शिवाय महानगरीय जीवन हे गतिमान असून सततची धावपळ, मानसिक दडपण, ताण- तणाव, मूल्यांचा ऱ्हास, नात्यांतील दुरावा, परात्मभाव, स्पर्धा ही महानगरीय जीवनाची वैशिष्ट्ये दिसतात. बेसुमार पद्धतीने वाढणारी झोपडपट्टी, गर्दीत राहणारा महानगरातला मोठा समूह आणि त्याचा एकूणच मानवी जीवनावर होणारा परिणाम ही आशयसूत्रे कथेतून आली आहेत. महानगरांचे हे बदलते स्वरूप आणि तेथील जीवनसंघर्ष या काळातील कथालेखानातून नेमक्या स्वरुपात व्यक्त होतो.

१९९० नंतर मुक्त अर्थव्यवस्थेमुळे जागतिकीकरणाची लाट आली. महानगरांवर त्याचा परिणाम सुरवातीला दिसू लागला. हळूहळू मोठी शहरे, गाव, खेडी येथपर्यंत त्याचे लोन पोहचले. एकूणच भारतीय समाजजीवनावर त्याचा बरा-वाईट परिणाम झालेला दिसतो. विशेषत: महानगरातील जीवन अधिक धावपळीचे, धकाधकीचे बनले. रोजगाराच्या निमित्ताने खेड्यातून शहरांकडे येणाऱ्यांचा ओघ वाढला. प्रचंड गर्दी, ताणतणाव स्पर्धा असुरक्षितता यामुळे रोजच्या जगण्यातील गुंतागुंत वाढली. संघर्ष हे येथील जीवनाची सूत्रच झाले. मूल्यव्यवस्था ढासळत गेली. पैशाला नको इतके महत्व आले. जगण्याच्या या स्पर्धेत टिकण्यासाठी हे वास्तव स्वीकारणे अप्रत्यक्षरित्या बंधनकारकच झाले. शहरे-महानगरे वेगाने बदलली. महानगर हीएक तुकड्या-तुकड्यांनी एकत्र आलेली व्यवस्था असते. छोटे-छोटे अवकाश तेथे निर्माण झालेले असतात. गिरण्या,चाळी, हॉटेल, मॉल, पोलीसस्टेशन, बाजारपेठा, बँका, कार्यालये, बार, वेश्यागृहे असे अवकाश महानगराच्या केंद्रस्थानी असतात.

महानगरीय जगण्याची भिन्न-भिन्न रूपे व तेथील अनेक स्तर महानगरीय जीवनाला वेगळेपणा प्राप्त करून देतात.गतिमानता, उद्योगव्यापाराचेकेंद्र बेसुमार वाढणारी सत्तास्पर्धा, डावपेच, राजकारण नोकरी- व्यवसायाच्या उपलब्ध असणाऱ्या संधी, त्यामुळे महानगरांकडे लोकांचा असणारा ओढा, परिणामी जागेचे व राहण्याचे निर्माण होणारे प्रश्न येथे असतात. माणसांची प्रचंड गर्दी हे महानगराचे वैशिष्ट्य होय. एवढ्या गर्दीतही माणूस मात्र एकटाच असल्यासारखे राहतो. हा एकटेपणा ग्रामीण जीवनात फारसा जाणवत नाही पण मुंबईसारख्या महानगरात मात्र प्रचंड गर्दीतही आपण एकटेच असल्याची जाणीव होते. महानगरातील गर्दीचे, यातील गतिमानतेची व धावपळीचे चित्रण साहित्यातून व्यक्त होते. महानगरात घडणाऱ्या हिंसेलाही जात, धर्म, स्वार्थ, सत्ता, संपत्ती या गोष्टींचे संदर्भ चिकटलेले असतात. माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तीत जाणवणारे क्रूरदर्शन या वर्तनातून घडते.

### १.अ.३.३ महानगर : तात्विक विचार-

नागर, अनागर व महानगर या तिनहीभूसांस्कृतिक वैशिष्टये असलेल्या लोकसमूहाचे आणि जीवनशैलीचे वर्णन करणा-या संकल्पनाआहेत. त्यातील 'महानगर' ही संकल्पना आधुनिक काळातील असली तरी 'नागर' व 'अनागर'या प्राचीनकाळापासूनच परिचित व रूढ असलेल्या संज्ञा आहेत. 'नागर' ही संकल्पनापाश्चात्य जगातील प्रबोधनामुळे तसेच वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्रांती यामुळे अधिक वेगाने रूढ झाली.अत्यंत झपाटयाने, वेगाने मानवी वसाहतीनगरांमध्ये/महानगरात उभ्या राहिल्या. त्याचा परिणाम समाजव्यवस्थेवर, मानवी जीवनावरवेगाने होत गेलेला दिसतो.अनागरी समाजव्यवस्था ही थोडीशी अविकसित, तंत्रज्ञानाचा वऔद्योगिकीकरणाचा अभाव असलेली दिसते, उलट नागरी जीवनात या सर्वच गोष्टी स्पष्टपणे दिसतात.परंपरा, भाषा, जीवनव्यवस्था, रूढी-रितीरिवाज यात येथे परस्पर भिन्नता जाणवते.

'महानगर' ही संज्ञा मुंबईसाठी वापरली जातहोती, पण आता मुंबई पाठोपाठ पुणे, नाशिक, नागपूर या शहरांचा विकासही महानगरांच्याचदिशेने होतो आहे. महानगर हे उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, राजकारण, अर्थकारण याचेकेंद्र असते. शहरीकरणाचा वेग आणि शहरीकरणाचे प्रमाण वाढत जाऊन या महानगरातील व्यामिश्रगुंतागुंत दिवसेंदिवस वाढत गेली. शिवाय 'महानगर' या संज्ञेत समाजव्यवस्थेची विविध रूपेअंतर्भूत असतात. नगरांची बेसुमार वाढ होऊन महानगरे निर्माण झाली. जेथे अनेक समस्यांचा जन्म झाला. त्यातूनअनेक विकृती आल्या. जगण्यासाठीचा संघर्ष वाढत गेला. भौतिक जीवनाची लालसा व स्पर्धा वाढत गेली. प्रचंड वेग, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय परिवर्तने होत गेली. गुदमरून टाकणारे सामाजिकव सांस्कृतिक पर्यावरण, बदलते सामाजिक संकेत, मूल्यकल्पना याला कवेत घेणारी अशी महानगरही संकल्पना आहे.

भिन्न- भिन्न संस्कृती, नगर- उपनगरात वास्तव्य करणारी सर्व माणसे, औद्योगिक संस्कृती उच्चभ्रूंचे सुखलोलुप उद्योग- व्यवहार, उलाढाली, चळवळी, नेतेगिरी, राजकारण अशा अनेक संदर्भांचे तपशील महानगरात दिसतात. जागेचा भिडणारा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रचंड गर्दी, चोऱ्या, खून, दहशत, गुंडगिरी, जुगार,शअड्डे, तस्करी दहशतवाद भय अशा नानाविध समस्या महानगरांमध्ये आहेत. एका बाजूला सुशिक्षित, सुख वस्तू मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय यांचे जगणे, त्यातील दुःख-आनंदाचे क्षण हारजीत, जीवनसंघर्ष व विचारसरणी आहेतर दुसऱ्याबाजूला रस्त्यावर, झोपडपट्टीतून अशाच इतर वस्त्यांमधून राहणारी माणसे आणि त्यांची जगण्याची धडपड महानगरीय जीवनात दिसते.

### १.अ.३.४ नागर, अनागर व महानगर या संकल्पना :-

'महानगर' ही संकल्पना आधुनिक काळातील असली तरी 'नागर' व 'अनागर' या प्राचीन काळापासून रूढ असलेल्या संकल्पना आहेत. प्राचीन काळी नगरे होती. व्यापार-उद्योगाची ठिकाणे म्हणून या नगरांना समाजव्यवस्थेत महत्वाचे स्थान होते. राजसत्तेचे व धर्मसत्तेचे केंद्र म्हणून या नगरांना विशेष महत्व होते. आधुनिककाळातील नगर व महानगरातभौतिक सुविधा, पक्के रस्ते, गगनचुंबी इमारती, स्वच्छता, वैभवसंपन्नता, सांस्कृतिक केंद्रे ही सर्व लक्षणे आढळतात.नागर समाजव्यवस्थेत ज्ञान-कौशल्याला विशेष महत्व प्राप्त होते. रोजगार सहज उपलब्ध होतो. व्यक्तिस्वातंत्र्याला वाव असतो. खानदानी प्रतिष्ठा, परंपरा यांना

फारसे महत्व दिले जात नाही. सिनेमा, फॅशन, जाहिराती, हॉटेल यांचा नागरी जीवनशैलीवर प्रभाव असतो. पुरूषांबरोबरच स्त्रियाही नोकरी-व्यवसाय करीत असतात.

अनेक भाषांचा संकर व त्यातून बहुभाषिकसमाजव्यवस्था नागर व महानगरात दिसते. प्रचंड धावपळ, स्पर्धा, आत्मकेंद्रीपणा, आर्थिक व सामाजिक विषमता, वाहतूक कोंडी, गर्दीचा महापूर इ. लक्षणे नागर-महानगरीय समाजव्यवस्थेत दिसतात. शहर किंवा नागर या संज्ञेची नेमकी व्याख्या करता येत नसली तरी त्याच्या स्वरूपाबद्दल विवेचन करताना मोठ्या वस्ती समुहांना पूर, पुरा किंवा नगर असे संबोधले गेले आहे. नागरत्व हा शब्द पाश्चात्य जगातील प्रबोधन, वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्रांती यामुळे निर्माण झालेल्या वसाहतींसाठी वापरला जातो.

तुलनेत अनागर किंवा ग्रामीण समाजव्यवस्था ही पारंपारिक रूढी व संकेतांचा पगडा असलेली दिसते. शेती व त्याला पूरक असलेले व्यवसाय तेथे प्राधान्याने केले जातात. एकत्र कुटुंब पद्धती हा व्यवस्थेचा मुख्य धागा असतो. घराण्याची प्रतिष्ठा, पारंपारिक मूल्य, रूढी यांना विशेष महत्व असते. त्यामुळे स्त्रीशिक्षणाला, स्त्रियांनी नोकरी-व्यवसाय करण्याला संधी नसते. उत्पादन साधने मर्यादित असतात. त्यामुळे साहजिकच आर्थिक स्तर खालावलेला असतो. काटकसरीचे जगणे हे जीवनशैलीचे महत्त्वाचे सूत्र असते. पारंपारिक असे सांस्कृतिक वातावरण हे ग्रामीण समाजरचनेत आढळते. नागर व महानगरांसारखी बहुसांस्कृतिक व्यवस्था ग्रामीण जीवनव्यवस्थेत नसते. तुलनेने लोकसंख्याही मर्यादीत असते. शहरी जीवनातील संघर्ष व ताणतणावाचे जीवन ग्रामीण भागात नसून निसर्गाशी, मूल्यांशी नाते जपणारी सामाजिक व्यवस्था येथे दिसते. बहुभाषिकता नसून बोलीभाषांचा प्रबळ वापर हे भाषिक वैशिष्टय ग्रामीण समाजव्यवस्थेचे वेगळेपण म्हणून सांगता येते.

महानगरी समाजव्यवस्था ही ग्रामीण व नागर समाजव्यवस्थेपेक्षा अनेक बाबतीत वेगळी असते. 'महानगर' ही संकल्पना आधुनिक काळातील असून गेल्या ५० वर्षात शहरांचा, नगरांचा जो कायापालट झाला, त्यावरून रूढ झालेली ही संज्ञा आहे, असे म्हणता येईल. विसाव्या शतकात मोठी वैज्ञानिक प्रगती झाली. औद्योगिक क्रांती व नव्या तंत्रज्ञानाच्या परिणामामुळे वसाहतींचे स्वरूप बदलले. वाढते औद्योगिकीकरण, त्यासाठी लागणारे श्रमिक हात, सामाजिक व सांस्कृतिक बदल, रोजगार व उदरनिर्वाहासाठी मोठया प्रमाणात शहरांकडे झालेले स्थलांतर या सर्वांमधून 'महानगर' ही जीवंत वास्तू उभी राहिली.भांडवलदारी व्यवस्था, व्यापार, दुकाने, कारखाने, बँका, श्रम व बुद्धीच्या जोरावर काम करणारी माणसे असे महानगराचे चित्र दिसते.

ग्रामीण व नागर जीवनापासून अनेक बाबतीत वेगळे असे हे महानगरीय समाजवास्तव आहे. समूहात राहुनही एकटेपणाची, एकाकीपणाची भावना येथील माणसात येते. व्यक्तिकेंद्री असे जीवन वाटयाला येत असल्याने येथे सामाजिक जीवनाचा अभावच दिसतो. लैंगिक विकृती, स्वैरता, रोगट मानसिकता, दडपण, नातेसंबंधातील दुरावा, ताण-तणाव, गर्दीचा महापूर, सत्तास्पर्धा अशा अनेक गोष्टी महानगरात दिसतात. थोडक्यात उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, राजकारण, अर्थकारण, व्यमिश्रता या सर्वांचे महानगर हे केंद्र बनते.

### १.अ.३.५ महानगरी संस्कृती:समाजवास्तवव स्वरूप-वैशिष्ट्ये:-

स्वातंत्र्योत्तर काळात वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्रांती यांच्या प्रभावातून नव्या वसाहती निर्माण झाल्या. त्यातून मोठी शहरे व महानगरे उदयाला आली. मोठे उद्योग, व्यापारसंस्था, नोकरशाही, शिक्षण-रोजगाराच्या प्रचंड संधी याची महानगरे ही केंद्रे बनली. अशा महानगरात भाषा, संस्कृती व मूल्यव्यवस्था यांचा संमिश्रपणा जाणवतो. एक नवी जीवनशैली स्वीकारून जगणारा समूह तेथे असतो. येथील लोकसमूहात राहणा-या प्रत्येकाची मानसिकता भिन्न असून जगण्याचे स्वत:चे वर्तनबंध स्वीकारलेले असतात. एकीकडे प्रचंड गर्दी असूनही तात्पुरते मानवी संबंध असल्याने एकटेपणा, असुरक्षितता, दहशतवाद, अराजक अशा समस्या कायम डोक्यावर टांगलेल्या असतात.

१) महानगरहीएक**संमिश्रलोकसमुहाची, विविध सामाजिक स्तर,वर्ग, भेद, भाषा, मूल्यसंस्कृती** याची **एक व्यवस्था** असते. उपजिविकेच्या, नोकरी व्यवसायाच्या कारणाने विभिन्न प्रदेशात एकत्र आलेला समूह येथे दिसतो.त्यामुळे उदरनिर्वाहाचे सहज साधन उपलब्ध होत असले तरी अनेक आव्हाने रोजच पेलावी लागतात. त्यातून अनेक विकृती व मानसिक प्रश्न निर्माण होतात. एका बाजूला जगण्याचे स्वातंत्र्य मिळत असते तर त्याचवेळी मानसिक दबाव, ताणतणाव सततच जाणवत असते.

२) महानगरी संस्कृती, समाजव्यवस्था, जीवनशैली यातून आलेली **मूल्यव्यवस्था** ही अन्य व्यवस्थेवरून अनेक बाबतीत वेगळी असते. त्यातून महानगरी संवेदन निर्माण होते. १९८०-९० नंतरच्या लेखनातून आलेले आशयसंदर्भ व अनुभवविश्व लेखकांनी नेमकेपणाने साकारले आहे. साहित्यातील या आशयातून महानगरातल्या भिन्न- भिन्न स्तरातील माणसांच्या जगण्याचे, संघर्षाचे, अस्तित्वशून्यतेचे चित्रण करते. त्यावर नेमक्या स्वरुपात भाष्य करते. काळाबरोबर बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व मानसिक परिवर्तनाचे संदर्भ या लेखनातून व्यक्त होतात.

३) १९९० नंतरच्या काळात महानगरीय जीवनामध्ये **अनेक महत्त्वपूर्ण बदल** घडले. त्याचा परिणाम साहित्यातील आशय व आविष्कारावरही झाला. अमानुषता, चिंता,क्रौर्य, स्वार्थ, सुखासीनता, व्यक्तिकेंद्रितअशी या बदलत्या काळाची वैशिष्ट्ये आहेत. माणसा-माणसांची परस्परांशी नातेसंबंध बदलत गेले. महानगरांमध्ये माणसांची गर्दी वाढली. त्या सर्वांचे चित्रण महानगरीय साहित्यातून आलेले दिसते. कथानक, पात्रचित्रण, संवाद, भाषा व निवेदन याबाबतीत अनेक नवे प्रयोग लेखकांनी केले. स्वाभाविक निवेदन पद्धतीऐवजी जीवनजाणिवेतून आलेल्या अनुभवाला व्यक्त करण्यासाठी निवेदनाचे नवे प्रयोग झाले.सर्व लेखनप्रकारात हे महानगरातील बदलत्या स्थितीचे व भावविश्वाचे चित्रण आले आहे.

४) **महानगरीय संवेदन** व त्यातून लिहिले गेलेले साहित्य समजून घेताना महानगरीय समाजव्यवस्थेची,वास्तवाची काही वैशिष्ट्येही विचारात घ्यावी लागतात. महानगरांचे स्वरूप हे अनेक बाबतीत वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण असते. एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव, सामुदायिक भावनेची संकुचितता, व्यक्तिस्वातंत्र्याला आलेले महत्त्व, आर्थिक विषमता, मोठया प्रमाणात विविध प्रदेशांमधून स्थलांतरित झालेला लोकसमुदाय, संमिश्र भाषा, प्रांत व जाती-धर्मांच्या समूह भावना, त्यामुळे वाढत जाणारी आत्मकेंद्रीवृत्ती हे महानगरीय समाजव्यवस्थेचे वेगळेपण असते. राहण्याच्या जागेपासून तर आर्थिक, मानसिक असे अनेक प्रश्न येथे हे

समूहासमोर असतात. जसजशी महानगरे वाढू लागली तशी तेथील समाजस्थितीही बदलत गेली.

५) विशेषतःजागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर मानवी जीवन अधिकच ढवळून निघाले.रोजगाराच्या निमित्ताने खेड्यापाड्यातील वेगवेगळ्या प्रदेशातील लोकसमूह महानगरात स्थलांतरित झाला. विविध प्रांतातून आलेल्या आणि विविध भाषा बोलणाऱ्या लोकांच्या समुहातून **महानगरात एक संमिश्र संस्कृती** निर्माण झाली. जगण्यातील कमालीच्या व्यक्तिकेंद्रित वृत्तीमुळे माणसांच्या अफाट गर्दीत माणूस कायम एकटाच राहू लागला. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून बदललेली मूल्यव्यवस्था, समकालीन संस्कृती, जीवनशैली यातून अनेक नवे प्रश्न महानगरांमध्ये निर्माण झाले.पंचतारांकित संस्कृतीच्या झगमगाटाने मुंबईसारख्या महानगरांचे आकर्षण वाढू लागले. परिणामी महानगरांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली.

६) भौतिक संपन्नतेचे आकर्षण व ते प्राप्त करण्यासाठी गैर आणि अनैतिक मार्गांचा केलेला वापर, आर्थिक दुरावस्था, असुरक्षितता, दैन्य, अत्याचार, गुंडगिरी, झोपडपट्ट्या, व्यसनाधीनता, धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनातून **महानगरीय जगणे आव्हानात्मक** बनले.एकाबाजूला पंचतारांकित हॉटेल्स, गगनचुंबी इमारतीमधून राहणारा,मूलभूत सेवा-सुविधा घेऊन सुखवस्तू कुटुंबात जगणारा श्रीमंत वर्ग तर दुसऱ्या बाजूला झोपडपट्टीतून, पुलाखाली, फुटपाथवर निवारा शोधणारा, कुठल्याही प्रकारच्या सेवासुविधा न मिळणाऱ्या सामान्य माणसाचा वर्ग असे विश्व महानगरात स्पष्टपणे जाणवते. त्यांची जगण्यासाठीची लढाई ही दमछाक करणारी असते. त्याबद्दलचे वास्तव चित्रण महानगरीय साहित्यातून आलेले आहे. औद्योगिकीकरण, आधुनिकीकरण, यंत्रसंस्कृती, भौतिकसुविधा, आर्थिक प्रश्न वघडामोडी याबद्दलचा संघर्ष लेखक-लेखिकांनी मांडलेला आहे.

७) औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक प्रगतीच्या झपाटयात महानगरे उभी राहिली.महानगरातील लोकसमूहात एकटेपणा, असुरक्षितता, संघर्ष, तणाव, दहशतवाद, सत्तास्पर्धा, आर्थिक प्रश्न, धावपळ ही**महानगरीय संस्कृतीची स्वरूप-वैशिष्ट्ये** जाणवतात. विषमता, समाजातील वर्गसंघर्ष, वाद-विवाद यातून निर्माण होणा-या संघर्षाचा प्रत्यय महानगरीय लेखनातूनव्यक्त होतो. सांस्कृतिक संकराचा व भाषिकसरमिसळीचा आविष्कार याकाळातील महानगरीय जाणिवेच्या लेखनातून झालेला आहे. महानगरात राहणा-या व्यक्तिसमूहाची मानसिकता, त्यांचा दृष्टीकोन, विचारप्रवृत्ती याचा शोध घेणे, कौटुंबिक ताण-तणाव, आर्थिक विषमता, मूल्य-हास, स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन याचाही विचार येथे करतायेईल.

८) **भिन्न-भिन्न सामाजिक स्तर व लोकसमूह** हे तर महानगराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.देशाच्या व राज्याच्या विविध भागातून जीवन जगण्यासाठी, उद्योग-व्यापार व्यवसायासाठी लोकांचे लोंढे मोठ्या प्रमाणात महानगराकडे येतात.त्या लोकसमूहाबरोबर त्यांची म्हणून असलेली बोलीभाषा आपोआपच येत असते.अशा भिन्न-भिन्न भाषिक समूहांचे मुंबई हे महानगर आहे.त्यामुळे या महानगराबद्दलच्या जीवनजाणीवा,संवेदनाव्यक्त होताना कथेतून तशाच प्रकारची भाषा येणे स्वाभाविक आहे.

९) महानगराला **एक गतिमानता असते**. प्रचंड स्पर्धा, अखंड काम, रोजगारांचीसहज उपलब्ध होणाऱ्या संधी,धावपळ,गर्दी, मानसिकताणतणाव ही सर्व महानगराची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या या वैशिष्ट्यांचे चांगले वाईट परिणाम जाणवतातच. महानगरात जसे जगण्याचे विविध आयाम अनुभवता येतात. भिन्नभिन्न समस्यांना सामोरे जावे लागते. तसे उदरनिर्वाहाचे हक्काचे साधन म्हणून महानगराकडे लोकांचे लोंढे येतात. त्यामुळे प्रश्न आणि आव्हाने असली तरी शेवटी महानगर हे माणसाला आपलेसे वाटते.मुंबई म्हणजे प्रचंड वेगाचे शहर आणि त्या वेगाबरोबर जगणारी माणसे अशी या महानगराची ओळख आहेत.मुंबईची जीवनशैली,तेथील समाजवास्तव व संस्कृती यातून संवेदनशील लेखकाला अनेक विषय मिळत जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१. शहरीकरण, महानगरीकरणाची प्रक्रिया थोडक्यात सांगून त्याची स्वरूप वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## १.अ.४ सारांश

१९७०- ८०नंतरचा काळ हा वेगाने बदलणारा काळ होता. मानवी मूल्यांवर आधारित असलेल्या ग्रामीण संस्कृतीची जागा महानगरी अशा नव्या संस्कृतीने घेतली.कापडउद्योग,कारखानदारी, चित्रपटनिर्मिती, अभियांत्रिकी इ. व्यवसाय जोमाने वाढले. अनेक प्रकारच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वाड्.मयीन घटनांनी महानगरातीलसमाजजीवन ढवळून निघाले.वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान, औद्योगिक क्रांती, भांडवलधार्जिणी सरकारी धोरणे यामुळे शहरे वेगाने विकसित होत गेली. वेगवेगळया प्रदेशातील लोक रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरीत झाले. त्यामुळे महानगरे ही सहस्त्रमुखी महाकाय जीवंत वास्तू बनली. स्पर्धा, श्रमविभागणी यामुळे महानगरीय समाजजीवनाची एक जीवनशैली तयार होते. व्यामिश्र असे सांस्कृतिक विश्व, मानवी संबंध, गर्दी, गतिमानता, एकटेपणा यांना महत्व प्राप्त होते. या महानगरात शहरीकरणाचा वेग मोठा आहे. आकाराने प्रचंड मोठ्या असलेल्या या महानगरांमध्ये लोकसंख्येची घनताही अधिक असते. उच्च, मध्यम व कामगार किंवा निम्नवर्ग असे वर्गीय भेद हे महानगरात प्राकर्षाने जाणवतात.महानगरीय समाज व जीवनव्यवस्था याची खास म्हणून काही वैशिष्टये स्पष्टपणे जाणवतात.

## १.अ.५ सरावासाठी स्वाध्याय / नमुना प्रश्न

१) नागर, अनागर व महानगर या संकल्पना स्पष्ट करून महानगरीय समाज जीवनाची वैशिष्टये थोडक्यात लिहा.

२) महानगरीय जीवनाचे स्वरूप सांगून महानगरीय समाजजीवनाची वैशिष्टयांबद्दल विवेचन करा.

३) महानगरीय साहित्यात वेगवेगळ्या साहित्य प्रकारांमधून कोण-कोणते विषय मांडले गेले, याबाबत सविस्तर विवेचन करा.

४) महानगरीय साहित्यातील अनुभवविश्व, घटना, पात्रचित्रण, प्रतिमासृष्टी व भाषाशैली या घटकांमध्ये जाणवणारी वैशिष्ट्ये लिहा.

५) दलित व ग्रामीण साहित्याच्या तुलनेत महानगरीय साहित्यात कोणता वेगळेपणा जाणवतो, ते सविस्तर लिहा.

६) महानगरीय संस्कृतीचे स्वरूप सांगून समाजवास्तवव जीवनशैली यादृष्टीने जाणवणारे विशेष सांगा.

७) शहरीकरणाचा मानवी जीवनावर झालेले परिणाम त्या प्रभावातून निर्माण झालेली महानगरीकरणाची प्रक्रिया याबाबत थोडक्यात विवेचन करा.

८) औद्योगिकीकरण,भौतिक विकास, आधुनिकीकरण,बदलती शहरीसंस्कृती, धावपळ यातून जाणवणारे महानगरीय संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

## १.अ.६ संदर्भ ग्रंथ आणि पूरक अध्ययन/ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. *'महानगरीयवास्तव: भारतीय कादंबऱ्यांसंदर्भात'* संपा.सुर्यकांत आजगावकर, ललित पब्लिकेशन, मुंबई.

२. *'कथा मुंबईच्या गिरणगावची',* नीराआडारकर व मीना मेनन, मौज प्रकाशन, मुंबई.

३. *'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य'*, 'जागतिकीकरण आणि मराठी भाषा व साहित्य' (लेख),प्रा.वसंत अबाजी डहाके, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४. महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य(लेख)- सप्रे अविनाश, (संपा.) नागनाथकोतापल्ले,*'साहित्य आणि समाज'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. *'मुंबई: काल आणि आज'* - संपादन मंजिरी कामत,अनुवाद - गिरीश जोशी.

६. *आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता* - संपा. मृणालिनी शहा, विद्यागौरी टिळक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

७. *'मुंबईचे वर्णन'*- गोविंद नारायण माडगावकर - समन्वय प्रकाशन.

८. महानगरीय कादंबरीतील समाजदर्शन-आनंदागांगुर्डे, यशोदीप पब्लिकेशन, पुणे.

❖❖❖❖

# १ब

# महानगरीय जीवन, त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल, व्यामिश्रता, महानगरीय जाणिवा, संवेदना, परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इत्यादी.

**घटक रचना :**


१.ब.१ उद्दिष्ट्ये

१.ब.२ प्रास्ताविक

१.ब.३ विषय विवेचन

१.ब.३.१ महानगरीय जीवन – स्वरूप व वेगळेपण

१.ब.३.२ महानगरीय समाजजीवनाची वैशिष्ट्ये

१.ब.३.३ महानगरांचे स्वरूप

१.ब.३.४. मुंबई: एक महानगर

१.ब.४. महानगरीय जीवनात कालपरत्वे घडत गेलेले बदल

१.ब.५. व्यामिश्रता, परात्मता, महानगरीय जाणिवा, संवेदना,भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इ.

१.ब.६. सारांश

१.ब.७ सरावासाठी स्वाध्याय/नमुना प्रश्न

१.ब.८. पूरक अध्ययन/ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.ब.१ उद्दिष्ट्ये

महानगरीय जीवन त्याचे ,स्वरूप आणि वेगळेपण समजावून घेणे.

- महानगरीय समाज जीवनाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल जाणून घेणे.
- काल प्रवाहात सामाजिक, सांस्कृतिक,आर्थिक अशा सर्वच दृष्टीने महानगरांचे स्वरूप कसेबदलत गेले, त्याचा आढावा घेणे.
- महानगरीय जीवनातील व्यामिश्रता, परात्मता, महानगरीय जाणिवा, संवेदना, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इ. चे स्वरूप जाणून घेणे.
- शहरीकरण, महानगरीकरणाच्या प्रक्रियेतून वैशिष्ट्यपूर्ण महानगरीय जाणिवांचे साहित्यनिर्माण होत गेले. त्याचे स्वरूप व वैशिष्ट्य आणिअन्य साहित्यापेक्षा त्याचे वेगळेपण लक्षात घेणे.

munotes.in

- महानगरीय कथा,कविता, कादंबरी, नाटक या प्रकारातीलवैशिष्ट्यपूर्ण साहित्याचे स्वरूप व विशेषांचा अभ्यास करणे.

## १ ब.२. प्रास्ताविक

औद्योगिकीकरणामुळे भारतात शहरांची झपाट्याने वाढ झाली. नगरांना आधुनिक जीवनाचा स्पर्श झाला. त्यांची महानगरे बनली. या महानगरांना सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विविधता लाभली. या काळातील साहित्यिकांना हे महानगरीय जीवन सततच आवाहन देत राहिले. त्याबद्दलची जाणीव वेगवेगळ्या साहित्यप्रकारातून व्यक्त झाली आहे. समाजव्यवस्थेत घडणाऱ्या या भौतिक बदलांबरोबरच मानवी नातेसंबंध- मूल्यसंकल्पना, विचार, भावना व जाणिवांमध्येही अंतर पडत गेले. माणूस अगतिक, अस्वस्थ व एकलकोंडा होत गेला. स्वार्थी प्रवृत्ती वाढली, भोगलोलूपता व एकूणच जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. भावनिक -मानसिक स्वरूपाचे प्रश्न त्यातून निर्माण झाले.

इ.स. १९९० नंतरची समाजरचना गुंतागुंतीची, विज्ञान-तंत्रज्ञान व माध्यमतंत्राने, संगणक व प्रसारमाध्यमांनी प्रभावित झालेली आहे. साहित्याचा अभ्यास करताना आपणालाअनेक अंगानेत्याचा असा व्यापक विचार करता येतो. किंबहुना तो करावाच लागतो. महानगरीय संवेदना, जाणिवा, त्यातून निर्माण झालेल्या महानगरीय वास्तवाचा, जाणिवांचा विचार समाजशास्त्रीय दृष्टीने करणेगरजेचे ठरते. नव्वदनंतरचा काळ समजून घेताना मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य, अर्थकेंद्री जीवनव्यवहार, चंगळवादी जीवनशैली हे सामाजिक व आर्थिक संदर्भ विचारात घ्यावे लागतात. जागतिकीकरणाच्या मार्गाने होत गेलेल्या या स्थित्यंतराचा परिणाम येथील व्यवस्थेवर झालेला दिसतो. बदलत्या अर्थव्यवस्थेने महानगरातील माणसांचे जगणे असह्य केले. गरीब - श्रीमंत दरी रुंदावत गेली. बेकारी, कुपोषणाचे प्रमाण वाढले. खेडी ओस पडून महानगरांकडे लोकांचे लोंढे वाढले. जागतिकीकरणाचे हे भयावह व आक्रमक रूप या काळातील महानगरी संवेदनशीलतेतूनव्यक्त होते आहे.

## १.ब.३ विषय विवेचन

### १.ब.३.१ महानगरीय जीवन: स्वरूप व वेगळेपण -

स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक स्वरूपात झालेले बदल व त्याच्या प्रभावातूनमहानगरीय जीवन अमुलाग्र बदलत गेलेले आहे. आधुनिक जीवनातील ताणतणाव, अगतिकता ही यामाणसांच्या स्वभावाप्रमाणे परिसराचाही स्वभाव बदलत असतो. मुंबई महानगराला अफाट वेग होता, पण तो आता नव्वदनंतरच्या दशकात आणखी कित्येक पटीने आज वाढला आहे.उदारीकरण खाजगीकरणनंतर महानगराचा स्वभावही आरपार बदललेला आहे. भाषाही बदललेली आहे. वेगाबरोबरच अस्थिरता आलेली आहे आणि हा बदल इतका संकोचित झाला आहे की, येथे माणूसच शिल्लक राहतो की नाही ही अशी शंका उपस्थित होते. माणसाचे जगणे आणि त्याच्या जीवन जाणीवा यामुळे संकुचित झालेल्या आहेत. माणसांची होणारी घुसमट आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न लेखकांनी मांडले आहेत.

महानगरीय जीवन, त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल, व्यामिश्रता, महानगरीय जाणिवा, संवेदना, परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इत्यादी.

सामजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक अशा सर्वच दृष्टीने परिवर्तनशील व स्थित्यंतराचा हा काळ आहे.मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार, त्यातून उदयाला आलेला नवमध्यमवर्ग, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन,अस्तित्वासाठी चाललेली जीवघेणी स्पर्धा, तडजोड या सर्वांमधून अनेक प्रश्न निर्माण झाले.महानगरातील कामगारांचे विश्व, त्यांचा संघर्ष, चाळ संस्कृती, मानवी व्यवहार, कौटुंबिक नातेसंबंध, वाढती स्पर्धा, जगण्यासाठी करावी लागणारी धडपड, असुरक्षितता, परात्मभाव, स्त्रीजीवन, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्री जीवन, चंगळवाद, शोषण व सत्तेसाठी चाललेला  संघर्ष असे महानगरीय जीवन व्यवस्थेचे स्वरूप दिसते.

आर्थिक उदारीकरणातून खुली झालेली बाजारपेठ, त्यातील जीवघेणी स्पर्धा, बाजारीकरण या सर्व बदलांचा प्रभाव महानगरी वास्तवावर झाला. ते अधिक गतिमान झाले. माणसांची सर्व बाजूंनी कोंडी करण्याचा प्रयत्न या व्यवस्थेतून झाला. महानगरी जीवनात जगणाऱ्या माणसांसमोर रोजच नवे प्रश्न आहेत. भिन्नभिन्न प्रकारची आव्हाने पेलत भौतिक सुखाचा शोध इथली माणसे घेताना दिसतात. आयुष्यात निर्माण होणारे हे प्रश्न कधी ‘मी’ संबंधित असतात तर कधी समष्टीशी संबंधित असतात. दारिद्र्य, भूक, भय, चिंता, असुरक्षितता, कामवासना या आव्हानांचा सामना करीत जगणारा महानगरी लोकसमूह वेगळा दिसतो.

### १.ब.२.३.महानगरीय समाजजीवनाची वैशिष्टये :-

२०व्या शतकाच्या मध्यानंतर कापडउद्योग, कारखानदारी, चित्रपटनिर्मिती, अभियांत्रिकी इ. व्यवसाय जोमाने वाढले. अनेक प्रकारच्या राजकीय,  सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वाङ्.मयीन घटनांनी महानगरातील  समाजजीवन ढवळून निघाले. दुसरे महायुद्ध, चलेजाव आंदोलन, स्वातंत्र्यप्राप्ती, गिरणी व गोदी कामगारांचे मोठे संप, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची यशस्वी चळवळ अशा अनेक घटना-घडामोडींनी महानगरातील समाजजीवनाला नवी दिशा मिळाली. ग्रामीण व नागर समाजजीवनापेक्षा वेगळया असलेल्या या **महानगरीय समाजजीवनाची काही वैशिष्टये / लक्षणे** नोंदवता येतील.

१. **समाजजीवनाची अनेक रूपे व अनेकस्तरीय लोकसमूह** उदा. अतिश्रीमंत, भांडवलदार, उच्चमध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय, गरीब, मजूर, झोपडपट्टीत राहणारा वर्गअशी अनेक रूपे हे महानगराचे सर्वात महत्वाचे वैशिष्टय होय.

२. **व्यक्तिकेंद्रीततेला येणारे महत्त्व** आणि त्यामुळे सामाजिक जीवनाचा अभाव महानगरात दिसतो.

३. महानगर हे उद्योग व्यापाराचे केंद्र बनल्याने **मोठी आर्थिक उलाढाल** चालते. त्यामुळे सत्ता, स्पर्धा, डावपेच, राजकारण, हेवेदावे, पैशाला आलेले प्रचंड महत्व असे महानगराचे स्वरूप दिसते.

४. या सर्वांमधून महानगरात **स्पर्धा, संघर्ष, वाद आणि मानसिकता** नको त्या स्तराला गेल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

५. **महानगरीय जीवन हे गतीमान** असून नोकरी-व्यवसायासाठी सततची धावपळ, मानसिक दडपण, ताण-तणाव, जीवनमूल्यांशी तडजोड करूनच जगावे लागते.

६. बेसुमार वाढणारी झोपडपट्टी, **गर्दीतला जाणवणारा एकटेपणा** हे महानगरी जीवनाचे वैशिष्ट होय.

७. उच्चवर्गीयांबरोबरच सामान्य माणसातही संवेदनशून्यता, एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव, समूहभावनेची उणीव दिसते.

८. **आर्थिक विषमता** महानगरात स्पष्टपणे दिसते. एकीकडे गगनचुंबी इमारती, आर्थिक श्रीमंतवर्ग तर दुसरीकडे झोपडपट्ट्यांमधून जीवन जगणा-यांची मोठी संख्या हे विदारक वास्तव महानगरात जाणवते.

थोडक्यात, महानगरातले जीवन हे नागर व ग्रामीण जीवनापेक्षा अशा अनेक बाबतीत वेगळे आहे. त्याची म्हणून ही वैशिष्टये आपणास नोंदवता येतात.

**१.ब.३.३.महानगरांचे स्वरूप** :-

गेल्या ५०-६० वर्षात नगरांचे महानगरात रूपांतर होत गेले. वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान, औद्योगिक क्रांती, भांडवलधार्जिणी सरकारी धोरणे यामुळे शहरे वेगाने विकसित होत आहेत. वेगवेगळया प्रदेशातील लोक रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरीत होत गेले. त्यामुळे महानगरे ही सहस्त्रमुखी महाकाय जीवंत वास्तू बनली. स्पर्धा, श्रमविभागणी यामुळे महानगरीय समाजजीवनाची एक जीवनशैली तयार होते. व्यामिश्र, सांस्कृतिक विश्व, मानवी संबंध, गर्दी, गतिमानता, एकटेपणा यांना महत्व प्राप्त होते. महानगरात गजबजलेल्या गर्दीतही माणूस एकटा ठरतो. महानगरातून मध्यमवर्ग वेगाने वाढतो आहे. तो देशाच्या वेगवेगळया भागातून आला असल्याने मातीपासून तुटलेपण सांभाळत जगतो आहे. उपचार सांभाळत परस्परांच्या सुखदु:खात तो सहभागी होत आहे.

औद्योगिकीकरणाच्या रेट्यामुळे भारतात शहरांची झपाट्याने वाढ झाली. नगरांना / शहरांना आधुनिक जीवनाचा स्पर्श झाल्याने त्याची महानगरे झाली. या महानगरात विविध स्तरांमध्ये जगणारी माणसे, त्यांचा जीवन संघर्ष या काळात आपल्याला दिसतो. महानगरात जीवन जगताना माणसांच्या वाट्याला आलेले एकाकीपण, आर्थिक कुचंबणा, दुःखाची जाणीव, उपरेपणाची भावना जाणवते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात होत गेलेले मोठे बदल व समकालीन समाजवास्तवात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे परिवर्तन झालेले दिसते त्यातून या कालखंडात मोठी शहरे - महानगरांमध्ये हिंसाचाराच्या घडलेल्या घटनांचे संदर्भ दिसतात. जागतिकीकरणाच्या मार्गाने होत गेलेल्या या स्थित्यंतराचा परिणाम येथील व्यवस्थेवर झालेला दिसतो. बदलत्या अर्थव्यवस्थेने महानगरातील माणसांचे जगणे असह्य केले. गरीब - श्रीमंत दरी रुंदावत गेली. बेकारी, कुपोषणाचे प्रमाण वाढले. खेडी ओस पडून महानगरांकडे लोकांचे लोंढे वाढले. जागतिकीकरणाचे हे भयावह व आक्रमक रूप या काळातील महानगरी व्यवस्थेत दिसते.

गेल्या २०-२५ वर्षांच्या काळात सर्वच भारतीय समाजाचे आणि विशेषत: शहरी समाजाचे रंगरूप झपाटयाने बदलते आहे. मुंबईचे सिंगापूर, बँगलोरचे सॅनफ्रान्सिस्को आणि दिल्लीचे बिजींग असा भारतीय शहरांचा कायापालट होतो आहे. पंचतारांकीत संस्कृतीच्या झगमगाटाने अनेकांचे डोळे दिपून गेले आहेत. मॉल संस्कृतीच्या वाढत्या प्रसारामुळे

चंगळवादही वेगाने वाढतो आहे. दुस-या महायुद्धानंतरच्या काळात औद्योगिक रेटयामुळे भारतात शहरांची झपाटयाने वाढ झाली. नगरांना आधुनिक जीवनाचा स्पर्श झाला. त्यातुनच महानगरे उदयाला आली. महानगरातील माणसांचे जीवन बदलले आहे. खेडयातील लोक मोठया प्रमाणात शहरांमध्ये-महानगरांमध्ये आल्याने महानगरे आता गर्दी व गजबजाटाने व्यापून गेली आहेत. गर्दीमुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. मानवी जगणे यंत्रवत झाले आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य हे मूलभूत प्रश्न सोडवताना अनेक आव्हाने सामान्य माणसाला पेलावी लागतात.

महानगरीय जीवन, त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल, व्यामिश्रता, महानगरीय जाणिवा, संवेदना, परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इत्यादी.

नव्वदनंतरचा काळ समजून घेताना मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य, अर्थकेंद्री जीवनव्यवहार, चंगळवादी जीवनशैली हे सामाजिक व आर्थिक संदर्भ विचारात घ्यावे लागतात. १९८० - ९० नंतरच्या काळात महानगरी समाज वास्तवातील परिवर्तनामागे अनेक घटक प्रेरक असलेले दिसतात. त्यातील जागतिकीकरण हा सर्वात प्रमुख घटक होता. जागतिकीकरणाने जसे अनेक महत्त्वपूर्ण बदल घडले, नव्या संधी निर्माण झाल्या तसेच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नही निर्माण केले. मुंबईसारख्या मोठ्या महानगरात जगणाऱ्या माणसांचे तेथील स्थान नगण्य झाले. त्यातून निर्माण झालेला कनिष्ठ मध्यम वर्गाचा संघर्ष व त्याची आर्थिक कोंडी हे विशेष महानगराचे दिसतात.

### १.ब.३.४.मुंबई - एक महानगर-

मुंबई हे जागतिक स्तरावरील प्रमुख शहर आहे. भारताचे प्रवेशद्वार म्हणून त्याला संबोधले जाते. भारतातील 'एक प्रगत महानगर' अशी मुंबईची ओळख आहे. अरबी समुद्र किना-यावरील सर्वोत्कृष्टनैसर्गिक बंदर वमहाराष्ट्र राज्याची राजधानी म्हणजे मुंबई. मुंबई बेट व साष्टी बेटाचा मोठा भाग मिळून 'मुंबई महानगर' तयार झाले आहे. ते मोठा कुलाबा, धाकटा कुलाबा, मुंबई, माझगांव, परळ, वरळी व माहिम या मूळ सात बेटांचे एकत्रीकरण होय. मुंबईचा मोठा भाग हा समुद्रात भर घालून तयार केला गेला आहे. गेल्या काही दशकात मुंबईवर अनेक निबंध, लेख आणि संपादित पुस्तके लिहिली गेली. या नगराचा इतिहास राजकारण, व्यापार आणि वाणिज्य, दळणवळण-संदेशवहन तसेच औद्योगिकरण, शहरीकरण, उद्योग आणि कामगार, सांस्कृतिक, भाषिक, साहित्य व कला त्यातून घडलेली समाजरचना अशा अनेक पैलूंवर अभ्यासकांनी संशोधनात्मक विपूल लेखन केले आहे.

आधुनिक भारताच्या जडणघडणीत मुंबई शहराचा वाटा मोठा आहे. अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक चळवळींचा प्रारंभ मुंबईत झाला. अनेक संस्थांच्या कार्याचे व सर्वच बाबतीत महत्वाच्या घटनांचे मुंबई हे माहेरघरच मानले जाते. मुंबईने देशाला अनेक राजकीय नेते, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते, विद्वान, संशोधक, लेखक, कलावंत यांची देणगी दिली आहे. देशी-परदेशी व्यापार, निर्मिती उद्योग, नित्योपयोगी वस्तुंचे बाजार आणि आर्थिक व्यवहार याबाबतीत हे महानगर आघाडीवर असून देशाच्या अर्थकारणाची नस आहे. नॅशनल बँकाची मुख्यालये येथे आहेत. येथील शेअरबाजार हा देशाच्या आर्थिक चढउताराचा निदर्शक असतो. कापडउद्योगांचे हे केंद्र आहे. त्याशिवाय अभियांत्रिकी, स्वयंचलित वाहने, छपाई, रसायने, रंग, खत, तांत्रिक उपकरणे, अन्नपदार्थ, रेशीम व कृत्रिम धागे, तेल, साबण, प्लॅस्टिक, धातुकाम इ. उद्योगधंदे या महानगरात विकसित झाले आहेत. येथे असलेल्या अनेक नामांकित संशोधन संस्था आपल्या संशोधनकार्यात अग्रेसर आहेत.

'सांस्कृतिक विविधता' हे मुंबई महानगराचे  महत्वाचे वैशिष्ट्य होय. मुंबईतील मराठी माणसांनीच हे वैशिष्ट्य रूजविले, संवर्धित केले. महाराष्ट्रातील संस्कृतीचा पूर्ण ठसा या महानगरीवर आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, कला-वाङ्.मयीन चळवळीचे उगमस्थान व कार्यक्षेत्रही मुंबईच आहे. देशी-परदेशी, विविध भाषिक, विविध धर्मपंथाचे लोक उद्योगव्यवसायाच्या निमित्ताने येथे स्थायिक झाले आहेत. विविध भाषेतील वर्तमानपत्रे-नियतकालिके येथून प्रसिद्ध होतात. मुंबईतील मराठी रंगभूमी विशेष प्रगत व प्रयोगशील असून इंग्रजी, गुजराही, हिंदी नाटके,विविध संगीत महोत्सव, कला प्रदर्शने, नृत्ये आणि सभासंम्मेलने असे कार्यक्रम अखंडपणे मुंबईत चालूच असतात.

१९६० मध्ये मुंबई राजधानी असलेल्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यापुढची दोन दशके मुंबई शहर आपल्या उत्तरोत्तर होणा-या प्रगतीचे साक्षीदार होते.१९८२ मध्ये झालेल्या कापडगिरणी कामगारांच्या अभूतपूर्व संपाने या शहराचा कणा असलेल्या औद्योगिकरणाचा ऱ्हास झाला. याबाबत मंजिरी कामत म्हणतात,की मुंबई शहराच्याइतिहासातील ही महत्त्वाची घडामोड या नगरीला विभिन्न रीतीने विकसित होत जाणा-या घटनाक्रमांकडे नेणारी होती. कालांतराने शहराच्या सर्वांगीण विकासात मोठेच फेरबदल घडून आले. मुंबई हे आयातनिर्यातीचे एक प्रमुख व्यापारी केंद्र आणि पायाभूत शहर बनले. त्यामुळेच मुंबई हे शहर जगातील इतर विकसनशील राष्ट्रांना  विशेषत: युरोपिय राष्ट्रांना व्यावसायिक स्पर्धेसाठी एक महत्वपूर्ण स्थान वाटू लागले.

१९९० च्या सुरूवातीचे आर्थिक उदारिकरणाचे धोरण, संगणक आणि माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील ज्ञानस्फोट, देशाची वाढती सुबत्ता तसेच सुखसाधनांचा मध्यमवर्गात झालेला विस्तार यामुळे मुंबई शहराचा कायापालट झपाटयाने झालेला दिसतो. मुंबई हे पराकोटीच्या वैविध्याचे प्रचंड मोठया प्रमाणात वाढणा-या लोकसंख्येचे व तेवढयाच नवीन आव्हाने व समस्यांनी ग्रस्त होत गेलेले शहर आहे. या महानगरीच्या अंगोपांगाचे सूक्ष्म तपशील लक्षात घेता त्याची अनेक रूपे आपल्या ध्यानात येतात. मुंबईचा भूगोल, इतिहास येथील सांस्कृतिक, आर्थिक परिवर्तने व त्याचे साहित्यातून, लेखनातून व्यक्त झालेले प्रतिबिंब अभ्यासकांसाठी नेहमीच कुतुहलाचे ठरले आहे. मुंबई गतिमानतेने माणसाला पूर्णत: गतिमान बनवते. त्याच्या धकाधकीच्या जीवनाचे प्रश्न वेगवेगळया प्रकाराने व्यामिश्र होत आहेत.

मुंबई महानगर अनेक लोकांना आकृष्ट करते. त्यामुळे मुंबईकडे स्थलांतरितांचे ओघ कायम सुरू असलेले दिसतात. त्याचाच परिणाम म्हणून मुंबईची लोकसंख्या कायम वाढत राहिलेली दिसते. त्यातुनच अनेक नागरी समस्या निर्माण झाल्या आहेत. मुंबई महानगरात मोठा लोकसमूह राहत असुनही एकटेपणाची जाणिव सतत जाणवते. अर्थ आणि काम याला अवास्तव महत्व या महानगरात दिले जाते. येथील लोकसमुह हा ठराविक वर्गातला नाही. एकीकडे उच्चवर्गीय लोकसमुह तर दुसरीकडे जगण्याशी झुंज देणारी सामान्य माणसे आणि त्याचबरोबर मध्यमवर्गीयपण टिकवणारे, जीवाचे रान करून जगणारे माणसेही महानगरात आहेत. कामगारांचे एक स्वतंत्र स्थान या महानगरात आहे.

मुंबई महानगर हे कामगारांनी व्यापलेले शहर आहे. विविध भूप्रदेशातून आलेले कामगार येथे पोटासाठी विविध व्यवसाय स्वीकारत असतात. कामगारांच्या बहुसंख्य वस्तीतूनच

मध्यमवर्गीय चाळ-संस्कृती निर्माण झाली. या शहरातच कामगार चळवळीचा जन्म झाला.मुंबईत वास्तव्य करणा-या प्रत्येकाची एक स्वंतत्र मानसिकता आहे. भिन्न-भिन्न संस्कृती जोपासणारी माणसे येथे नगर-उपनगरात वास्तव्य करतात. औद्योगिक संस्कृती, उच्चभ्रुंचे सुखलोलूप व्यवहार, उद्योगधंदे आर्थिक संमिश्र व्यवस्था महानगरात आहे. अनेक समस्या व आव्हाने या महानगरासमोर आहेत.

महानगरीय जीवन, त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल, व्यामिश्रता, महानगरीय जाणिवा, संवेदना, परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इत्यादी.

पूर्वापार चालत आलेल्या मुंबईची ‘उद्योगप्रधान शहर’ ही प्रतिमा बदलून आता जागतिक दर्जाच्या सेवा सुविधांचे एक अव्व्ल केंद्र म्हणून ते आकाराला आलेले आहे. जागतिक स्तरावरील अर्थकारणाच्या महाजालात मुंबईला एक महत्वपूर्ण स्थान प्राप्त झालेले आहे. मोठया प्रमाणात नागरीकरण, शहरीकरण झालेल्या या शहरात अनेक नव्या समस्याही उभ्या राहिलेल्या आहेत. जागेचा मोठा प्रश्न आहे. प्रचंड गर्दी, चो-या, खुन, दहशतवाद, गुंडगिरी, तस्करी, प्रचंड धावपळ, जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष अशी अनेक आव्हाने घेऊन मुंबईकर जगतो आहे.

## १.ब.४. महानगरीय जीवन - महानगरीय जीवनात कालपरत्वे घडत गेलेले बदल

महानगरीय साहित्याचा काळ हा आधुनिक साहित्याचा काळ आहे. मानवी मूल्यांवर आधारित असलेल्या ग्रामीण संस्कृतीची जागा महानगरी अशा नव्या संस्कृतीने घेतली. महानगर हे आधुनिक मनुष्य-संस्कृतीचे एक प्रतिक आहे. ज्या समाजात एकाचवेळी जुन्या परंपरा आणि आधुनिकता जवळपास एकत्र नांदत असतात,तिथे आधुनिकतेचे संवेदन स्वाभाविकपणे परंपरेच्या संदर्भात होत राहते आणि परंपरेचे भानही आधुनिकतेच्या पार्श्वभूमीवर घडत जाते. म्हणून आपले महानगरीय संवेदन या द्विधा संदर्भात विशिष्ट रूप प्राप्त करून घेते.१९६० नंतरचा काळ हा विविध जनआंदोलनांनी प्रभावित झालेला दिसतो. ग्रामीण, प्रादेशिक, दलित, शेतमजूर, कामगार, आदिवासी, स्त्रिया यांनी या काळात आपआपल्या हक्कांसाठी लढे दिले. त्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, आदिवासी, प्रादेशिक, महानगरीय असे विविध प्रवाह निर्माण झाले. मराठी साहित्यातून महानगरीय संवेदन ही जाणिव कशी व्यक्त होते, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

आधुनिकता आणि पारंपारिकतेचा परिपाक महानगरीय संवेदनेत असतो, असे म्हणताना ग्रामीण व शहरी संवेदनेपेक्षा हे महानगरीय संवेदन अनेक बाबतीत, वेगळे असल्याचे स्पष्टपणे जाणवते. हे महानगरीय संवेदन कोणकोणत्या बाबतीत वेगळे आहे, त्याचाही विचार करणे आवश्यक ठरते.‘महानगरीय साहित्य’ ही संकल्पना मूल्यमापनात्मक नसून ती एक वर्णनात्मक-वर्गीकरणात्मक अशी संकल्पना आहे. तिचा संदर्भ आधुनिकता, शहरी संस्कृती, शहरी जनजीवन, शहरी मानसिकता व त्याच्या प्रभावातून आणि परिणामातून तयार झालेल्या संवेदनशीलतेशी निगडीत आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून जगभर महानगरे निर्माण झाली. ग्रामीण-शहरी जीवनापेक्षा वेगळे समाजजीवन, वेगळी संस्कृती त्यातून उदयाला आली. या महानगरीय पर्यावरणात जगणा-या व्यक्तिच्या वाटयाला येणारे अनुभवविश्व वैशिष्टयपूर्ण आहे. या अनुभवाची संगती लावण्याचा, अर्थ लावण्याचा प्रयत्न साहित्यादी कलांच्या माध्यमातून सुरू झाला. त्यातुनच महानगरीय संवेदनेचे साहित्य निर्माण होऊ लागले. महानगरीय संवेदन हे महानगरीय संस्कृतीचा आविष्कार आहे.

munotes.in

महानगरातील घटना-प्रसंग, व्यक्तिसमुहांचे, जीवनाच्या ताण-तणावाचे येथील सांस्कृतिक-सामाजिक जीवनाचे हे चित्रण असते.

१९६० पर्यंत महानगरीय जाणीव तितकीशी प्रभावीनव्हती. आधुनिक साहित्याची निर्मिती १९व्या शतकाच्या अखेरपासून झाली असली तरी महानगरीय संवेदनेचे साहित्य मात्र स्वातंत्र्योत्तर काळात १९६० नंतर निर्माण होऊ लागले. तसे पाहिले तर १९४५ पासून बा.सी. मर्ढेकरांच्या कवितेत व गंगाधर गाडगीळांच्या कथेत महानगरीय जाणिव व संवेदनशीलतेचा पहिला हुंकार पहावयास मिळतो. सुरूवातीला 'महानगरी' हा शब्दप्रयोग मराठी साहित्यात केवळ 'मुंबई' पुरताच वापरला जात होता. आज मात्र मुंबई पाठोपाठ पुणे, नाशिक, नागपूर या शहरांचाही प्रवास महानगरांच्या दिशेने होतो आहे. या महानगरात शहरीकरणाचा वेग मोठा आहे. आकाराने प्रचंड मोठया असलेल्या या महानगरांमध्ये लोकसंख्येची घनताही अधिक असते. उच्च, मध्यम व कामगार किंवा निम्नवर्ग असे वर्गीय भेद हे महानगरात प्राकर्षाने जाणवतात.

महानगरीय समाज व जीवनव्यवस्था याची खास म्हणून काही वैशिष्टये स्पष्टपणे जाणवतात. साहित्यातील संवेदनशीलता लक्षात घेताना यासर्व घटकांचा विचार महत्वाचा ठरतो. उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, राजकारण, अर्थकारण याचे महानगर हे केंद्र असते. जीवनातील तीव्र निराशा, वैफल्य, सार्वत्रिक अर्थशून्यतेची जाणिव,असुरक्षिततेमुळे पोखरलेली माणसांची मने, भावनिक संबंधाचा विलोप, जाणवणारा परकेपणा, तुटलेपणा, धावपळ व एकाकीपणा अशी अनेक आव्हाने महानगरीत वास्तव्य करणा-या जनसमूहासमोर असतात. त्यामुळे महानगरीय जीवनशैलीच वेगळी असते, हे स्पष्ट होते. महानगरातील वैशिष्टयपूर्ण व्यक्तिजीवन व समाजजीवनाचा आविष्कार महानगरीय साहित्यातून घडतो.

## १.ब.५. महानगरीय संवेदन, व्यामिश्रता, परात्मता, महानगरीय जाणिवा, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इ.

'मुंबई' हे महानगरीय जाणिवांचे क्रेंदआहे. झपाटयाने बदलणा-या काळात इतरही मोठी शहरे, नगरे महानगराच्या वाटेवर आहेत. महानगरातीलवैशिष्टयपूर्ण व्यक्तिजीवनाचा व समाजजीवनाचा वेध घेणारी जाणिव म्हणजे महानगरीय जाणीवहोय.'महानगरीय संवेदन' हा महानगरी संस्कृतीचा आविष्कार असतो. महानगरातील घटना-प्रसंग, व्यक्तिसमूहांचे ताण-तणाव,जीवन-व्यवस्था, संघर्ष, धावपळ, कायदा-सुव्यवस्था इ. व्यक्त करणारी ही जाणीव असते. भांडवलशाही, व्यापार, दुकाने, कारखाने, बँका, श्रम व बुद्धी विकून काम करणारी माणसे असे विविध घटक या जाणिवेचे भाग असतात.महानगरातील औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण, असुरक्षितता, असमानता, गर्दी, वेग, ताण-तणाव, दुभंगलेपण, हिंसाचार, दहशतवाद, स्वार्थ अशा कितीतरी जीवन घटकांना सामावून घेणारी, प्रभावीपणे मांडू पाहणारी जाणिव म्हणजेच महानगरीय जाणिव असते.

आधुनिक संस्कृतीचे प्रतीक म्हणून दहशतवाद, असुरक्षितता, भय, विषमता व संवेदनशून्यता याचे अविष्करण या जाणिवेतून होते.१९६० पर्यंत आधुनिकता होती. पण अशी महानगरीय जाणीव नव्हती, कारण व्यामिश्र अशा समाजरचनेत वरील गोष्टी आलेल्या नव्हत्या. १९८० नंतर ख-या अर्थाने नव्या आर्थिक काळाला सुरूवात झाली. त्याचा प्रभाव

साहित्यादी-कलांपासून सर्वत्र क्षेत्रावर झाला. नव्या सुधारणा घडल्या. विज्ञान-तंत्रज्ञानात प्रगती झाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामान्य माणसाचे शोषण होऊ लागले. सांस्कृतिक राजकारण, राजकीय परिस्थिती, गुंतागुंतीचे समाजवास्तव मांडू पाहणारी संवेदना व त्यातून निर्माण झालेले साहित्य म्हणून महानगरीय साहित्याचा प्रवाह रूढ होत गेला.

महानगरीय जीवन, त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल, व्यामिश्रता, महानगरीय जाणिवा, संवेदना, परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इत्यादी.

एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव हे महानगरीय जीवनशैलीचे महत्वाचे वैशिष्टय होय.सामुदायिक भावनेचा अभाव तेथे जाणवतो.महानगरात व्यक्तिला खाजगीपणा जपण्याकरीता अधिक अवकाश मिळतो. व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगता येते.आर्थिक विषमता प्राकर्षाने जाणवते. एक नवी वर्गीय मूल्यव्यवस्था - गरीब, मध्यमवर्ग व उच्चवर्ग महानगरात आकाराला आली आहे.महानगरे ही स्थलांतरितांनीच आकाराला आणलेली दिसतात. त्यामुळे हा स्थलांतरीत समूह आपली जात-धर्म-प्रांत-भाषा विसरत नाही .त्यामुळे पांरपारिक व आधुनिकतेचे मिश्रण आपल्याला महानगरात दिसते.महानगरांची व्यवस्थाच अशी असते की, लोकांमधल्या जाती-धर्माच्या सीमारेषा धूसर होतात. विविध भाषा, प्रांत, जाती-धर्माचा एक संमिश्र समाज महानगरात आकाराला येतो.सामाजिक व सांस्कृतिक विघटनामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. व्यक्तींमध्ये आत्मकेंद्रीवृत्ती, तटस्थवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत जाते. जागेची टंचाई, झोपडपट्टीत राहणारा मोठा समूह, आर्थिक प्रश्न, वाहतुक कोंडी, प्रदुषण, गुन्हेगारी अशी अनेक आव्हाने असतात.या सर्वांतून महानगरीय संवेदन तयार होते.

महानगरातून जगणाऱ्या माणसांची पाळेमुळे नष्ट झाल्याने स्वतःपासून, कुटुंबापासून व समाजापासूनही तुटलेपणाची भावना सामान्य माणसाच्या मनात निर्माण होते. भव्यदिव्य अशी कोणतीच स्वप्ने नसणारी किंवा तशी स्वप्ने बाळगल्यास ती पूर्ण होण्याची शक्यता धूसर असल्याने ही माणसे मानसिक व शारीरिक पातळीवर अतृप्ती भोगत राहतात. स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. परंतुत्यांच्या पदरी अपयश, वैफल्य किंवा मृत्यू येतो.

महानगरी समाजजीवनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महानगरातल्या माणसांच्या अस्तित्वातील निरर्थकता होय. कामगार, स्त्रिया, उघड्यावर जगणारी माणसे, निम्न - मध्यमवर्गीय समूह यांच्या जीवनातील भेदक वास्तवाचे चित्रण येते. येथे जगणाऱ्या माणसांच्या जगण्याला तसा काहीच अर्थ उरत नाही. कारण सततचा ताण - तणाव, भयग्रस्तता, भोगलालसा, असुरक्षितता, चंगळवाद यामुळे महानगरीय मानवी अस्तित्व निरर्थक वाटते.महानगरातील सामाजिक - सांस्कृतिक पर्यावरणामध्ये संवेदनशील माणसाची होणारी कोंडी एका बाजूला आणि ही कोंडी फोडून संघर्ष करीत स्वतःच्या अस्तित्वासाठी, अभिव्यक्तीसाठी झगडणारी माणसे कथेच्या केंद्रस्थानी आहेत. महानगरी समाजव्यवस्थेत सामान्य मध्यमवर्गीय माणूस नेहमीच शोषणाचा, अन्याय - अत्याचाराचा बळी ठरलेला आहे. पैसा या घटकाला आलेले अवास्तव महत्त्व, तो मिळविण्यासाठी होणारा गैरमार्गाचा वापर, सत्तासंघर्ष महानगरीय जीवनात दिसतो.

महानगरीय वास्तवाची ही विविध रूपे साहित्यातून व्यक्त होऊ लागली.महानगरांचा विस्तार जसजसा वाढू लागला, तसतसे समाजातील स्थितीगती- प्रमाणे महानगरीय संवेदनही बदलू लागले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील साहित्यातून महानगरीय जाणिवेचा आविष्कार

munotes.in

कविता, कथा आणि कादंबरी या साहित्यप्रकारातून झालेला दिसतो. गंगाधर गाडगीळ यांच्या 'बिनचेह-याची संध्याकाळ', 'किडलेली माणसे' अशा कथा आणि बा.सी. मर्ढेकर यांच्या कवितांमधून महानगरीय संवेदन सर्वप्रथम प्रकटलेले दिसते. पण पुढे १९६० नंतर या जाणिवांचा सशक्त आविष्कार लघुनियतकालिकांच्या पिढीतील लेखक-कविंनी केला. दि.पु.चित्रे चित्रे, अरूण कोल्हटकर, मनोहर ओक, सतिश काळसेकर, नामदेव ढसाळ, तुलसी परब, वसंत गुर्जर इ. च्या काव्यातून महानगरीय जाणिवांची विविध रूपे व्यक्त झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) महानगरीय जाणिवांचे साहित्य व त्याचे स्वरूप विशेष थोडक्यात स्पष्ट करा.

## १.ब.६.सारांश

माणसांच्या स्वभावाप्रमाणे त्यांच्या परिसराचा स्वभाव असतो आणि तो काळाबरोबर वेगाने बदलतही असतो .मुंबई महानगराला अफाट वेग होता .सत्तरऐंशीच्या दशका-पेक्षाही कित्येक पटीने आता तो वाढला आहे.जागतिकीकरण,उदारीकरण आणि खासगीकरणाच्या नंतर महानगरांचे स्वरूप व तेथील व्यवस्था आता आरपार बदललेली आहे .अत्यंत वेगाने झालेल्या बदलांमुळे अस्थिरता आली आहे .समोरचे वास्तव सत्य मानावे की आभासच आहे असे प्रश्न समोर उभे राहत आहे .गेल्या वीस पंचवीस वर्षांमध्ये जी नवीन वाटचाल सुरू आहे .त्यामध्ये शहरे व महानगरे या दोन्ही भूप्रदेशातील जनजीवनात मोठाच फरक पडला आहे .आर्थिक उन्नती व पर्यायाने सुखवस्तू उंची राहणीमान अधिक आल्याने त्यानुसार या समकालीन वास्तवाचे चित्रण महानगरीय साहित्यातूनहोताना दिसते आहे.

## १.ब.७.सरावासाठी स्वाध्याय/नमुना प्रश्न

१. महानगरीय जीवनाचे स्वरूप विशेष व त्याचे वेगळेपण याबाबत सविस्तर चर्चा करा.

२. महानगरीय जीवनाचे स्वरूप सांगून त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल याबाबत थोडक्यात विवेचन करा.

३. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच दृष्टीने महानगरांचे स्वरूप कसेबदलत गेले, याबाबत आढावा घेणे.

४. महानगरीयसंवेदन, व्यामिश्रता,परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता या मुद्यांची चर्चा करा.

५. महानगरीय कथा, कविता, कादंबरी, नाटक या प्रकारातील वैशिष्ट्यपूर्ण साहित्याचे स्वरूप व विशेषांची चर्चा करा.

## १.ब.८. संदर्भ ग्रंथ आणि पूरक अध्ययन/ अधिक वाचनासाठी पुस्तके

महानगरीय जीवन, त्यात कालपरत्वे घडत गेलेले बदल, व्यामिश्रता, महानगरीय जाणिवा, संवेदना, परात्मता, भयग्रस्तता, मूल्यभ्रष्टता, व्यक्तिकेंद्रीतता इत्यादी.


१. *'महानगरीयवास्तव: भारतीय कादंबऱ्यांसंदर्भात'* संपा.सुर्यकांत आजगावकर, ललित पब्लिकेशन, मुंबई.

२. *'कथा मुंबईच्या गिरणगावची',* नीराआडारकर व मीना मेनन, मौज प्रकाशन, मुंबई.

३. *'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य'*, 'जागतिकीकरण आणि मराठी भाषा व साहित्य' (लेख), प्रा.वसंत अबाजी डहाके, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४. महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य(लेख)- सप्रे अविनाश, (संपा.) नागनाथकोतापल्ले, *'साहित्य आणि समाज'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. *'मुंबई: काल आणि आज'* - संपादन मंजिरी कामत,अनुवाद - गिरीश जोशी.

६. *'मुंबईचे वर्णन'*- गोविंद नारायण माडगावकर - समन्वय प्रकाशन.


❖❖❖❖

munotes.in

# २

# महानगरीय स्थलावकाश आणि साहित्य निर्मिती

**घटक रचना :**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ महानगरीय साहित्य

२.४ महानगरीय समस्या आणि साहित्य

२.५ महानगरीय जाणिवा

२.६ महानगरीय साहित्यविषय

२.७ महानगरीय साहित्यातील अनुभवविश्व

२.८ साहित्यातील आशय

२.९ पात्रचित्रण

२.१० महानगरीय वातावरण – स्थलावकाश

२.११ घटना प्रसंग

२.१२ सामाजिक-सांस्कृतिक-स्पर्धात्म पर्यावरण

२.१३ महानगरीय वास्तव

२.१४ प्रतिमाविश्व

२.१५ भाषा

२.१६ महानगरीय साहित्याचे वेगळेपण

२.१७ सारांश

२.१८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.१९ संदर्भ

२.२० पूरक वाचन

२.२१ उपक्रम

munotes.in

## २.१ उद्दिष्टे

१. महानगरीय साहित्याचा परिचय करून घेणे.
२. महानगरीय समाज आणि साहित्य यांचा परस्परसंबंध तपासणे.
३. महानगरीय साहित्यातील अनुभवविश्व जाणून घेणे.
४. महानगरीय साहित्याचे वेगळेपण अभ्यासणे.

## २.२ प्रस्तावना

साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध असतो. या परस्परसंबंधातून समकालीन अनुभवविश्व साहित्यकृतींमधून व्यक्त होत असते. समाज ही एक परिवर्तनशील संस्था आहे. त्यामुळे 'बदला'ला अनुसरून मानवी जीवन ही परिवर्तीत होत असते. समाज ज्या अनुषंगाने आपली प्रगती करतो तसाच तो विकसित होत असतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपला देश वेगाने विकासाकडे वाटचाल करू लागला. या विकासाच्या प्रक्रियेत प्रथम मोठी शहरे आली. शिक्षण, उद्योग, राजकारण, अर्थकारण आदी क्षेत्रे विकास प्रक्रियेच्या टप्प्यात वेगाने आली. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे पुढे शहरांची महानगरे झाली. शहर, महानगर यांच्या संस्कृतीत आर्थिक स्तरावर तीन वर्ग (उच्च, मध्यम, कनिष्ठ) अस्तित्वात आले. त्यातूनच त्यांची विशिष्ट संस्कृती आकाररूप घेत गेली. महानगरांची विशिष्ट संस्कृती फ्लॅट, चाळ, झोपडपट्टी अशा स्वरूपात तयार होत गेली. महानगराच्या या संरचनेत सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य, राजकीय अनेक प्रश्न उद्भवले. शहरनियोजन, धर्मसंस्कृती जोपासना, आर्थिक व्यवहार आणि मानवी गरजा यांविषयीच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्या प्रतिभावंत, सर्जनशील लेखक, कवी यांनी साहित्यनिर्मितीच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून महानगरीय संवेदना आविष्कृत होत गेलेली आहे. विविध धर्म, भाषा, जाती-जमाती, प्रांत यांमधून महानगरीय अवकाश विशिष्ट आकाररूप घेऊ लागला. आज त्याला आपण 'कॉस्मॉपॉलिटन समाज' असे संबोधू शकतो. मुंबई, दिल्ली, हैदराबाद, धारवाड, गोवा यांसारख्या महानगरीय स्थलावकाशामध्ये हा कॉस्मॉपॉलिटन समाज आहे. तो अनेक साहित्यिकांनी साहित्यकृतीतील अनुभवविश्वातून साकारला आहे. तसेच महानगरांच्या सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, भाषिक पर्यावरणाचा आलेख कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारांमधून मांडला गेला आहे. महानगरीय अवकाशातील समस्यांची चर्चा या साहित्यप्रकारातून करण्यात आलेली आहे.

## २.३ महानगरीय साहित्य

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमुळे राजकीय, सामाजिक, आर्थिक समीकरणाला नवे रूप प्राप्त होत गेले. औद्योगिकीकरण, यांत्रिकता, अर्थकारण, यांचा वेध साहित्यविश्वाने घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच १९६० नंतर दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, महानगरीय असे विविध प्रवाह पुढे आले. हे साहित्यप्रवाह त्यांचे स्वतःचे असे 'स्वत्व' जोपासतात. या साहित्यप्रवाहातील साहित्यातून जे अनुभवविश्व व्यक्त झाले आहे ते 'स्वत्वा'ला केंद्रस्थानी ठेवून व्यक्त झाले आहे. तसेच शहरी अनुभवविश्व, भावविश्व ज्या

साहित्यकृतीतून व्यापकार्थाने व्यक्त होत गेले ते 'महानगरी' या संकल्पनेतून पुढे आले. महानगराचा कोलाज विविध घटकान्वये जो आकारास येत गेला, त्याचा वेध साहित्याने घेतला. साहित्य, कला यांमधून महानगरीय वास्तव पुढे आले. महानगरी साहित्यामधून जे अनुभवविश्व जाणवते ते महानगरी संवेदना, महानगरी जाणीव, महानगरी वास्तव यांना व्यक्त करणारे आहे.

### २.३.२. व्याख्या

ज्या साहित्यकृतीत महानगरातील विविध समस्यांची, महानगरी वास्तवाची कलात्म पातळीवर अभिव्यक्ती झालेली असते त्या साहित्यकृतीचा निर्देश महानगरी साहित्य असा करता येईल.  - प्रा. डॉ. पुष्पलता राजापुरे -तापस

## २.४ महानगरीय समस्या आणि साहित्य

महानगरांमध्ये विविध धर्माचे, जातीचे, पंथाचे, भाषेचे लोक असतात. ते आपापल्या धर्माचे, संस्कृतीचे जतन करीत असतात. या विविध धार्मिक, सांस्कृतिक घटकांना  राजकारणाचे आणि वाढते धार्मिकतेचे प्राबल्य प्राप्त होत आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्या समस्यांचे चित्रण साहित्यातून होते. चं. प्र. देशपांडे यांच्या ‘ढोलताशे’ या नाटकात सार्वजनिक गणेशोत्सवाची मिरवणूक या विषयावर चर्चा होताना दिसते. महानगरीय स्थलावकाशात ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण वाढते आहे हे आपणास ज्ञात आहेच. तोच मुद्दा या नाटकातही दिसतो. तसेच वाढती गर्दी, त्या गर्दीतही अनुभवाला येणारे एकटेपण मकरंद साठे ‘चौक’ या नाटकात अभिव्यक्त करतात. महानगरांमध्ये गर्दीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. महानगरीय समस्या, महानगरीय वास्तव याचे चित्रण साहित्यातून शब्दबद्ध होत आहे.

महानगरातील व्यक्ती स्वतःची ‘आयडेंटिटी’ सिद्ध करू पाहते आहे. विशिष्ट अशा वर्तुळात त्याला स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करायचे असते, ते करण्यासाठी अनेक चांगले-वाईट मार्ग स्वीकारले जातात. स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या भावनेतून अनेक ‘आयडेंटिटी क्रायसिस’मध्ये अडकतात. अशी आयडेंटिटी क्रायसिस ग्रामीण अनुभवविश्वात जाणवत नाही. महानगरातील व्यक्ती आपल्या वर्तुळात, समविचार, समकला अशा अनेक क्षेत्रातील व्यक्ती आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच स्पर्धा वाढत जाते. राजीव नाईक यांचे ‘साठेचं काय करायचं?’ हे नाटक किंवा मनस्विनी लता रवींद्र यांचे ‘सिगारेटस्’ ही नाटक यासंदर्भात सांगता येतील.

महानगरीय साहित्यातून व्यक्त होणारी जीवनशैली ही मेट्रोपोलिटिअन शहराशी निगडित आहे. अनेक भाषा-संस्कृती-समाज-धर्म हा शहराचा एक चेहरा आहे. या चेहऱ्याला बहुस्तर, बहुआयाम आहेत. मुलत: हे ‘बहुत्व’, ‘अनेकांगीपण’ महानगरांना प्राप्त होते ते म्हणजे बहुप्रांतीय समाजाच्या योगदानातून असे म्हणता  येईल. याचे उत्तम उदाहरण म्हणून आपणास मुंबई हे महानगर देता येते. भाऊ पाध्ये यांच्या साहित्यात मुंबई या महानगरातील माणसांची जीवनशैली अधोरेखित झालेली आहे. तसेच महानगरीय समस्यांचे दर्शन ही घडते. ‘वैतागवाडी’ या  कादंबरीतून राहत्या जागेचा प्रश्न ही समस्या मांडली आहे. ‘राडा’ या कादंबरीत खंडणीयुक्त हिंसाचार, ब्लॅकमेल करणारी माणसे यांचे अनेक संदर्भ येतात.

महानगरीय मनावर सभोवतालच्या विविध घडामोडी, घटना-प्रसंग, विविध विषयांवरील माहिती याचा भडिमार सतत होत असतो. याचा व्यक्तीच्या मनावर परिणाम होतो. याप्रकारचे वास्तवचित्रण बा. सी मर्ढेकर यांच्या 'रात्रीचा दिवस' मधील दिक्पाल या नायकपात्राद्वारे त्यांनी केले आहे. दिक्पालला प्रारंभी महानगर हे माहितीचा, प्रगतीचा स्रोत म्हणून पोषक वाटते; परंतु नंतर ते गुदमरूवून टाकणारे महानगर आहे, असे वाटते. तो वैफल्यग्रस्त, परिस्थितीशरण होत जातो, हे महानगरीय वास्तव आहे.



साठच्या दशकातील मुंबईचे दर्शन वसंत कानेटकर 'घर' या कादंबरीत करतात. मुंबईतील गर्दी, पोटार्थी वणवण करणारी सामान्य माणसे, टॅक्सी, बसला रांगेत उभी राहणारी माणसे हे वास्तव रेखाटतात. तसेच महानगराचे स्वतंत्र ध्वनी म्हणून लोकल ट्रेनचा आवाज, गिरणीतील भोंग्याचा आवाज, बसची धडधड यांचाही प्रत्यय या कादंबरीत येतो. तसेच महानगरातल्या माणसाच्या जगण्याचा एक भाग म्हणून कोणत्याही विषयावर कोठेही चर्चा करता येते, हा एक विशेष 'घर' या कादंबरीत येतो. काश्मीर प्रश्न, स्टर्लिंग प्रश्न, पंडित नेहरूचा अमेरिका दौरा आदी विषय चर्चेसाठी पात्र घेतात. महानगरातील माणसाला चर्चेसाठी, संवादासाठी कोणताही विषय पुरतो हेही येथे अधोरेखित होते.

## २.५ महानगरीय जाणिवा

मराठी साहित्यामध्ये महानगरातील जाणिवेच्या वा मराठी साहित्य आणि महानगरीय जाणिवा यांचा अनुबंध तपासण्याच्या उद्देशाने फारच अल्प लेखन झालेले आहे. दिलीप चित्रे, रा. ग. जाधव, चंद्रकांत पाटील, अविनाश सप्रे अशा काही अपवादात्मक साहित्यिक, समीक्षक यासंदर्भात सांगता येतील. गंगाधर गाडगीळ यांची 'किडलेली माणसं' ही कथा वा बा. सी. मर्ढेकर यांची कविता यंत्रमय, भयभीत असणारे महानगरीय जाणिवांचे भान आपल्या लेखनातून मांडतात. हे काही ठळक जाणिवेचे प्रथम उद्गार आहेत, असे म्हणता येईल.

महानगरीय कालावकाशातील व्यक्तिजीवन, समाजजीवन यांचा आविष्कार महानगरीय जाणिवेत होतो. महानगरात जाणवणारी असुरक्षितता, तुटलेपण, सभोवतालची अराजकता आदी समस्यांनीयुक्त घटक महानगरीय जाणिवेत येतात. एकूणच 'संमिश्र संस्कृती' हा महानगरीय जाणिवेचा एक महत्त्वाचा विशेष साहित्यातून व्यक्त होतो. १९८० नंतरच्या महानगरीय वास्तवाचा वेध घेणारे भाऊ पाध्ये हे एक महत्त्वाचे लेखक होत. त्यांच्या 'मुरगी', 'थालीपीठ', 'थोडीसी जो पी ली' यासारख्या कथांमधून हे वास्तव साकारते. मुंबई महानगरातील बहुजिनसीतता, वैशिष्ट्यपूर्ण भाषा, झोपडपट्टी, त्याला अनुसरून भाषा, सामाजिक - सांस्कृतिक - आर्थिक स्तर यांचे चित्रण होते. तर ह. मो. मराठे यांचे कथालेखन हे व्यापार-उद्योग, औद्योगिक संस्कृती यांचे दर्शन घडविते. तसेच मध्यमवर्ग, त्याची मानसिकता त्यांच्या कथाविश्वात येते. १९९०च्या कथालेखनात पंकज कुरूलकर, संजीव लाटकर, सुकन्या आगाशे आदी कथालेखकांनी महानगरीय जीवनाचे चित्रण केलेले आहे. सुखासिनता, मुक्त अर्थव्यवस्था, आत्ममग्नता, आत्मकेंद्रीवृत्ती आदी विषय, बदलती जीवनशैली, बदलता सामाजिक आशय घेऊन येतात. पंकज कुरूलकर यांचा 'रॅटरेस', 'तंत्रसोमा', संजीव लाटकर यांचा 'पासवर्ड', 'नॉट फॉर सेल' या दीर्घकथा, सुकन्या आगाशे यांचा 'इस्पितळ आणि पतंग उडवणारा माणूस' हे कथाविश्व यासंदर्भात पाहता येतील.

## २.६ महानगरीय साहित्यविषय

महानगरीय साहित्याचा विषयोनुरूप विचारविमर्श करता लेखक-कवी यांनी महानगरीय अवकाशाला कवेत घेणाऱ्या अनेक विषयांना साहित्यगत कालावकाशातून मांडलेले आहे. महानगर, बदलते महानगर, महानगरातील चंगळवाद, कॉस्मॉपॉलिटन समाज, असुरक्षितता, मानवाचे होणारे वस्तुकरण, औद्योगिकरण, बाजारीकरण, अमानुषीकरण, दहशतवाद, व्हर्च्युलीकरण, बदलती भाषाशैली आदी विषय साहित्याच्या केंद्रस्थानी आहेत. मनस्विनी लता रवींद्र यांच्या 'सिगारेट्स' या नाटकात प्रेम-ब्रेकअप, नैतिक-अनैतिक, मैत्री-प्रेम याविषयाच्या मनातील भावना वा गोंधळ या नाटकातील चार तरुण पात्रांच्याद्वारे मांडल्या गेल्या आहेत. महानगरातील बदलते जीवनमान, आजची नातेसंबंधविषयक विचारधारा याविषयीचे चिंतन करु पाहणारे हे नाटक आहे. तसेच हेमंत ढोमे यांचे 'लूज कंट्रोल' हे नाटक पौंगडावस्थेतील मुलांची भावनिक, मानसिक स्थिती, त्यांची सेक्सविषयीची उत्सुकता आदींना साकारते. हे नाटक तरूणाईचे, त्यांच्या शारिरीक आकर्षणाचे, प्रेमाचे, सेक्सकडे पाहण्याच्या मानसिकतेचे दर्शन घडविते. महानगरातल्या 'कॉलगर्ल' या विषयापर्यंत हे नाटक येते. प्रस्तुत नाटकातील आदित्य, मोनिष, ह्रषीकेश या तीन मध्यमवर्गीय मुलांची मानसिकता ते त्यांच्या 'कॉलगर्ल'ला घरी बोलावण्याच्या घटनेपर्यंतचा प्रवास या नाटकात अधोरेखित झालेला आहे. महेश एलकुंचवार यांच्या 'सोनाटा' या नाटकात महानगरात एकत्रित राहणाऱ्या स्त्रीया त्यांच्या वेगवेगळ्या वृत्ती, त्यांचे एकाकीपण यांचे चित्रण करतात. 'माणसांचे यांत्रिकीकरण होणे' या विषयाला मांडणारे नाटक म्हणजे 'व्हाइट लिली ॲण्ड नाइट रायडर' हे आहे. व्हर्चुअल चॅटिंग करणाऱ्या व्यक्ती स्वतःच पूर्णतः व्हर्चुअल होत आहेत. चॅटींगवर भेटणाऱ्या दोन व्यक्तींमधील संवाद आणि प्रत्यक्ष भेटायला आल्यावर एकमेकांना न ओळखणाऱ्या काहीशा प्रौढतेकडे झुकलेल्या व्यक्ती या नाटकात आहेत. भक्ती देशमुख आणि मिलिंद सोमण ही दोघेही लग्न करण्यापूर्वी परस्परांसाठी अनुरूप आहोत का? हे पाहण्याच्या दृष्टीने खरेतर चॅटींगवरचे मित्रमैत्रिणी आता विवाहबद्ध होऊ पाहत आहेत. हा 'आजचा' विषय हे नाटक घेऊन येते.

मराठी साहित्यजगतातील मराठी कथेने महानगर, महानगरात निर्माण होणारे ताण-तणाव, एकाकीपण, परात्मतेची जाणीव श्याम मनोहर, रंगनाथ पठारे, विलास सारंग, दिलीप चित्रे, जयंत पवार, समर खडस, प्रतिमा जोशी आदीलेखकांनी प्रकर्षाने मांडली आहे. भाऊ पाध्ये यांची 'देश पुढे गेला', समर खडस यांची 'बकऱ्याची बॉडी', 'रेताड', 'त्या तिथे..' इत्यादी कथा सांगता येतात.

मराठी कवितेचा विषय महानगर, महानगरीय माणूस, गर्दी, कामगार, प्रवासाची साधने, दहशतवाद, दंगे आदी झालेले आहेत. त्यातून शहराचा, महानगराचा विविधांगी कोलाज साकारला गेला आहे. पठ्ठे बापूराव, अण्णाभाऊ साठे यांनी मुंबई महानगराचे चित्र मुंबईवर लावणी रचून त्यामधून रेखाटले आहे. तर कामगार वर्गाचे चित्रण विंदा करंदीकर 'मुंबई', नारायण सुर्वे यांच्या 'मुंबई', 'गिरणीची लावणी' आदी कवितेतून महानगर, महानगरातील कामगार चित्रित होताना दिसते. तसेच दहशतवादी वातावरण, दंगे, भितीसदृश्य परिस्थिती आदींचे चित्रण रघु दंडवते यांच्या 'दंग्याच्या दुसऱ्याच दिवशी', हिमांशु कुलकर्णी यांची 'शहर: एक कबर', नामदेव ढसाळ यांच्या 'क्राय टू मुंबई', नीरजा यांची 'स्फोट', वर्जेश सोळंकी यांची 'सव्वीस अकरानंतर' आदी कवितांमधून केले आहे. महानगरीय संवेदनेचा एक व्यापक

पट कवितांमधून साकारलेला दिसतो. बा. सी. मर्ढेकर यांनी महानगरीय संवेदनच्या कक्षा वाढवल्या तर अरुण कोलटकर यांनी महानगरी संस्कृती आणि तिच्या भयावहता याचे थेट दर्शन घडविले. महानगरी संस्कृतीचा विनाशकारी चेहरा, तेथील भ्रष्टता यांचे वास्तव चित्रण अरुण कोलटकरांच्या कवितेत येते. त्यांच्या 'मुंबईनं भिकेस लावलं' या कवितेत आत्मिक अत्यवस्थता ते निर्णय असा प्रवास कथन होताना दिसतो. "महानगरीय जीवनाचे काही महत्त्वाचे घटक सांगायचे तर ते असे - औद्योगिकीकरण आणि यांत्रिकीकरण, असुरक्षितता आणि अनिश्चितता, अमानवीकरण आणि अमानुषीकरण, क्षणैकता आणि अनित्यता, व्यावसायिकता, कॉस्मॉपॉलिटन,आधुनिक, पोटसंस्कृतीचे सह-अस्तित्व आणि सरमिसळ, गर्दी आणि वेग, मध्यम संस्कृतीचा प्रभाव, प्रतिमा संस्कृतीचा प्रभाव (इमेज प्रोजेक्शन), व्यक्तिवादी दृष्टीकोन, गर्दीत हरवलेला चेहरा, वैश्विककारकांचा त्वरीत प्रभाव, जगण्यातले ताणतणाव आणि टिकून राहण्याची (survival-instinct) गरज, अमानवी दुभंगलेपण, पाश्चात्य प्रभाव, पृष्ठस्तरीय शांतता आणि अंतःस्तरीय स्फोटकता, परात्मता या अशा घटकांच्या जोडीलाच गेल्या दशकभरात गतिमान झालेले आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण, मुक्त बाजारपेठ, वाढता उपभोक्तावाद, नवमध्यमवर्गाचा उदय, दहशतवाद - हिंसाचार आणि माहिती-तंत्रज्ञानाचे महामायाजाल, एंड ऑफ आयडियालॉजीज इत्यादी नव्या प्रभावी घटकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम महानगरीय जीवनशैलीवर होऊ लागला आहे." (साहित्य आणि समाज, संपा. प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य - अविनाश सप्रे,पृ. २००) या महानगरीय जीवनशैलीला लेखक- कवी यांनी आपल्या कलाकृतीतून साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. महानगरीय अवकाशातील जगण्याला, सभोवतालच्या वास्तवाला मराठी साहित्यातून 'स्वर' प्राप्त झालेला दिसतो. दिलीप चित्रे, अरूण कोलटकर, सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ, मल्लिका अमरशेख या कवींनी महानगरीय जाणिवांची विविध रूपे साकारलेली आहेत.

## २.७ महानगरीय साहित्यातील अनुभवविश्व

महानगरीय साहित्यातून जे जीवन वास्तव साकारले आहे. ते महानगराला कवेत घेणारे आहे. महानगरीय संरचनेतील मानवी जीवन विविधांगी आहे, त्यामध्ये वरीष्ठ ते कनिष्ठ अशा स्तरातील लोकजीवनाचे जीवनमान आहे. महानगरातील या लोकजीवनाच्या कनिष्ठ स्तरातील जीवनमानाचा विचार केला तर अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबरच आरोग्य,शिक्षण, पाणी या समस्याही आहेत. शंकरराव खरात यांच्या 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'फूटपाथ नं१'; जयवंत दळवी यांची 'चक्र' या कादंबऱ्यांमधून उपरोक्त समस्यांची स्तिथीगती अधोरेखित झालेली आहे.

मुंबई या महानरातील वाढते औद्योगिकिकरण आणि मानवी जीवन यांचा परामर्श घेता अनेक समस्या प्रत्ययास येतील. 'निवारा' हा मानवासाठी अत्यावश्यक असलेला स्थलावकाश आहे. परंतु त्याची योग्यप्रमाणे पूर्तता त्याला करता येईलच असे नाही. यासंदर्भात गिरणी कामगारांचे अनुभवविश्व नारायण सुर्वे यांच्या कवितेतून साकारलेले आहे. तसेच भाऊ पाध्ये यांची 'वैतागवाडी'; ह.मो.मराठे यांची 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी'; प्रभाकर पेंढारकर यांची 'अरे संसार संसार' या कादंबऱ्यांमधून कनिष्ठ वर्गीय लोकांची निवाऱ्यासाठीची धडपड आणि त्याच्या जीवनावर होणारे परिणाम कथन केले आहेत. त्याचप्रमाणे औद्योगिकीकरणाच्या यंत्रयुगीन जगण्याने परात्म पावलेला मानवी समूह, त्याचे जगणे अनेक शोकसंवेदना व्यक्त

करणारे आहे. हे अनुभवविश्व बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेतून साकारले आहे. बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेत माणसाच्या यंत्रवत जीवनाला आणि त्या जीवनाविषयीच्या अस्वस्थतेला स्थान आहे. ‘पिपांत मेले ओल्या उंदीर’, ‘मी एक मुंगी’, ‘किती तरी दिवसांत’ इत्यादी कवितांमधून हे अनुभवविश्व साकारले आहे. तसेच महानगरीय अवकाशातील बकालपण, भीतीयुक्त जगणे, बदलती मानसिकता, महानगरातील विरूपता यांचे दर्शन ‘जिथे मारते कांदेवाडी’, ‘पंक्चरली जरि रात्र दिव्यांनी’, ‘काळ्या बंबाळ अंधारी’ या कवितांमधून घडविले आहे. अरूण कोलटकर, सदानंद रेगे यांच्या कवितेतून मानवी खच्चीकरण, अमानवीकरण, परात्मता या आशयसूत्रांद्वारे महानगरातील माणसाचे जगणे साकारले आहे. महानगर, महानगरातील घटिते यांचे असंगत चित्रण दिलीप चित्रे, मनोहर ओक, विलास सारंग यांच्या कवितांमधून होताना दिसते. त्यामध्ये एकाकीपण, संवादशून्यता, असंबध्दता, अस्वस्थता, परात्मता यांचा प्रत्यय येतो. १९९० नंतरचे हेमंत दिवटे, श्रीधर तिळवे, मंगेश नारायण काळे, वर्जेश सोलंकी, संजीव खांडेकर, सलील वाघ आदी कवींच्या कविता वास्तवप्रश्न साकारणारी आहे. महानगरातील स्पर्धा, रोजगार उपलब्धी, गतीमानता, महानगराचे दिवस-रात्र जगणे, समास्याग्रस्त जीवन या वैशिष्ट्यानी युक्त अशा महानगरीय साहित्याचे अनुभवविश्व एकवटलेले दिसते.

महानगरांच्या स्थलावकाशातील मानवी जीवनाचा ‘रेल्वेप्रवास’ हा एक महत्वाचा अविभाज्य घटक आहे. रेल्वे, रेल्वेचा प्रवास, तेथील माणसे, गर्दी आदी विषय अनेक साहित्यकृतीतून व्यक्त झालेले आहेत. अरुण म्हात्रे, बा. सी. मर्ढेकर, नीरजा आदी कवींच्या कवितेत फलाटावरची गर्दी आणि त्याभोवतीचा सभोवताल हे महानगरीय जीवनाचे संदर्भ येतात. हे संदर्भ मानवी जीवनाला किती व्यापून राहिलेले आहेत त्याचे दर्शन येथे घडते. 'मी एक मुंगी' या कवितेत बा. सी. मर्ढेकर मुंबईतील लोकलचे आणि मानवाचे जगणे यांचे नाते पुढीलप्रमाणे मांडतात.

"दहा दहाची लोकल आली
सोडित आली पोकळ श्वास;
घड्याळ्यांतल्या काट्याचा अन्
सोंदा पडला दीन उदास."

तर नीरजा आपल्या 'महिला स्पेशल' या कवितेत महानगरीय स्त्रीच्या लोकल ट्रेन मधील प्रवासाचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात.

"भरगच्च हिंदकळणारा बायकांचा डबा
श्वासात मिसळताना अनेक श्वास
ऐकू येतात एकमेकींच्या काळजाची स्पंदनं
त्या समजू शकतात एखादीचं हिंस्त्र होणं
चढताना धक्का लागला तर
किंवा दुसरीचं निमूट बसणं युगानुयुगं
स्फोटक परिस्थितीतही."

हे महानगरीय स्त्रीचे वास्तव या अनुभवविश्वातून नीरजा मांडताना दिसतात.

महानगरात जातवास्तव, स्त्री शोषण या प्रश्नांना अनेक साहित्यिकानी अनुभवविश्वातून मांडले आहे. नामदेव ढसाळ, अरुण काळे, नीरजा यांची कविता तर माधव कोंडविलकर यांची ‘देशोधडी’, बाबुराव बागूल यांची ‘सूड’ ह्या कादंबऱ्या आणि ‘अधांतर’ हे नाटक आदी कलाकृतीतून हे अनुभवविश्व जाणवते. गिरणगाव, गिरणी संप, गिरणी कामगार, भावी पिढी आदी घटक ‘अधांतर’ नाटकाच्या अनुभवकक्षेत असलेले दिसतात. तसेच मुंबई महानगरातील अराजकता आणि सर्वसामान्य व्यक्तींचे झालेले राजकियीकरण त्यातून त्यांचे होणारे परात्म जीवन भाऊ पाध्ये ‘वासुनाका’, ‘राडा’ या साहित्यकृतीतील अनुभवविश्वातून रेखाटतात.

१९८० नंतरच्या काळात औद्योगीकरणाचा वेग, महानगरांचा विस्तार होऊ लागला. या महानगराच्या विस्तारात महानगरीय कनिष्ठ वर्ग वेशेवर फेकला गेला. बांधकाम व्यवसायिक आणि सामान्य कनिष्ठ वर्गीय माणूस यांमध्ये संघर्ष वाढत गेले, याचे वास्तव चित्रण जयंत पवार यांच्या 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकात करतात. महानगरीय साहित्यातील अनुभवविश्वात वाढता भ्रष्टाचार, वाढती गुंडगिरी, राजकारणाचा असलेला सहभाग आणि नैराश्यग्रस्त होत गेलेला सामान्य माणूस महानगरीय अनुभवविश्वाचा भाग झालेला दिसतो. अरुण कोलटकर यांच्या कवितेचे अनुभवविश्व महानगरीय जीवन जाणिवायुक्त आहे. औद्योगिक क्रांती, आर्थिक सुबत्ता शहरी मानवी जगण्यातील विषमता, बेकारी, शोषण या बरोबरीनेच मानवाचे परात्मीकरण, 'स्व'अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठीच सर्वोतोपरी केले जाणारे प्रयत्न त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात. ‘बिल्डिंग’, ‘ॲनिमेशन’, ‘रद्दी’ या कविता भयाचे दर्शन घडवितात.

महानगराच्या अवकाशातील नातेसंबंधावर प्रकाशझोत टाकणारे नाटक म्हणजे सचिन कुंडलकर यांचे 'छोट्याशा सुट्टीत' हे होय. स्त्रीपुरूष, पुरूष- पुरूष असे विविध नातेसंबंध या नाटकातून साकारले आहेत. गे, लिव्ह- इन रिलेशनशिप, स्त्रीमुक्ती चळवळीतील स्त्रीया हे ज्वलंत विषय या नाटकातून चित्रित झाले आहेत. तसेच मकरंद साठे यांचे 'चौक' हे नाटक भीतीच्या छायेत असणाऱ्या माणसाचे दर्शन घडविते. 'ट्रॅफिक जाम' या आकृतीबंधात बांधलेले हे नाटक अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच राष्ट्रीय पातळीवरच्या समस्यांच्या विचारांचे दर्शन घडविते.

## २.८ साहित्यातील आशय

'महानगर' ही संकल्पना युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस अस्तित्वात आली तर भारतात ती विसाव्या शतकात आली. 'महानगर' मुख्यत्वे 'औद्योगिक' क्रांतीशी निगडित असलेली संकल्पना आहे. भारतात शहराचे महानगरात रूपांतरण होण्यास हीच औद्योगिक क्रांती महत्वाची ठरलेली आहे. मुंबई, दिल्ली, कोलकाता, मद्रास यांसारख्या शहरात औद्योगिकीकरणाचे जाळे फारच विस्तारक रूप घेऊन आले. उद्योग-व्यवसाय, नोकरी या निमित्ताने ग्रामीण, शहरी भागातील व्यक्ती, त्यांचे समूह महानगरांकडे आले. म्हणून महानगरांची लोकसंख्याही वाढत गेली. त्यांची 'मानसिक घडण' सुद्धा या महानगरातील अवकाशाला धरून होत गेली. दीर्घकाळचे त्यांचे वास्तव्य त्यांच्यातील बदलाला कारणीभूत ठरले. गर्दी आणि गर्दीतील एकाकीपण, संवादांमधील तुटकपणा, यांत्रिकता, परात्मता आदी बाबी त्यांच्या जीवनात घडू लागल्या. उपरोक्त घटकान्वये त्यांचे अनुभवविश्व घडत गेले.

त्यामुळे एकप्रकारचा ताणही त्यांच्या जीवनात निर्माण झाला. त्याचे चित्रण महानगरीय साहित्यातून अधोरेखित होत गेले आहे. एकाकीपणा, अर्थशून्यता, परात्मभाव, संवादशून्यता, तुटकपणा, ताण-तणाव, अस्वस्थता त्याचबरोबर अमानवीकरण, अमानुषता आदी सूत्रे साहित्याच्या आशयकेंद्री आली. त्याचबरोबर 'आधुनिकता' हे तत्त्व साहित्यातून साकारले गेले आहे. "साहित्याच्या संदर्भात योजली जाणारी 'महानगरीय संवेदनशीलता' ही एक आशयात्मक कोटी आहे. तिच्या साहाय्याने विशिष्ट साहित्यकृतीतील आशयाचे, आशयसूत्राचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे, ते स्पष्ट केले जाते. ही कोटी पूर्णपणे वर्णनात्मक स्वरूपाची आहे. ही मूल्यमापनात्मक कोटी नव्हे. तिच्या साहाय्याने विशिष्ट साहित्यकृतीतील आशय वा आशयसूत्रे यांचा चांगले - वाईटपणा निश्चित करता येत नाही." (मराठी कवितेतील महानगरीय संवेदनशीलता : एक टिपण, वसंत पाटणकर, सर्वधारा, वर्ष ३ रे अंक ३ रा, जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २००९, संपादक डॉ. सुखदेव ढाणके, अमरावती, पृष्ठ १) महानगरांच्या जडणघडणीत यांत्रिकीकरणाचा सहभाग मोठा आहे. महानगरी कामगार यांत्रिकीकरणाशी जोडला गेला आहे. त्यातूनच त्याच्या वाट्याला यंत्रवत जगणे आले. याचा परिणाम तो परात्म होत गेला. बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेत ही परात्मता व्यक्त झालेली आहे. तसेच नारायण सुर्वे आपल्या कवितेतून महानगरीय कामगार वर्गाचे जगणे मांडतात. 'मुंबई','बरं का रे पोरा' या कवितांमधून नारायण सुर्वे कामगार वर्ग, श्रमिक यांचे महानगराच्या निर्मितीतील योगदान अधोरेखित करतात. तसेच अहोरात्र जागे राहणारे महानगर 'शीगवाला', 'पोष्टर', 'माझे विद्यापीठ' या कवितांमधून ते मांडतात. तसेच वसंत गुर्जर यांच्या 'गोदी, अरण्य, समुद्र' या संग्रहात कामगारांचे निरस आणि सत्त्वहीन जीवन अधोरेखित झाले आहे. हातगाडीवाले, हुकवाले हमाल, बैलगाडीवाले अशा एकूणच कष्टकऱ्यांचे जीवनचित्रण मांडले गेले आहे.

जयंत पवार यांचे 'अधांतर' हे नाटक कामगारांचे चाळीतील जीवनवास्तव मांडणारे आहे. मुंबईतील गिरण्या बंद पडल्याने गिरणी कामगार आणि त्याचे कुटुंबीय यांची कशा वाताहत झाली त्याचे दाहक भान हे नाटक देते. गिरणी कामगारांच्या संपामुळे 'अधांतर'मधील धुरी कुटुंबाची झालेली वाताहतही एकूणच मुंबईतील गिरणी कामगार वर्गाच्या जीवनाचे प्रतिनिधिक रूप आहे. मुंबईतील गिरण्या बंद पडल्यानंतर त्या जागी मॉल्स, व्हिडिओ पार्लर्स, कमर्शियल कॉम्प्लेक्सेस, कार्पोरेट ऑफिसेस आज उभी राहिलेली दिसतात. हे आजचे महानगरीय वास्तव आहे.

## २.९ पात्रचित्रण

महानगरी अवकाशात मानवाची स्पर्धा वाढत चाललेली आहे. त्यातून मनात एकमेकांविषयीचा तिरस्कार ही निर्माण होतो आहे. यशस्वी व्यक्तीचा गौरव दुसऱ्या व्यक्तीला मान्य होत नाही, त्यावेळी एक पराकोटीचा अस्वस्थपणा व्यक्तिना येतो आहे. याविषयीचे चित्रण राजीव नाईक यांच्या 'साठेचं काय करायच' या नाटकातून होताना दिसते. साठ्येला डॉक्युमेंटरी क्षेत्रात मिळणारे यश ॲडफिल्मस बनविणाऱ्या अभयला मिळत नाही. महानगरातल्या कंपूशाही वर्गामुळे साठेला सतत यश नावलौकिक प्रसिद्धी मिळते आहे असे अभयला वाटते. त्यामुळे सतत दुय्यम स्थान मिळणाऱ्या अभयला साठेविषयी प्रचंड तिरस्कार आहे. अभय साठेशी आपली स्वतःच स्पर्धा लावतो आणि पुढच्या तीनेक वर्षात वेगवेगळी क्षेत्रे धुडाळून पाहतो. पण त्याला हवे तसे यश,नावलौकिक मिळत नाही. एकप्रकारे

तो अयशस्वी होतो. एकूणच स्पर्धेच्या युगात आपल्या कलाकृतीचा निर्मळ आनंद कलावंतांना घेता येत नाही, हे वास्तव येथे पात्रचित्रणातून रेखाटले आहे.

कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक रेड लाईट एरियाला स्त्रीयांनी जवळ केलेले दिसते. शहरातील स्थलांतरितांचे अतृप्त कामजीवन या परिसरात शमविले गेले. कुटुंबाची आर्थिक गरज भागविण्यासाठी या स्थलावकाशाला मनाची तयारी नसतानाही अनेक स्त्रियांनी स्वीकारले. हे अनुभवविश्व नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त झालेले आहे. तसेच कविता महाजन यांच्या 'भिन्न' कादंबरीतून रेड लाईट एरियामधील स्त्रीजीवन किती हालअपेष्टांचे असते ते पात्रांच्या उक्तीकृतीतून अधोरेखित केले आहे. तसेच अनिल बर्वे यांच्या 'हमिदाबाईची कोठी' या नाटकात बदलाच्या परिस्थितीत निर्माण होणारे प्रश्न साकारले आहेत. महानगरातील कौटुंबिक स्थलावकाशातील स्त्री जीवनाचे संदर्भ अनेक साहित्यकृतीतून आलेले आहेत. उदाहरणार्थ, मेघना पेठे यांची 'नातिचरामि', शांता गोखले यांची 'रिटा वेलिणकर', कविता महाजन यांची 'भिन्न' या साहित्यकृती पाहता येतील. तसेच सतीश काळसेकर, नारायण सुर्वे, मलिका अमरशेख, नामदेव ढसाळ आदी कवींनी महानगरातील स्त्रीच्या व्यथा- वेदनेचे वास्तवपूर्ण चित्रण केले आहे. सतीश काळसेकर यांची 'इंद्रियोपनिषद' या काव्यसंग्रहात महानगरातील वेश्यावस्तीचे वास्तव चित्रण करतात. तेथील उपेक्षित स्त्रीवर्गाची व्यथा मांडतात. आ. ना. पेडणेकर यांच्या 'कविता आ. ना. पेडणेकर' या काव्यसंग्रहातील 'लोकलमधे' या कवितेत महानगरातील स्त्रीच्या पळत्या-वेगवान जीवनाचे करुणमय चित्रण करतात.

प्रिया तेंडुलकर यांच्या कथेतील स्थलावकाश शहरी जीवनाशी निगडित आहे. 'मुंबई-पुणे', 'लंडन' (नकटीच्या लग्नाला), 'अमेरिका' (फर्टिलिटी क्लिनिक), 'शिकागो' (ठकुबाई जळगाववाले) इत्यादी. या कथांमधून शहरी, महानगरी वातावरणातील स्थल, परिसर कल्पिला गेला आहे. महानगरातील मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय पांढरपेशा, सुरक्षित वर्ग त्यांच्या बहुतांश कथेत येतो. त्यातून महानगरातील सामाजिक-सांस्कृतिक परिसरातून विशिष्ट वर्गाचे दर्शन घडविते. तसेच मेघना पेठे यांचे कथालेखन १९९० नंतरचे आहे. या काळातील मुंबई, पुणे या प्रगत समजल्या जाणाऱ्या महानगरातील जीवनसंदर्भ अनुभवविश्वात गुंफले आहे. त्यांच्या कथांमधील पात्रे सुशिक्षित, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेली दिसतात. त्यामुळे पात्र आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. 'स्वातंत्र्य' हा महानगरातील जीवनाचा एक महत्वाचा विषय आहे. तो मेघना पेठे यांचा कथांतून दिसतो. 'समुद्री चहुकडे पाणी' मधील निवेदकपात्र, 'होआवे लागे' मधील केसकर, 'आएँ कूछ अब्र..' मधील लेक्चरर, ही स्त्री पात्रे स्वतंत्रपणे राहत स्वतंत्रपणे निर्णय घेणारी आहेत. तर 'आस्था आणि गवारीची भाजी!' या कथेतील मिथिला हे पात्र लग्न न करण्याचा निर्णय घेत स्वतंत्रपणे राहते. गौरी देशपांडे यांच्या कथा साहित्यात शहरी, उच्चशिक्षितांच्या जीवनानुभवांचे दर्शन घडते. देश-विदेशातील स्त्री-पुरुष पात्रे त्यांचे एकमेकांशी असलेले मोकळे संबंध, बिनधास्तपणा याचे चित्रण करतात.

## २.१० महानगरीय वातावरण – स्थलावकाश

महानगरीय साहित्यातील कथानके ही महानगराचा परिसर अधोरेखित करणारी आहेत. झोपडपट्टी, फूटपाथ, चाळ, मोठमोठ्या सदनिका, बंगले, फ्लॅट याबरोबरच रेड लाईट एरिया, महाविद्यालये, मंत्रालय, सरकारी कार्यालये, कार्पोरेटस कार्यालये, इत्यादी स्थालवकाशात अनेक घटना प्रसंगाची निर्मिती कल्पिलेली आहे. हे स्थलावकाशीय संदर्भ अनेक साहित्यकृतीतून आलेले आहेत. ग्रामीण भागातून येणारे कष्टकरी लोक कामाच्या शोधार्थ शहराकडे येतात तेव्हा ते फूटपाथ, झोपडपट्टी यांना जवळ करतात. तेथेच ते वास्तव्यासाठी 'निवारा' निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. हे 'चक्र' (जयवंत दळवी), 'झोपडपट्टी', 'हातभट्टी', 'फूटपाथ नं१' (शंकरराव खरात) 'सूड' (बाबूराव बागुल) 'माहीमची खाडी' (मधु मंगेश कर्णिक) यांसारख्या अनेक कादंबरीगत कालावकाशात प्रत्ययास येते. वाढते शहर, वाढती लोकसंख्या, झोपडपट्ट्यांची होणारी वाढ, नागरी सुविधांचा अभाव इत्यादी महानगरीय समस्या या स्थलकालावकाशातून व्यक्त होतात. नीरजा यांच्या कथाविश्वातील परिसर ग्रामीण आणि महानगरीय असा संमिश्र आहे. त्यांच्या कथांमधील नायिका सुशिक्षित, मध्यमवर्गीय वैचारिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या प्रगल्भही आहेत. जे 'दर्पणी बिंबले' (२०००), 'ओल हरवलेली माती' (२००६) या कथासंग्रहातील कथागत अनुभवविश्वातून पारंपरिक मूल्यांना नकार दिला आहे. तसेच स्त्री- पुरुष नातेसंबंधाचा सूक्ष्म विचार केला आहे.

भाऊ पाध्ये यांची 'वैतागवाडी' ही कादंबरी महानगरातील घराच्या प्रश्नावर प्रकाशझोत टाकणारी आहे. मुंबईत नोकरीपेक्षा घराचा प्रश्न किती गंभीर असतो याचे दर्शन या कादंबरीतील श्रीकांत या तरुणपात्राच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आला आहे. तसेच मधू मंगेश कर्णिक यांच्या 'माहिमची खाडी' या कादंबरीत मुंबईतील झोपडपट्टी तेथील किळसवाणे वाटणारे जीवन, लाचारी, दारिद्र्य या बाबींवर प्रकाश टाकलेला आहे. महानगरातल्या झोपडपट्टी मधील लोकांचे स्थलांतर, राजकीय हस्तक्षेप आणि गुंडगिरीचा वापर करीत कशाप्रकारे केले जाते याचे दर्शन येथे घडते. तसेच मुंबई मधील चेंबूरची झोपडपट्टी उठवण्यासाठी जे प्रयत्न केले गेले त्याचे चित्रण ह. मो. मराठे यांनी 'प्रास्ताविक' या कादंबरीत केले आहे. ॲड. रमेश सत्राळकर यांनी 'अलोन अंगेन्स्ट रोम' या कादंबरीतून शहरातील गुंड, शार्पशूटर, दादा- भाईगिरीवाले लोक कसा व्यवहार करतात याचे चित्रण केले आहे.

महानगरांमध्ये अनेक धर्म-जात-पंथ-प्रांत मधील लोक राहतात. त्यामुळे स्वतःच्या समाजानुसार अनेक सण उत्सव साजरे करीत आपले वेगळेपण, संस्कृती जोपासत असतात. चं.प्र. देशपांडे यांनी 'ढोलताशे' या नाटकातून पुण्यातील गणपती उत्सवातील मिरवणूकांचे स्वरूप मांडले आहे. त्यातून महानगरांमधील उत्सवी वातावरण आणि प्रदूषण समस्या समोर ठेवण्याचा प्रयत्न केला. या नाटकातील अक्षय अवंतीला म्हणतो, "आणि गंमत म्हणजे तुला धुराच्या प्रदूषणाचं कळत पण ध्वनीप्रदूषण, गुलालप्रदूषण याच कसं लक्षात येत नाही? आणि मनसारखं उत्सवात गुंतल्यामुळे आणि अशाप्रकारे मनाला उत्सवाचं प्रदूषण झाल्यामुळे आयुष्याची काय हानी होते हे कसे कळत नाही? मन अतिरेकी व्हायचं कारण आहे हे एक!" हे महानगरांमधील उत्सवोन्मुख वातावरण शरीरावर आणि

मनावर परिणाम करणारे आहे. महानगरांमधील सार्वजनिक गणपती उत्सव आणि त्याचे सद्य:कालीन स्वरुप याविषयीची चर्चा या नाटकातील वातावरणातून होताना दिसते.

## २.११ घटना प्रसंग

महानगरीय साहित्यात झोपडपट्टी, चाळ, त्यामधील खुराड्यावजा खोल्या, रस्त्यावरच्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थांच्या गाड्या, हॉटेल, सेक्सवर्कर आदी स्थलावकाश येतो. या स्थलावकाशातील मानवी जगणे निकृष्ट दर्जाचे असलेले दिसते. तर मोठमोठे टॉवर्स, एअरपोर्ट, पंचतारांकित हॉटेल्स, मॉल्स स्थलावकाशतील मानवी जीवन हे उच्चदर्जाचे पहावयास मिळते. यातून महानगरीतील दोन विभिन्न संस्कृतीचे दर्शन घडते. यासंदर्भात 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'फुटपाथ नंबर१' (शंकरराव खरात), 'भर चौकातील अरण्यरुदन' (रंगनाथ पठारे), 'निळ्या डोळ्यांची मुलगी' (शिल्पा कांबळे) इत्यादी कादंबऱ्या पाहता येतील. तसेच महानगरातील मटक्याचे अड्डे, लेडीज बार, गॅंगवार, स्त्रियांचे लैंगिक शोषण, हप्ते घेणारे पोलीस, गुंडगिरी, बेकायदेशीर चालणारे धंदे, प्रसारमाध्यमे इत्यादी महानगराचे वास्तव आहे. ह. मो. मराठे यांच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी', 'हद्दपार', 'सॉफ्टवेअर', 'मार्केट' या कांदबऱ्यामधून एकाकीपणा, परात्मता व्यक्तीचे दुभंगलेपण जसे अधोरेखित होते तसेच लैंगिक अतृप्ती, नात्यातील ताणतणाव, स्पर्धा यांचे दर्शन ही घडते. 'सॉफ्टवेअर' आणि 'मार्केट' या कादंबऱ्यांमध्ये वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, स्वार्थ, क्रौर्य यांचे चित्रण सूक्ष्मपणे येते. गुरूनाथ धुरी यांच्या 'कॅफे आयडियल' या कवितेत जळून उद्ध्वस्त झालेल्या कॅफेचे वर्णन येते. त्यातून महानगरातील हिंसकता अधोरिखित होते. महानगर हे हिंसाचाराच्या भितीने सतत ग्रासलेले आहे. तसेच राजकीय उलथापालथ मोठ्या प्रमाणावर होत असते. अरूण साधू यांची 'सिंहासन' ही कादंबरी राजकिय घटना प्रसंगाची चर्चा घडवून आणते. या कादंबरीचा स्थलावकाश मुंबई आहे. मुंबई या स्थलकालावकाशात राजकारण, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर गुन्हेगारी,स्मगलिंग यांचे दर्शन घडवते. रात्र या कालावकाशातील जागत्या मुंबईचे अपरिचित दर्शन घडविले आहे.

अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' या कादंबरीत उच्चभ्रू संस्कृती चंगळवादीवृत्ती, राजकारण, राजकीय चढाओढ आणि वर्तमानपत्रे, सुखलोलुपता आदी विषय मुंबई महानगराचे वास्तव घेऊन येतात. तसेच त्यांच्या 'झिपऱ्या' या कादंबरीतही महानगरातील भीषण वास्तव चित्रित झालेले आहे. 'इस्पितळ आणि पतंग उडविणारा माणूस' (१९८९), 'न लिहलेली पाने' (१९९८) या दोन कथा संग्रहातून सुकन्या आगाशे यांनी महानगरातील माणूस संवेदनशून्य कसा बनतो, त्याच्या वाट्याला आलेले ताण-तणाव, अर्थशून्य जीवन याविषयीचे निर्देशन करणारे आहेत. उदा. 'कैदी' या कथेतील नायकाचा जीवनप्रवास नोकरी, लोकलचा प्रवास आणि स्वतःला 'ॲडजस्ट' करणे याभोवती होत गेलेला आहे. तो उदासीन होत एकाकी पडतो आणि शेवटी मानसिक रुग्ण होतो. ही महानगरीय जीवनातील उदासीनता अनेक घटनाप्रसंगातून येथे अधोरेखित झालेली आहे.

## २.१२ सामाजिक-सांस्कृतिक-स्पर्धात्म पर्यावरण

महानगरीय साहित्यातील सामाजिक पर्यावरण त्रिस्तरीय आहे. उच्च, मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ या स्तररचनेतून अनेकविध वास्तवाचा वेध साहित्यातून घेतला गेला आहे. परिचित

असणाऱ्या महानगराचा एक अपरिचित विद्रूप चेहरा अनेकांनी वाचकसन्मुख ठेवला आहे. अरूण कोलटकर यांच्या कवितेने ज्ञात महानगरीय सामाजिक-संस्कृतिक पर्यावरण प्रतिमांच्या माध्यमातून अपरिचित रूपात घडविले आहे. महानगरातील मध्यमवर्गीय, कनिष्ठ वर्गातील लोकांची घरे (खरेतर खोल्या) इराण्यांची हॉटेल, परप्रांतीय लोक, त्यांची भाषा, शहरातील उष्मा प्रतिमारूपाने येतात. तर ‘महानिर्वाण’ (सतिश आळेकर) नाटक माध्यमवर्गीय वर्गाचा स्थलावकाश, चाळकरी माणूस यांचे भावनिक, मानसिक पर्यावरण अधोरेखित करते. महानगरीय स्थलावकाशात अर्थव्यवस्था, राजकारण आणि स्पर्धा यांचा वेग दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे स्पर्धात्म जीवनशैलीचा प्रत्यय महानगरीय वातावरणातून येतो. एकमेकांविषयीची ईर्षा त्याचबरोबरीने व्यक्तिचा मानसिक संघर्ष वाढत गेलेला आहे. स्पर्धात्म जीवनशैलीत प्रत्येकजण आपापल्या यशापयशाची मोजदाद करू लागला आहे. त्यामुळे परस्परविरोधी संघर्ष निर्माण होत आहे. राजीव नाईक यांचे ‘साठेच काय करायच?’, विवेक बेले यांचे ‘माकडाच्या हाती शॅम्पेन’ या नाटकातून या प्रकारचे अनुभवविश्व साकारलेले दिसते. तसेच मुंबई महानगरात वाढती बिल्डर लॉबी, राज्यकर्ते यांचे राजकारण तीव्र गतीने वाढले गेले आहे. यांचा बळी मुंबईतला माणूस ठरला आहे. तो मुख्य महानगरापासून बाहेर फेकला जात आहे, याचे चित्रण जयंत पवार यांच्या ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकात झालेले आहे.

महानगरांमध्ये बहुधर्मियता, बहुसांस्कृतिकता आहे. त्याबरोबरीने जागतिकीकरणाने जीवघेणी स्पर्धा सुरू केली. त्यातून मतलबी हितसंबंध वाढत गेले. पर्यायाने संघर्षही वाढला. महानगरांचे रूप यातूनच पुढे अक्राळ विक्राळ होत गेले. या अशा अक्राळ -विक्राळ शहरात राहणारा माणूस स्वतःची ओळख अनेकांगी ठेवतो. समूहात राहताना त्याचा वेगळा चेहरा, व्यक्तिगत पातळीवर त्याचा वेगळा चेहरा या प्रकारच्या माणसांचे दर्शन मकरंद साठे ‘चौक’ मध्ये घडवतात. माणसे एकमेकांना कळेनाशी झाली आहेत. कारण त्यांच्यात संवादच उरलेला नाही, हे वास्तव  येथे समोर येत आहे. हे वास्तव आपणास दलित वा ग्रामीण साहित्यात त्यामानाने तीव्रपणे प्रत्ययास येताना दिसत नाही.

## २.१३ महानगरीय वास्तव

मराठी कादंबरीने महानगरीय वास्तवाचा वेध प्रामुख्याने घेतला आहे. त्यामध्ये महानगरातील सामाजिक-राजकीय वास्तव अनेक कादंबरीकारांनी मांडले आहे. अरूण साधू यांनी 'मुंबई दिनांक' या कादंबरीतून सामान्य माणसाचे जगणे, त्याची जगण्यासाठीची धडपड, सत्तांत लोक, सत्तेचे राजकारण, वाढती गुन्हेगारी, कामगार - शोषित वर्गाचे जीवन आदी घटकांद्वारे महानगराचे अक्राळविक्राळ रूप वाचकांसमोर ठेवलेले आहे. तसेच किरण नगरकर यांनी 'सात सक्कं त्रेचाळीस' या कादंबरीतून महानगरीय अवकाशातील जीवनाला प्राप्त होत असलेले एकटेपण, एकाकीपण, परात्मता,  जगण्यातील अर्थशून्यता, न-नैतिकता यांचे दर्शन घडविले आहे. महानगरातील मध्यमवर्गीयांचे जगणे, त्यांची जगण्यासाठीची धडपड, भोगवादीवृत्ती याचे चित्रण प्रभाकर पेंढारकर यांच्या 'अरे संसार संसार' आणि सुभाष भेंडे यांच्या 'अंधार वाटा' या कादंबरीतून झालेले आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि झपाट्याने होणारे स्थित्यंतर या वास्तवाचा संजीव खांडेकर यांनी 'अशांत पर्व' या कादंबरीतून मांडले आहे. ते उद्योगविश्वात होणारी उलाढाल, महानगराचे औद्योगिकीकरणामुळे होणारे परिवर्तन या कादंबरीतून साकारतात. झोपडपट्टी हा

महानगराच्या अवकाशातील एक व्यापक असा भाग आहे. त्याचे वास्तवपूर्ण चित्रण जयवंत दळवी यांची 'चक्र', मधू मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी' यातून झालेले आहे. भाऊ पाध्ये यांनी फार मार्मिकपणे महानगरीय वास्तवाचे चित्रण आपल्या लेखनातून केले आहे. त्यांचे कथनात्म लेखन हे महानगरातील समाजस्तर, मानवी जगण्यातील विविधतेला अधोरेखित करणारे आहे. उदाहरणार्थ, 'वैतागवाडी', 'वासूनाका', 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'राडा' या कादंबऱ्या यासंदर्भात सांगता येतील.

महानगरीय जाणिवा साकारणारे कवी दिलीप चित्रे आपल्या कवितेतून महानगराच्या अस्तित्वाचा विराट कोलाज वाचकसन्मुख ठेवतात. महानगरी जीवनातील भयावह वास्तवता दिलीप चित्रे 'मुंबई : अ साँग', 'ओड टू बॉम्बे', 'फादर रिटर्निंग होम' यासारख्या कवितांमधून मांडतात. महानगरी माणूस स्वत्व हरवत चालला आहे आणि दिशाहीन जीवन जगतो आहे. याबरोबरच थकलेल्या असहाय्य माणसाची करूण कहाणी ते कवितांमधून मांडतात. वाढत्या महानगराचा विस्तार, यंत्रयुगीन कालावकाशात होणारे अमानवीकरण आणि मानवी जीवन-व्यवहार यांचे दर्शन अरूण कोलटकर घडवितात. तर महानगरातील वाढत्या पिळवणूकीचे, संघर्षाचे, जुलमी-अन्याय स्वरूपाचे दर्शन वसंत गुर्जर आपल्या कवितेतून मांडतात. महानगरीय अवकाशातील राजकारणाचा प्रकर्षाने उच्चार करणारे तुलसी परब राजकीय गुंतागुंत, भ्रष्टाचार, कार्यकर्त्यांची मानसिकता, परिवर्तन संदर्भनिहाय मांडण्याचा प्रयत्न करतात. नारायण सुर्वे भांडवलदारी व्यवस्थेचे, कामगारांची जीवनशैली आणि शोषक-शोषित ही वर्गीय जाणिव आपल्या कवितेतून मांडतात. महानगरीय कोलाजातील दारिद्र्युक्त जीवनावस्थेत जगणाऱ्या लोकांचे जगणे नामदेव ढसाळ फार पोटतिडकीने व्यक्त करतात. तर मल्लिका अमरशेख आपल्या कवितेतून महानगरीय वास्तव मांडतात. नीरजा ही कवयित्री महानगरातल्या स्त्रीच्या जगण्यावर प्रकाशझोत टाकून तिचे दुय्यमत्वाचे जगणे, तिची दुरावस्था आपल्या कवितांतून मांडते.

## २.१४ प्रतिमाविश्व

मराठी कवितेत बा. सी. मर्ढेकर, शरदचंद्र मुक्तिबोध, नारायण सुर्वे, विंदा करंदीकर, सदानंद रेगे, नामदेव ढसाळ आदी कवी औद्योगिकीकरण, आधुनिकीकरण यांच्या परिणामांची चर्चा आपल्या कवितेत करताना दिसतात. महानगरातील बदललेल्या अनुभवविश्वाला, एकाकीपणाला त्यांनी प्रतिमेच्या रूपात व्यक्त केले. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांनी कामगार वर्गाच्या जाणीवा व्यक्त केल्या आहेत. १९६० नंतरच्या काळातील दिलीप चित्रे, प्रज्ञा पवार, अरूण काळे यांनी महानगरीय जगण्याला, तेथील वास्तवाला आपल्या कवितेतून अभिव्यक्त केले. 'आज'च्या कालावकाशात हरवलेली मूल्यात्मकता, व्यक्तीला आलेले 'वस्तूरूप',पाशवी क्रौर्य, हिंसा, असुरक्षितता, भयता, नैराश्य मांडलेले आहे. शहराची वास्तवता मांडताना दिलीप चित्रे 'मुंबईची आठवण' या कवितेत म्हणतात,

"ह्या भव्य शहरातल्या मुताऱ्यांचे वास, कपबश्यांचे आवाज,
इथल्या फुटपाथांवर जळणारी थोटकं, इथले ऱ्हस्व प्रवास,
इथल्या बयांच्या विटाळानं भिजलेले बोळे, प्रेतावरचे हार,
इथल्या वस्तीवस्तीत उधळला जाणारा दुःखाचा गुलाल,
मला क्षमा करोत माझ्या अपुऱ्या दिवसाच्या कविता."

तसेच सामाजिक विपन्नावस्थेचे दर्शनही प्रतिमांमधून व्यक्त होताना दिसते. उदाहरणार्थ, दिलीप चित्रे यांचा 'भुंड टेकाड' ही प्रतिमा निसर्गापासून दूर असलेल्या महानगराला, तेथील समाजजीवनाला अधोरेखित करणारी आहे. तसेच मुंबईचे बकाल जीवनानुभव, 'सार्वत्रिक' असल्याचा निर्वाळा त्यांच्या 'मुंबईची आठवण', 'चिंचपोकळी ते शिकागो' या कवितांतून ते मांडतात. कथनात्मकता, चित्रशैली यातून त्यांची प्रतिमाशैली आकार घेताना दिसते.

विलास सारंग यांची कविता ही 'अस्तित्व' मांडणारी आहे. त्यांची कविता पारंपारिक भाषिक रचनेला नाकारते आणि स्वतःची भाषा निर्माण करताना दिसते. कर्ता-कर्म-क्रियापद या वाक्यघटकांची रचनाशैलीची ती उलटापालट करते. तसेच वास्तवातील अनुभवांना प्राधान्य देतात आणि ते व्यक्त करताना प्रतिमांकित दृश्यात्मकता जोपासतात. उदाहरणार्थ, 'प्लॅटफॉर्मवरचे सायडिंगला टाकलेल्या डब्यासारखे टोकाला बसलेले महारोगी', 'खाटकाच्या हातून मरणाऱ्या बकऱ्याने टाकलेल्या लेंड्या' इत्यादी. तसेच नामदेव ढसाळ यांच्या 'गांडू बगीचा' या काव्यसंग्रहात अर्थगर्भ प्रतिमा येतात. उदाहरणार्थ, स्थितप्रज्ञ काळोख, कालचक्राची दीर्घ नजर, वैश्विकतेचे शेत, इत्यादी.

## २.१५ भाषा

महानगरीय अवकाशातील जीवनमानाचा विचार करता  माणसांची भाषा तुटक होत चालली आहे. बदलत्या काळानुसार भाषाही बदलत चालली आहे. मोबाईलच्या येण्याने 'एसमसएस' प्रमाणे माणसे बोलू लागली आहेत. वाक्यातील क्रियापदे लुप्त होत आहेत. पूर्णवाक्यात बोलण्याऐवजी  शॉर्टफार्मस वापरले जात आहेत. मनस्विनी  लता रवींद्र यांच्या 'सिगारेटस', राजीव नाईक यांचे 'साठेचं काय करायचं?', सचिन कुंडलकरयांचे 'छोट्याश्या सुट्टीत'ही नाटके संदर्भात सांगता येतील. महानगराचे अनुभवविश्व भाषेद्वारे बा. सी. मर्ढेकर यांनी 'रात्रीचा दिवस' या कादंबरीतून साकारलेला आहे. या कांदबरीत  हिंदी, इंग्रजी, गुजराथी शब्द, वाक्यबंध  येताना दिसतात. महानगरातील वातावरणानुसार काही ठिकाणी शब्द निर्मिती केली आहे. उदाहरणार्थ 'अग्रलेख' या शब्दाला 'उग्रलेख', 'बाल्कन टँगलला 'टाल्कन बँगल', इस्टुर फाकडा, केटरमालचा शंडचर्पा इत्यादी. तसेच मिश्रवाक्याचे अनेक नमुने येथे पाहता येतात. उदाहरणार्थ, पैलू गडी किती अच्छा है|

महानगरातील साहित्याची भाषा ही अनेकांगी आहे. पारंपारिक लयबद्ध काव्यभाषेला ती नाकारते, मुक्तशैलीचा गद्यात्मतेचा वापर कवितेत अधिक आलेला दिसतो. विविध क्षेत्रे, स्तर यांच्या उपयोजनाबरोबरच ती विविध स्तरीय भाषिक लयीचा स्वीकार करते. विविध प्रतिमा- प्रतिकातून ती व्यक्त होते. महानगरी संवेदनेच्या पहिल्या खुणा प्रकर्षाने बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेत आलेल्या दिसतात. शहर, महानगर याला जी यांत्रिकतेची झळ प्रथम पोहचली त्यातून महानगरी जीवनाचा यांत्रिकतेचा प्रवास सुरू झाला. बा. सी. मर्ढेकरांनी अनेक प्रतिमांमधून यंत्रयुगाची भयावहता कवितेतून सूचित केली आहे. उदाहरणार्थ, 'काळ्या हवेतून उड्डाण घेणारे काळे विमान', 'खडा पहारा देणारा रोबो', धगधगत्या भट्ट्या, यंत्राची चाके, इत्यादी. मर्ढेकरांच्या कवितेनंतर नारायण सुर्वे यांनी महानगरी संवेदनेचा आविष्कार वेगळेपणाने घडविला आहे. महानगरातील सामान्य, तळागळातल्या माणसाचे वास्तव जीवन त्यांनी मांडले. त्यांची कविता ही महानगरी संवेदनशीलतेचा पहिला महत्त्वाचा आविष्कार आहे, असे म्हणता येईल. 'मुंबई' या कवितेत

महानगरातील चाळसंस्कृतीचे भयावह वास्तव चित्रित करतात. तर अरूण कोलटकर औद्योगिक संस्कृतीच्या जाळ्यात महानगरी माणूस पुरता कसा अडकून गेला आहे आणि निर्जीव वस्तूनी माणसाच्या अस्तित्वावर कसा घाला घातला आहे ते प्रतिमांकित भाषेतून मांडले आहे.

महानरातल्या जीवनाचा संदर्भशोध भाऊपाध्ये, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, विलास सारंग, विजय तेंडुलकर, चंद्रकांत खोत आदी साहित्यिकानी घेतला आहे. समकालीन भाषिक अवकाश त्यांच्या साहित्यकृतीतून, पात्रमुखातून कथन केला आहे. चंद्रकांत खोत यांच्या' उभयान्वी अव्यय' (१९७०) या कादंबरीत कार्यालयात काम करणारा कामगारवर्ग विशिष्ट भाषिक संकेत वापरतो. 'लघवीला जाण्यासाठी 'सही करून येतो', स्त्रीच्या चालण्यावर 'भजन करीत चालली', 'खाली वाकून पेपर उचलणाऱ्या स्त्रीला 'बघ बकरी पाला खाते', मूल न होणाऱ्या पुरुषाला 'बॅटरी का मसाला खतम', आदी भाषिक उदाहरणे लैंगिक भावनेची आभिव्यक्ती करणारी आहेत.

महानगरीय साहित्यकृतीमध्ये हिंदी, इंग्रजी, मराठी भाषिक रुपांचा वैशिष्ट्येपूर्ण वापर होताना दिसतो. त्यामध्ये शिव्या, अश्लील वाटणारे शब्द सहजभावाने येतात. उदाहरणार्थ, किरण नगरकर यांच्या 'सात सक्कं त्रेचाळीस'; कविता महाजनयांच्या 'भिन्न'; शंकरराव यांच्या खरात यांच्या 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'फुटपाथ नंबर१' या कादंबऱ्या सांगता येतील. मिश्र भाषेचा वापर, प्रसंगानुरूप मराठी, हिंदी चित्रपट गाणी, भाषा यांचे उपायोजन कांदबरीगत वास्तवात येताना दिसते. उदाहरणार्थ मनोहर तल्हार यांची 'माणूस', किरण नगरकर यांची 'सात सक्कं त्रेचाळीस' इत्यादी.

उदाहरणार्थ,' माणूस' या कांदबरीतील शंकर हे पात्र म्हणते, "सबकुछ दु:ख और दर्द मैने भुलानेकी कोशीस किया और चेहरेपे एक नकली चेहरा लगा लिया और ओ मजाकिया आदमीका।" (पृ, ३९८)

कवी नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, मल्लिका अमरशेख यांनी कामगारविश्वाचे जगणे, स्त्री, इथला काळाबाजार आदी बाबी अधोरेखित करताना सडेतोड भाषा आणि रोखठोक शब्दशैली उपयोजिली आहे. 'महानगर-१३' या कवितेत माल्लिका अमरशेख यांनी हे धगधगते वास्तव उभे केले आहे.

"'हिजड्यांनी साजरा केलेला शहराचा जन्मोत्सव

सादळलेल्या रक्तातला चामड्यांचा जन्म

शहराची आखीव नाळ कापलेली".

"कुणी गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या"

झिम्मा खेळणाऱ्या

पांढऱ्या टोप्या घातलेल्या सवाष्णी

नाक्यावर बसमध्ये ऑफिसमध्ये

पुरुष उभे कंबर वाकडी करत डोळा मारीत

तरी त्यांना कुणी वेश्या म्हणत नाही."

## २.१६ महानगरीय साहित्याचे वेगळेपण

महानगरी जीवनप्रवास हा वेगवान असतो. सतत 'धावणे' या क्रिडेशी महानगरातला माणूस एकजीव झालेला आहे. कोणाकडेही पाहण्यासाठी त्याला वेळ नाही व थांबायचेही नाही. हे वास्तव अनेक साहित्यकृतींमधून आलेले आहे. उदाहरणार्थ, रंगनाथ पठारे यांच्या 'भर चौकातील अरण्यरुदन' या कादंबरीतील निवेदक म्हणतो, "गर्दी हेच मुळी अरण्य झालय. दुनियाचं अरण्य झालयं मुळात बिनझाडाचं. माणसाचं अरण्य कोणाला दोष देणार? ज्याला त्याला पळायचं, ओढायचं, रेटायचं असतं. ज्याच्या त्याच्या आसपासची गर्दीतली माणसंही वस्तूचहोऊन गेलेयीत भाषा नसल्यासारखी." (पृ.५८) महानगरे ही डायनॅमिक प्रवाही असतात त्यामुळे शहर वा महानगरातले जीवन ही प्रवाही असते. त्यामुळे शहर वा महानगरातला माणूस काहीसा आत्मकेंद्री बनत जातो. व्यक्ती-व्यक्तिंचे संबंध स्वफायद्यावर अवलंबून असतात एकप्रकारची ही 'गुंतवणूक' या तत्त्वावर तो जगतो. त्यातूनच व्यक्तीला 'वस्तूपण' प्राप्त होत गेलेले दिसते. महानगरातल्या कॉर्पोरेट जगतात काम करणाऱ्या व्यक्तीची उपयुक्तता किती आहे यावरून त्यांचे मासिक वेतन ठरते. एकूणच ही कॉर्पोरेट संस्कृती माणसाचे 'स्वत्व' हिरावून घेत आहे याचे दर्शन प्रस्तुत कादंबरीत घडते. हे ग्रामीण जीवनशैलीत प्रत्ययास येत नाही. महानगराचा स्थलावकाश तेथील वैविध्यता आणि मानवी जगण्यातील विविधता यांचे चित्रण महानगरातील माध्यमानी अनेकांपर्यंत पोहोचविले आहे. यासंदर्भात दृक-श्राव्य माध्यमांची कामगिरी महत्त्वाची ठरते. महानगरातील चंगळवाद, डार्कनेस, चित्रपट, सिरीयल- नाटक याकडे आकर्षिला जाणारा तरुणवर्ग, पैसा आणि प्रसिद्धी आदींचे चित्रण महानगरीय साहित्य करताना दिसते. प्रिया तेंडुलकर यांची कथा, अनिल सपकाळ यांची 'झुमची दांडी', राजीव नाईक यांचे 'साठेचं काय करायचं?' अरुण कोलटकर यांची 'ॲनिमेशन', 'तक्ता' आदी साहित्यकृतीतून याचे दर्शन घडते. त्यातून महानगरीय वास्तवाचा एक विशिष्ट भाग समोर ठेवला गेला आहे. एकूण महानगरातील वास्तवातील व्यक्ती, व्यक्तीसमूह यांच्यातील संवेदनशीलता बोथट होत आहे. माणूस दृक-श्राव्य माध्यमांच्या आहारी जातो आहे. रा.ग. जाधव म्हणतात,"महानगरीय वास्तवात व्यक्ती आपल्या संवेदनशक्तीची स्वायत्तता व विशिष्टता उत्तरोत्तर हरवत चालली आहे. दृक-श्राव्य माध्यमांनी व त्यांच्या तंत्रसुंदर अविष्कारांनी आपले दृष्टिगोचर-कर्णगोचर जगच नव्या रीतीने प्रतीत होऊ लागले आहे." (अरुण कोलटकरांची कविता: काही दृष्टिक्षेप, संपादक वसंत पाटणकर, मराठी विभाग मुंबई विद्यापीठ आणि लोकवाडमय गृह, मुंबई दुसरी आवृत्ती १७ जुलै २००४,पृष्ठ ६९) हे महानगरीय साहित्यातून प्रत्ययास येतात.

१९८० नंतर औद्योगिकीकरण, जागतिकीकरण याने अर्थव्यवस्था खुली केली. त्याचे परिणाम प्रथमत: शहरी, महानगरी माणसावर पडणारे होते. वाढता चंगळवाद, मानवी मूल्यांचा होणारा ऱ्हास, असुरक्षितता आधी बाबी साहित्यातून मांडल्या गेल्या आहेत. प्रशांत दळवी यांचे 'चाहूल' हे नाटक चंगळवादाचे भीषण दर्शन घडवणारे आहे. तसेच त्यांचे 'सेलिब्रेशन' मधून व्यक्ती- व्यक्ती मधील तुटत जाणाऱ्या संवादाचे चित्रण केले आहे. आणि सचिन कुंडलकर यांनी 'छोट्याशा सुट्टीत', 'फ्रीजमध्ये ठेवलेले प्रेम' यांमधून जागतिकीकरणाचे व्यक्तिगत जीवनावर काय परिणाम झाले याचे चित्रण केले आहे. या सर्वाचा प्रथम प्रभाव आणि परिणाम हा शहरी, महानगरी माणसावर झालेला आहे.

महानगरीय साहित्याचे वेगळेपण पुढील काही मुद्दयांद्वारे नोंदविता येतील.

१. शहर किंवा महानगर हा स्थलावकाश रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे विविध भागांतून येथे स्थलांतर होत असते. त्यामुळे भिन्न संस्कृतीतून, त्यांच्या जीवनशैलीतून एक विशिष्ट संकर महानगरीय जीवनाला साकारतो.

२. महानगरीय साहित्याची आशयसूत्रे ही आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण याबरोबरीनेच व्यक्तीला 'वस्तूचे' मूल्य येणे; मानवी संवेदनांचे व्यापारीकरण; त्यातून आलेली परात्मता; मूल्यऱ्हास, स्पर्धात्म जीवनामुळे वाढणारी स्पर्धात्मता असलेली दिसतात. व्यक्तीकडे 'वस्तू' म्हणून पाहणारी मानसिकता शहरीकेंद्री वास्तव्यात दिसते. उदाहरणार्थ, मनोहर तल्हार यांच्या ‘माणूस’ या कादंबरीत शहरकेंद्री वास्तव्यात राहणाऱ्या बाजारकेंद्री व्यवस्थेतील माणसांना आलेले ‘वस्तूरूप’ निवेदक अधोरेखित करतो. घरकाम करायला येणारी शंकरची पत्नी घरमालकाला उपभोगाची वस्तू वाटते.

३. महानगरातील झोपडपट्टी आणि फ्लॅट संस्कृती यांच्या मधला अवकाश चाळ आहे. हा महानगराचा एक वैशिष्ट्यपूर्ण अवकाश म्हणून त्याची नोंद करता येणार आहे. कारण या अवकाशात कामगार (मध्यमवर्गीय, निम्नस्तरीय) आहे, जो सुशिक्षित आणि स्वप्नाळूपणाचे जीवन जगतो. गंगाधर गाडगीळांचा 'किडलेली माणसे' हा कथासंग्रह, श्री. ना. पेंडसे यांची 'लव्हाळी', भार्गवराव विठ्ठल वरेरकर यांची 'धावता धोटा', पु. ल. देशपांडे यांची 'बटाट्याची चाळ', सुभाष भेंडे यांची 'अंधारवाटा', चंद्रकांत खोत यांची 'उभयान्वयी अव्यय' या कादंबऱ्या उदाहरणे म्हणून या संदर्भात पाहता येतील.

४. भाऊ पाध्ये, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे यांच्या कलाकृतींमधून महानगरातील मध्यमवर्गीय पांढरपेशी समूहाच्या बरोबरीने निम्नस्तरीय लोकसमूहाच्या जाणिवाही व्यक्त झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, नामदेव ढसाळ यांची कविता म्हणजे महानगरी संवेदनशीलतेबरोबरच राजकीय आणि सामाजिक अनुभवविश्व मांडणारी आहेत. ‘गोलपीठा’, ‘मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले’, ‘आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र: ‘प्रियदर्शनी’, ‘तुही इयत्ता कंची’, ‘गांडू बगीचा’, ‘या सत्तेत जीव रमत नाही' या कवितांतून त्यांची महानगरी अनुभवविश्व साकारले आहे. महानगरातील गलिच्छ वस्त्यांमधील दुरावस्थेचे, तेथील भयावह जीवनाचे दर्शन त्यांची कविता घडवते. तसेच महानगरातील परिवर्तनाच्या चळवळीतले एक कार्यकर्ता, तरूण, प्रियकर, कवी म्हणून जे ताणतणाव आले ते त्यांच्या कवितेतून दृग्गोचर होताना दिसतात.

५. शहर, निमशहर, महानगरांमधील असुरक्षितता अनेक साहित्यकृतीतून अधोरेखित झालेली आहे. तसेच उच्चभ्रू कलावंत त्यांची जीवनशैली त्याचबरोबर अनेक समकालीन संदर्भ साहित्यकृतीतून आलेले आहेत. कविता महाजन यांची 'भिन्न' (२००७), शांता गोखले यांची 'त्या वर्षी' (२००८), शिल्पा कांबळे यांची 'निळ्या

डोळ्यांची मुलगी' (२०१४), जी. के. ऐनापुरे यांची 'रोबोट' या कादंबऱ्यातून १९९० नंतरचे बदलते महानगरीय अनुभवविश्व साकारले आहे.

६. महानगरीय अवकाशातील विविधांगी जीवनाचा वेध अनेक साहित्यकृतीतून घेतला गेला आहे. 'भिन्न' या कविता महाजन यांच्या कादंबरीतून रेड लाईट एरियामधील स्त्रीजीवन, समलैंगिक व्यक्तींच्या संघटना यांचे संदर्भ येतात. तर 'उभयान्वयी अव्यय' या चंद्रकांत खोत यांच्या कादंबरीतून पुरूषवेश्या या विषयवास्तवाची चर्चा होताना दिसते. हे महानगरीय वास्तव जीवनदर्शन आहे. हे ग्रामीण वा दलित साहित्यात तीव्रपणे येताना दिसत नाही.

७. नव्वदीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत वेगाने बदल झाला त्याचा प्रभाव, परिणाम शहर, महानगरांवर पडला. मॉल्स, पंचतारांकित हॉटेल, डान्स बार, कार्पोरेट क्षेत्र, बहुराष्ट्रीय कंपन्या, आय. टी. हब्ज, प्रसारमाध्यमे आदी सेवाक्षेत्रे प्रभावी झालेली दिसतात. सिद्धार्थ रामटेके यांची 'भारत सेल होताना', ह. मो. मराठे यांची ' सॉफ्टवेअर', 'मार्केट', संजय लाटकर यांची' टेक ओव्हर', संजीव खांडेकर यांची 'अशांतपर्व', शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' (१९९०) आदींच्या साहित्यकृतीतून होताना दिसते. हे अनुभवविश्व आणि असा स्थलावकाश ग्रामीण वा दलित साहित्यात प्रत्ययास येत नाही. कारण हा महानगरीय अवकाशाचा विशेष भाग आहे, असे म्हणता येईल.

८. महानगरीय संवेदनशीलता ही आधुनिकतावादी संवेदनशीलतेशी नाते सांगणारी आहे. मूलतः शहरी, महानगरी साहित्यिक आपल्या अनुभवविश्वातील अनेकविध घटकांना साहित्यकृतीतून व्यक्त करताना दिसतात. महानगरात जी असुरक्षितता, मृत्यूची भयावहता सतत वास करते आहे त्यातून महानगरी जीवनाची दुरावस्था होत असलेली दिसते आहे. ग्रामीण जीवनशैलीपेक्षा हे वेगळे अनुभवविश्व यातून साकारले आहे. ग्रामीण, दलित साहित्यात निसर्ग, जातीयता या घटकांतून संघर्षमय वातावरणाची निर्मिती होत असते. परंतु महानगरीय साहित्यात विशेषतः मानवी सहअस्तित्व, स्पर्धा, द्वेषभावना यांमुळे संघर्षीय वातावरणाची निर्मिती होताना दिसते.

९. महानगरातील माणूस स्वतःची ओळख हरवत चालला आहे. त्याचा इतरांशी संवाद कमी होत चालला आहे. कुटुंब, समाज यांमध्ये त्याचे अस्तित्व यांत्रिक होत आहे. 'स्व'विकासाच्या संघर्षातून त्याला परात्मतेला सामोरे जावे लागत आहे. याचे चित्रण महानगरीय साहित्यातील घटनाप्रसंगातून होताना दिसते.

१०. आजच्या भयावह एकाकीपणाची, शहरी जीवनातील असुरक्षिततेची, कोरड्या मानवी संबंधांची जाणीव विलास सारंग यांच्या कथांमधून होते. ‘सोलेदाद’ (१९७५) ‘आतंक’ (१९९९) हे कथासंग्रह यासंदर्भात पाहता येतील. तसेच आधुनिक शहरी माणसाचे एकाकीपण, बदलते नातेसंबंध त्यातून निर्माण होणारे ताण-तणाव याचे चित्रण विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे आपल्या कथेतून करतात. उदाहरणार्थ

गौरी देशपांडे यांचा 'आहे हे असं आहे' (१९८६) हा कथासंग्रह पाहता येईल. तसेच मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर यांच्या कथेतून महानगरी जाणीवा व्यक्त होतात. महानगरातील स्त्री-पुरुषांचे व्यक्तिगत संबंध, राजकारण, मानसिक यातना, प्रसारमाध्यमांचे हितसंबंध, तेथील व्यवस्था याही बाबी 'ज्याचा त्याचा प्रश्न', 'जन्मलेल्या प्रत्येकाला' 'जावे तिच्या वंशा' (२००१), 'तिहार' या कथासंग्रहातून दृग्गोचर होतात. महानगरात कायम वास्तव्य करणाऱ्या लोकांचा जीवन व्यवहार, त्याची धडपड यावर वसंत आबाजी डहाके यांनी 'मर्त्य', 'प्रतिबद्ध' या कादंबरीतून प्रकाशझोत टाकलेला आहे. तर 'क्रमशः' या कादंबरीतून महेश केळुसकर महानगरातील जगण्याबरोबरच सर्जन मनाला नायक पात्राद्वारे व्यक्त केले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) महानगरीय साहित्याची ओळख करून घ्या? व वेगळेपण सांगा?

## २.१७ सारांश

साहित्यातून सभोवतालचे दर्शन घडत असते. महानगरातील गर्दी, दहशतवाद, भयता, हिंसा, बकालपणा, हरवलेली सर्जनशीलता, बोथट झालेली संवेदना, वाट्याला आलेले एकटेपण आदी महानगरी जीवनाच्या विविध छटा कलाकृतीतून उमललेल्या आहेत. महानगरीय साहित्यातून सभोवतालचे वास्तव, समस्या अधोरेखित होतात. महानगरातील सौंदर्य, तेथील निसर्ग, समुद्र त्यातून मिळणारा आनंद याविषयी फारच त्रोटक माहिती येते. ग्रामीण वा दलित साहित्यात निसर्ग विशेषत्वाने प्रत्ययास येतो, महानगरीय साहित्यात मात्र महानगरातील माणूस हा आगतिक, उदासीन असलेला अनेक साहित्यकृतीतून प्रत्ययास येतो, हे एकप्रकारे महानगरीय वेदनेच चित्रण आहे, असे म्हणता येईल. महानगरीय संवेदनेची अभिव्यक्ती अरुण कोलटकर, नामदेव ढसाळ, मनोहर ओक यांसारख्या अनेक कवींनी कवितांतून केलेली आहे. मुंबई या महानगरावर केलेल्या कवितांतून हे जाणवते. कोलटकर 'या मुंबईनं भिकेस लावलं' असे म्हणतात, तर मनोहर ओक म्हणतात, 'मुंबई मुंबई, तुझ्यातून मी फाटक्या भणंगासारखा निघून जाईन' असे सांगतात. तर नामदेव ढसाळ म्हणतात, 'मुंबई, माझ्या प्रिय रांडे, तुझ्यातून मी फाटक्या भणंगासारखा निघून जाणार नाही' असं बजावतात. एकूणच हे मुंबईचे बहूरूपत्व येथे अधोरेखित होते आहे. महानगरीय साहित्याची आशयसूत्रे ही महानगरीय जीवनाचे होत जाणारे अमानवीकरण, व्यक्तीचे वस्तुत होणारे रूपांतर, आक्रमकता, भयग्रस्तता, परात्मभाव, स्वत्वलोप, मृत्यूची विदारक जाणीव आदी विषयांभोवती आहे. महानगरीय संवेदनेचे 'परात्मभाव' हे एक व्यवच्छेदक लक्षण सांगता येईल. मर्ढेकरांनी 'जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे' अशा नेमक्या शब्दांत महानगरीय जगण्यातील वास्तव मांडले आहे.

## २.१८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. महानगरीय साहित्याचे स्वरूप सांगा.

२. महानगरीय साहित्याची वैशिष्टे स्पष्ट करा.

३. महानगरीय वास्तव साहित्यातून कसे चित्रित झाले आहे, ते लिहा.

४. महानगरीय साहित्याचे वेगळेपण सोदाहरण स्पष्ट करा.

५. महानगरीय साहित्यातील पात्रचित्रण आणि भाषा हे घटक सविस्तर लिहा.

**टिपा लिहा.**

१. महानगरीय साहित्यातील आशय
२. स्थलावकाश
३. महानगरीय समस्या
४. सामाजिक- सांस्कृतिक पर्यावरण
५. महानगरीय जीवनशैली

## २.१९ संदर्भ


१. साहित्य आणि समाज, संपादक प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य - अविनाश सप्रे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७,
२. मराठी कवितेतील महानगरीय संवेदनशीलता : एक टिपण, वसंत पाटणकर, सर्वधारा, वर्ष ३ रे अंक ३ रा, जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २००९, संपादक डॉ. सुखदेव ढाणके, अमरावती
३. अरुण कोलटकरांची कविता: काही दृष्टिक्षेप, संपादक वसंत पाटणकर, मराठी विभाग मुंबई विद्यापीठ आणि लोकवाडमय गृह, मुंबई दुसरी आवृत्ती १७ जुलै २००४


## २.२० पूरक वाचन

१. चक्र-जयवंत दळवी
२. सिगारेटस **-** मनस्विनी लता रवींद्र
३. गोलापीठा– नामदेव ढसाळ
४. महानगरीय वास्तव: भारतीय कादंबऱ्यांसंदर्भात - (संपादक) डॉ. सूर्यकांत आजगांवकर

## २.२१ उपक्रम

१. एका महागरीय कवीची मुलाखत घ्या.
२. साठेचं काय करायचं? या नाटकाचे परीक्षण करा.

❖❖❖❖

munotes.in

# ३

# भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टये

३.२ प्रस्तावना

३.३ 'भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा' : अनुभवविश्व

*३.४ भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा* या कथासंग्रहातील आशयसूत्रे

३.५ पात्रचित्रण

३.६ समारोप

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ संदर्भ

## ३.१ उद्दिष्टये

- दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात भारतीय समाजजीवनात आमूलाग्र परिवर्तन होत गेले यांची विद्यार्थ्यांना ओळख होईल.
- खेड्यापाड्यातील समाज शहराकडे औद्योगिकीकरणामुळे स्थलांतरित होत गेला. व शहरीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या विषयाची ओळख होईल
- विविध कारणांमुळे शहरांची महानगरी होत गेली. या शहरीकरणाच्या व महानगरीकरणाच्या प्रक्रियेमुळे मानवी जीवनातील गुंतागुंत अधिकच वाढत गेली.
- महानगरावर आधारित वैशिष्ट्यपूर्ण साहित्य निर्माण होत गेले. त्याच दृष्टिकोणातून *भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा* या कथासंग्रहाचा विचार या अभ्यासपत्रिकेत करावयाचा आहे.

## ३.२ प्रस्तावना:

कोणताही साहित्यिक - कलावंत त्याच्या सामाजिक- सांस्कृतिक पर्यावरणाशिवाय दूर राहूच शकत नाही. त्याच्या साहित्याची अभिव्यक्ती होताना त्याची संस्कृती, आचारविचार, परंपरा, आदर्श इत्यादीचे अधिष्ठान त्याच्या साहित्यकृतीमागे प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष कार्यरत असते. तो जगत असलेले पर्यावरण, तेथील समस्या, विसंगती, यांनी युक्त असलेला जीवनानुभव तो साकारत असतो.

महानगरात एकाचवेळी एकीकडे भौतिक प्रगतीच्या साधनांची विपुलता, सहजसाध्यता चकचकीत बिल्डिंग्ज आणि टोकाची श्रीमंती  असते तर दुसरीकडे वंचितता बेकारी, बेरोजगारी, प्रदुषण, गर्दी, ट्रॅफिकजाम, महागाई, झोपडपट्टी, अस्वच्छता, गलिच्छ वस्त्या असे आंतरविरोध महानगरीच्या पोटात सामावलेले असतात. त्याचबरोबर अपराधीकरण, पाश्चात्य शिक्षण, पाश्चात्य जीवनशैली आणि चित्रपटसृष्टी यांचे आकर्षण, जीवघेणी स्पर्धा, घड्याळी काट्यांवर धावणारे आयुष्य, त्यातून आलेली निबरता आणि असंवेदनशीलता, अनेक जाती, धर्म, भाषा, बोली यांच्या संमिश्रणातून निर्माण झालेली गंगाजमनी संस्कृती या सर्व घटकांमधून साकार झालेला महानगरी अवकाश यातून महानगरी संवेदन अथवा महानगरी जाणीव साकार  होते. अशी विशिष्ट महानगरी जाणीव साकारणारे भाऊ पाध्ये मुंबई महानगरात जन्मलेले, वाढले - घडलेले आणि नावारूपास आलेले अस्सल मुंबईकर लेखक आहेत.

साठोत्तरी कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण कथनात्म लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये भाऊ पाध्ये हे एक अत्यंत महत्त्वाचे नाव आहे.  त्यांच्या १९६० ते १९९० या तीस वर्षांच्या कालावधीत जवळपास दहा कादंबऱ्या, चार कथासंग्रह, एक नाटक, दोन चित्रपटांचे पटकथालेखन आणि अन्य तीन संग्रहित पुस्तके असे विपुल आणि कसदार लेखन प्रकासित झाले आहे.

*एक सुन्हेरा ख्वाब* (१९८०), *मुरगी* (१९८१), *थालीपीठ* (१९८४) आणि *थोडी सी जो पी ली है* (१९८६) अशा चार  कथासंग्रहांत समाविष्ट असणाऱ्या एकूण अडोतीस कथांचे लेखन त्यांनी केले आहे. उपरोक्त चार  कथासंग्रहांतील  निवडक वीस कथां ंचा *भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा*  हा कथासंग्रह दिलीप चित्रे यांनी १९९५ मध्ये संपादित केला  आहे.

## ३.३ 'भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा' :  अनुभवविश्व

ब्रिटीश कालखंडात मुंबईत अस्तित्त्वात आलेल्या कापड गिरण्यांच्या आसऱ्याला पोटासाठी देशभरातून आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतूनही लोकांचा ओघ सुरू झाला. या गरीब-भुकेकंगाल लोकांनी आपले बस्तान चाळींमध्ये आणि झोपडपट्ट्यांमध्ये बसविले. विविध जाती, धर्म, प्रांत, भाषा, वर्गातील या सगळ्यांच्या एकत्रित वास्तव्यातून जी निम्नमध्यमवर्गीय आणि  निम्नवर्गीयांची एक विशिष्ट भौगोलिक वस्ती  आणि त्यांची जीवनशैली, जीवनधारणा निर्माण झाली. तिला प्रतिबिंबित करणारी जी एक संस्कृती आकाराला आली; तिचेच घडविलेले विवक्षित दर्शन हा या कथासंग्रहाचा केंद्रवर्ती विषय आहे.

## ३.४ *भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा* या कथासंग्रहातील आशयसूत्रे

भाऊ पाध्ये यांच्या उपरोक्त कथासंग्रहात 'मुरगी', 'सांड', 'पायातला बूट', 'फाईव्ह गार्डन', 'एक सुन्हेरा ख्वाब', 'देश पुढे गेला', 'बेबी, बगीचा', 'नवरा', 'बायको खाणारी माणसे', 'अक्करमाशा', 'पडदा', 'आयशीचे हृदय', 'पोल्ट्री फार्मिंग', 'वेड', 'धगड', 'थिएटर', 'तुम्ही यांना पाह्यलं आहे काय?', 'फर्ज्य', आणि 'सामना' या वीस कथांचा समावेश होतो. या सर्व कथांची आशयसूत्रे विविध प्रकारची असली तरी अभ्यासाच्या सोयीसाठी इथे पाच आशयसूत्रांच्या आधारे वर्गीकरण करण्यात आले आहे.

### अ) लग्नसंस्थेसंबंधीचे भाष्य :

लग्नसंस्था ही एक सामाजिक संस्था आहे, दोन व्यक्तींना, दोन कुटुंबांना जोडणारी ती बाब आहे. या संस्थेद्वारा व्यक्तीला भावनिक, कौटुंबिक, सामाजिक सुरक्षा आणि समाजमान्यता प्राप्त होते. भारतीय समाजव्यवस्थेत ती कुटुंबव्यवस्थेला साकार करणारी मूलाधार ठरते. त्यामुळे लग्नसंस्थेकडे सर्वसामान्यपणे भारतीय समाजव्यवस्थेत गांभीर्याने पाहिले जाते. परंतु प्रस्तुत कथासंग्रहातील कथांचा आशय पाहिला तर त्यातील पात्रे अशा प्रकारचे कोणतेही बंधन मानून जगताना दिसत नाहीत.

मुळात भारतीय समाजव्यवस्थेतील पितृसत्तेत स्त्रीच्या मतांना, तिच्या आवडनिवडीला कोणतेही स्थान नसते. साहजिकच या व्यवस्थेत मुलगी ही कुटुंबासाठी ओझं, एक जबाबदारी मानली जाते. त्यामुळे तिचे लग्न लावून त्या जबाबदारीतून 'मुक्त' होण्यासाठी सगळे तत्पर असतात. साहजिकच मुलीची आवडनिवड विचारात न घेता किंबहुना पालक ठरवतील तोच नवरा म्हणून स्वीकारण्यासाठी तिच्यावर दबाव आणला जातो. त्यामुळे 'मुरगी' कथेतला केरू गाबते दीर्घकाळ दादर रेल्वे स्टेशनवर हमाली करून सडाफटिंग आयुष्य जगतो. एक लाखाची लॉटरी लागल्यावर त्याला आर्थिक स्थिरता प्राप्त होते. आजूबाजूच्या वस्तीत लोक त्याला गाबते मास्तर म्हणून ओळखू लागतात. प्रस्थापित समाजचौकटीत आयुष्य मार्गी लागण्याची जी संकल्पना आहे त्यानुसार त्यालाही आपले आयुष्य मार्गी लागावेसे वाटते. आपले कुटुंब असावे, मुलेबाळे असावीत या टप्प्याची पहिली पायरी म्हणून लग्न केले पाहिजे, याची त्याला जाणीव होते. त्याच्या सोबतच हमाली करणारा दारुडा धानू शिरनाळे व त्याची बायको रुक्मिणीबाई त्याच्याच नात्यातले असतात. त्यांची अवघी एकोणीस- वीस वर्षांची मुलगी पदी आणि तिचे उफाड्याचे सौंदर्य त्याला वेड लावते. त्यामुळे 'लग्न करेन तर पदीशीच करेन', असा तो निश्चय करतो. त्यासाठी तो रुक्मिणीबाईच्या झोपडीत सुखचैनीच्या वस्तू भरतो. पदी कोणकोणत्या मुलांबरोबर सिनेमाला जाते, कोणाला कुठे भेटते,याची इत्यंभूत माहिती काढून शिरनाळे कुटुंबापुढे लग्नाचा प्रस्ताव ठेवतो. या लग्नाला विरोध दर्शविताना पदी आधीच जणू त्याविषयीचे भाकीत करते.

"मी तुमच्याशीच लगीन करावं अशी जबरदस्ती का? तुमी दुसऱ्या माझ्यापेक्षा चांगल्या, उच्च मुलीशी लगीन करून सुखी व्हा. तुमी माझ्याशी लगीन करून सुखी होणार नाही.

का ?

कारण संसारात एक पार्टनर सुखी नसला म्हणजे संसार सुखाचा होत नाही." (पृ. क्र. १४)

उपकाराच्या ओझ्याखाली दबलेल्या शिरनाळे कुटुंबाला केरूसमोर तसेच पदीला आपल्या आईसमोर नमते घ्यावे लागते आणि विशीतल्या पदीचे चाळिशीतल्या केरूसोबत लग्न होते. परंतु मनाविरुद्धचे लग्न आणि तिच्या देहाशी रात्रभर खेळ केल्याने पदी दमते. लग्नाच्या पहिल्याच रात्री केरूला त्याचे शरीर साथ देत नाही म्हणून वैतागलेली हताश पदी त्याचा 'नामर्द' असा उपहास करते. तेव्हा क्षणाचाही विचार न करता केरू अंथरुणाखालची सुरी काढून तिच्या पोटात खूपसून तिचा खून करतो. वस्तुत: ज्या लग्नासाठी तो इतका आटापिटा करतो, ते लग्न टिकविण्यासाठी तो कोणताही मागचापुढचा विचार करीत नाही.

'मुरगी' कथेप्रमाणेच 'पोल्ट्री फार्मिंग' कथेतही लग्नसंस्थेविषयीचा उपरोध अतिशय कारुण्यपूर्ण रीतीने व्यक्त होतो. या कथेतल्या अंबादास टिपटाळेकरला काँग्रेस पक्षातील गुमास्त्यांच्या संघटनेचे काम करण्यासाठीचे महिना नव्वद रुपये मानधन मिळू लागताच त्याला थोडे आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. म्हणून तो लग्न करून आयुष्यात स्थिरस्थावर होण्याची इच्छा व्यक्त करतो. ज्यांच्या मुलींची लग्न होण्याची शक्यताच नसते, असे पालक अंबादास या घोडनवऱ्यासाठी टपून बसलेले असतात. त्यातलाच बाबीशेट हा आपली अनाथ भाची सुनंदा हिला आयुष्यात मार्गी लावण्यासाठी नव्हे तर महागाईच्या दिवसांत खाणारे एक तोंड कमी होईल, इतका स्वच्छ व्यवहार पाहातो. आयुष्यभर सुनंदाचे ओझे वाहायला लागू नये, त्यासाठी तो अंबादासला मालाडला पागडीची खोली मिळवून देतो; भांडीकुंडी घेऊन देतो. सोळा वर्षांच्या सुनंदाचे लग्न अडोतीस वर्षांच्या अंबादासबरोबर लावून शेवटी एकदाची पोरगी वटली, असा सुस्कारा सोडतो. त्यामुळे लग्नसंस्थेचे गांभीर्य जसे बाबीशेटला वाटत नाही तसेच ते अंबादासलाही वाटत नाही. लग्न केले तर ते निभवावेही लागते, याचा कोणताही विचार तो करीत नाही. उलटपक्षी सुनंदाला दिवस गेल्यावर तिची खाण्यापिण्याची, औषधपाण्याची सोयही तो करीत नाही. तिला 'तुझ्या मामानं बाळंतपणासाठी बोलावलंय', असं खोटं सांगून माहीमला सोडून येतो. मुलगा झाल्यावरही तिला तो भेटायला जात नाही, बारशासंबंधी कसली साधी चौकशी करीत नाही. शेवटी वैतागून बाबीशेट तिला मालाडला सोडून येतो. पण लग्नाच्या आधीपासूनच बाहेरख्याली करायची सवय असलेल्या अंबादासला सुनंदा व तिच्या मुलाशी कौटुंबिक किंवा भावनिक बंध जोडून ठेवत नाहीत. तो तिची व मुलाची खायची आबाळ करतो. यातच मुलगा व सुनंदा दगावते. त्यामुळे अंबादासच्या लेखी असलेले लग्नसंस्थेतले वैयर्थ इथे उघडे पडते. असाच काहीसा आशय 'पडदा' कथेतूनही अभिव्यक्त होतो. बिजवर आणि दुपटीने मोठ्या वयाच्या बाकरमियासोबत मैमुनाचे लग्न होते. लागोपाठ तीन मुलेही होतात. पण बाकरमियाच्या आर्थिक गैरव्यवहारांमुळे त्याला एक वर्षाची सजा होऊन मैमुना व मुले उघड्यावर पडतात. तर बंडू अवदारे हिरा जवळकरच्या नादी लागून भामाला पोलीस स्टेशनला द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचा दुरुपयोग करून दुसरी पत्नी ठरवतो. त्यामुळे लग्नसंस्थेमागच्या उदात्त हेतूलाच इथे छेद जातो. भारतीय लग्नसंस्थेत लग्न हे पवित्र बंधन मानून पत्नी ही आपल्या सुखदु:खाची साथीदार आहे, तिला समजून घेतले पाहिजे, विशेषत: आपल्यापेक्षा निम्म्या किंवा त्याहूनही लहान वयातल्या पत्नीला सांभाळले पाहिजे, याचे कोणतेही गांभीर्य ही नायकपात्रे बाळगताना दिसत नाहीत. उलटपक्षी मुरगीचा शिजवून खाण्याशी आणि बायकोचा उपभोग घेण्याशीच संबंध असावा, इतकाच भाव ते बाळगतात.

'सांड' कथेत मालती आणि गजाचं एकमेकांवर प्रेम असताना आप्पा तिचं लग्न गिरणीकामगार बाबू आकाराम बोरसेसोबत लावून देतात. तिथे तिला मुलं जन्माला घालण्याचं यंत्र मानलं जातं. सासूला सहा मुलं झाली म्हणून तिलाही सहा मुलंच झाली पाहिजेत. भले मग तिचा त्यात मृत्यू झाला तरी त्यांना पर्वा नसते. मालतीप्रमाणेच तिच्या जावा मुलांना जन्म घालून घालून मृत्यू पावतात. त्यामुळे लग्नसंस्थेचा मुळातला हेतू कथांतल्या पात्रांनी अत्यंत विकृत स्वरूपात इथे स्वीकारला असल्याचे लक्षात येते. लग्नसंस्था ही आपली हक्काचे उपभोगाचे साधन उपलब्ध करून देणारी संस्था आहे. त्यामुळे भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या बायकोला ओरबाडता येते, हा भाव ही पात्रे जोपासतात. त्यात अन्य स्त्रीपात्रेही सामील व्हावी, हे पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेचे

कपटकारस्थान इथे उघड केले जाते. 'पायातला बूट' या कथेतील सुरेखाचे लग्न झाल्यावर पहिल्याच रात्री तिच्या नणंदा व सासू लग्नातल्या शालूवरच सगळी उष्टी भांडी घासायला लावतात. मध्यरात्र उलटून गेली तरीही दिवसभर थकली- भागलेली सुरेखा डोळ्यांवर प्रचंड ग्लानी आलेली असतानाही नवऱ्याची वाट पाहाते. तोच बायको म्हणजे 'पायातला बूट' हे नवऱ्याचे शब्द तिच्या कानांवर पडतात. बायकोला पायातला बूट समजणाऱ्या बाबूची पुरुषसत्ताक मानसिकता आहेच पण त्याची आई व बहिणींचीही मानसिकता पुरुषसत्ताकच आहे. त्यामुळेच बाबूने आपल्या बायकोला- सुरेखाला आपल्या मुठीत ठेवावे, तिने आपल्या बाबूला मनसोक्त शारीर सुख द्यावे, असे त्यांंना वाटते. शिवाय त्याला सुख देणारे तिचे सर्व अवयव नीटनेटके आहेत का, याचीही खातरजमा त्या बाबूला करायला सांगतात. त्यामुळे पुरुषसत्तेने आपला स्वार्थ साधण्यासाठी स्त्रियांचीही मानसिकता कशी घडविली आहे, हे त्या बहिणींना मुंबईच्या घरातून बाबूने हाकलून दिल्यानंतर त्यांनी कोल्हापूरला घरी येऊन आईसमोर केलेल्या कांगाव्यातून स्पष्ट होते. वैद्यकीय तपासणीत सुरेखात कोणताही दोष नसून बाबूलाच मूल होणे शक्य नाही आणि महागाईमुळे दुसरी बायको करणे परवडणारही नाही, हे लक्षात आल्यावर तो दुसरे लग्न करण्याचा बेत रहित करतो. सुरेखावरील प्रेम किंवा लग्न टिकविणे, हा त्याचा त्यामागे हेतू नसतो. त्यामुळे लग्न ही पवित्र गोष्ट आहे, त्यातून पती- पत्नीत एक भावबंध निर्माण होतो, ह्या समजालाच इथे छेद मिळतो.

'बेबी' या कथेत निवेदक पात्राने समजावूनही तिला लग्नसंस्थेतून मिळणाऱ्या सुरक्षेचे महत्त्व पटत नाही.खरे तर सौंदर्याचे वरदान लाभलेली, आर्थिक स्थैर्य असणारी बेबी लग्नसंस्थेला झुगारून देते. पण मग वय उलटून गेल्यावर ती शारीर गरजेसाठी आणि भावनिक सुरक्षेसाठी झोपडपट्टीतल्या इबू नावाच्या मुसलमान इलेक्ट्रिशियनबरोबर लग्न न करता राहाते व शेवटी दिवस गेल्यावर गर्भपात करण्यासाठी इबूने कुठल्याशा हकिमाकडून आणलेल्या चाटणाचे सेवन करून अतिरक्तस्त्रावाने मृत्युमुखी पडते.

एकूणच लग्न ठरविताना रुक्मिणीबाई व धानू हे पदीला (मुरगी), मालती व गजा यांचे एकमेकांवर प्रेम आहे, हे माहीत असूनही आप्पा मालतीला (सांड), सुनंदा वयाने निम्म्याहून लहान आहे व अंबादास नीट स्थिरस्थावर नाही, हे माहीत असूनही बाबीशेट डिचोलीकर सुनंदाला (पोल्ट्री फार्मिंग), अन्याचे कागदोपत्री वडील असलेले अण्णा हे नपुंसक आणि काळे आहेत, हे माहीत असूनही अन्याचा लखुमामा पैशांखातर आपल्या बहिणीचे लग्न अण्णांसोबत जमवताना आपल्या बहिणीला (अक्करमाशा) विचारात घेत नाहीत. लग्न हे स्त्री-पुरुष अशा दोघांना जोडणारे पवित्र बंधन मानले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र पुरुषाकरवी आणि पुरुषासाठीच तो केलेला एकतर्फी सौदा आहे, हे या कथांमधून इथे उघड होते.

ही कथांमधली सगळी लग्ने स्त्रीपात्रांच्या पालकांनी त्यांच्या मनाविरुद्ध लावलेली आहेत. लग्न म्हणजे एक मरण संपलं व दुसरं सुरू झालं असाच अनुभव स्त्रीपात्रांच्या जगण्यातून मुखरित होतो. तसा स्वत:शीच उल्लेख (पृ.३१) सुुरेखा करते. याउलट लग्नसंस्थेविषयी पुरुषपात्रांच्या मनात कोणताही आदरभाव, नैतिकता, शुचिता नाही. लग्नातून शारीर संबंधांसाठी मिळणारी हमी आणि हक्काचं राबायला मिळणारं माणूस इतकाच अर्थ या पात्रांच्या वर्तनातून अधोरेखित होतो. म्हणूनच ही पुरुष पात्रे लग्न करताना दिसतात. त्यामुळे त्यांनी घेतलेल्या आणि न घेतलेल्या निर्णयांचा तसेच त्यांनी

केलेल्या आणि न केलेल्या कृतीचा दुष्परिणाम म्हणून त्यांच्या बायकांची अटळपणे शोकांतिका होते. यातून स्त्रीचे जगणे, तिच्या भावभावना, आशाआकांक्षा, अगदी तिचा विरोधही किती नगण्य ठरविला जातो, हेच येथे ठळकपणे पुढे येते.

**ब) कुटुंबसंस्थेसंबंधीचे भाष्य :**

महायुद्धोत्तर कालखंडात व्यक्तीला जगण्यास आधारभूत ठरणारी, हक्काचा निवारा देणारी, भावनिक सुरक्षा देणारी, सोबत करणारी आणि व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यास योगदान देणारी कुटुंबव्यवस्था खिळखिळी होऊ लागली होती. त्यातच जगभरात बाजारव्यवस्थेने आपली बाजारपेठ वाढविण्यासाठी आधी पाश्चात्त्य देशांमध्ये आणि नंतर भारतात दूरदर्शनचा (टिव्ही) सर्वाधिक उपयोग करून घेतला. यातून दाखविले गेलेले चित्रपट, माहितीपट, मालिका यांचा प्रेक्षकमनावर भडिमार करून कुटुंबव्यवस्था व्यक्तीच्या विकासासाठी कशी मारक आहे, हे माणसांच्या मनात रुजवून त्यांची विशिष्ट मानसिकता घडविली गेली.

नवभांडवलशाहीच्या विकासानंतर तर हा मुद्दा अधिकच ठळकपणे समोर आला आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली व्यक्तिकेंद्रिततेस खतपाणी घातले गेले.

अर्थात, भारतीय समाजवास्तवात साठोत्तरी कालखंडात इथेही असे वैशिष्ट्यपूर्ण समाजवास्तव आकार घेत होते. वस्तुतः भारतीय समाजव्यवस्था ही पुरूषप्रधान आणि पुरुषकेंद्री समाजव्यवस्था आहे. त्यामुळे कुटुंबप्रमुखाचा दर्जाही आपोआपच पुरुषाकडे येतो. पुरुषाने कमवावे, कुटुंबावर पकड ठेवावी,एकसंधता राखावी, मुलांचे भविष्य घडवावे, ह्या गोष्टीची अलिखित जबाबदारी आणि अपेक्षा त्या पुरुषाकडून केली जाते. परंतु भाऊ पाध्ये यांच्या कथांतील कोणतेही पुरुषपात्र या जबाबदारीचे वहन करताना दिसत नाही. उलट अनेकदा ही पुरुषपात्रे बेजबाबदार, विकृत, अनैतिक, भ्रष्ट असलेली दिसतात. साहजिकच ही जबाबदारी घेण्यास मग त्यांच्या बायकांना स्वेच्छेने किंवा जबरदस्तीने पुढे यावे लागते. अशा कुटुंबांची कथांमध्ये वाताहत झालेली आपणांस दिसून येते.

'मुरगी' या कथेत धानू शिरनाळे हा हमाल आहे. पण हमाली करणं सोडून तो सतत दारूच्या नशेत असतो. नाईलाजानं का होईना मग कुटुंबाची सर्व जबाबदारी रुक्मिणीबाई आपल्या डोक्यावर घेऊन घराचे रहाटगाडगे ओढत राहाते.पाच मुलांचा संसार खेचता खेचता केरू गाबतेची आर्थिक मदत घेत राहाते व शेवटी मदतीची परतफेड करू शकत नाही. म्हणून आपल्या ऐन तरुण वयातल्या मुलीला- पदीला केरूच्या गळ्यात बांधते. विकृत मानसिकतेचा केरू पदीसोबत शरीरसंबंध ठेवता येत नाही म्हणून लग्नाच्या पहिल्याच रात्री पदीचा खून करतो आणि मृत देहाशी शारीर चाळे करतो. खरे तर केरू अर्धे आयष्य सडाफटिंग जगल्यावर संसार करणे, आपले नाव सांगणारा आपला वारस असणे आणि एकूणच स्थिरस्थावर होण्याच्या इच्छेने पदीशी लग्न करण्याची हाराकिरी करतो. परंतु आपले शरीर साथ देत नाही, हे लक्षात येताच तो त्याच्या कुटुंब वसविण्याच्या मूळ हेतूलाच हरताळ फासतो. असाच काहीसा आशय 'पोल्ट्री फार्मिंग' या कथेतूनही आढळतो. अंबादास टिपटाळेकर हा अनेक वर्षे विविध संघटना आणि पक्षांचं काम करीत असतो.सतत राजकीय पक्ष आणि संघटना बदलत राहून कोणतीही कमाई न करता पक्षकार्यालयात राहून बेबंद जगणं, हेच त्याचं जीवितकार्य बनलेलं असतं. वयाची अडतिशी ओलांडली तरी तो

कोणत्याच पातळीवर स्थिर झालेला नसतो. गुमास्त्यांच्या संघटनेचं काम करताना त्याला मानधन मिळू लागताच तो लग्न करून स्थिर होण्याचा निर्णय घेतो. आईबापाविना मामाकडे अनाथ वाढलेली सुनंदा सोळावं पार करून सतराव्या वर्षात पदार्पण करते. महागाईच्या दिवसांत एक खाणारं तोंड कमी व्हावं, या उद्देशाने तिचा मामा- बाबीशेट सुनंदाचं लग्न अंबादासशी लावून देतो. आतापर्यंत अस्थिर, बेबंद जगलेला अंबादास सुनंदाला दिवस गेल्यानंतर मामाकडे पोहोचवून येतो. दरम्यान तिच्या तब्येतीची, गोळ्याऔषधांची कसलीही साधी चौकशीही करीत नाही. सुनंदाच्या बाळंतपणानंतरही कसेबसे दीडदोन वर्षातच खाण्यापिण्याची, औषधपाण्याची आबाळ होऊन त्यांचा मुलगा मृत्यू पावतो. या घटनेचा आघात होऊन सुनंदा वेडसर होते आणि त्यातच तिचा करुण मृत्यू होतो.

केरू (मुरगी) आणि अंबादास (पोल्ट्री फार्मिंग) ही दोन्हीही नायकपात्रे खरे तर जवळपास चाळिशीपर्यंत स्वैर जगतात. इतकी वर्षे स्वैर आयुष्य जगल्यावर प्रस्थापित समाजचौकटीत स्थिर होण्याच्या ज्या संकल्पना असतात त्यानुसार लग्न करणे, मुलेबाळे होणे, आयुष्य मार्गी लागणे या गोष्टी त्यांना कराव्याशा वाटतात परंतु कौटुंबिक जीवनातील बांधिलकी, जबाबदारी, आर्थिक नियोजन, भावनिक बंध निर्माण करणे, जोपासणे त्यासाठीची मानसिकता त्यांच्यापाशी नाही. किंवा तसा प्रयत्नही ही पात्रे करताना दिसत नाहीत. साहजिकच त्यांनी लग्न करून आणलेल्या बायका या केवळ आपली शारीर गरज भागविण्यासाठीच आहेत, हा भाव ते जोपासतात. यातून पदी आणि सुनंदा दोघींच्याही आयुष्याची अटळपणे शोकांतिका ठरते. लग्न करणे, कुटुंब बनविणे या बाबीच इथे फोल ठरतात. कारण ज्या कारणासाठी ही पुरुषपात्रे लग्न करतात. तेही तितकेसे खरे नाही कारण दोन्हीही पुरुषपात्रे लग्नाआधीसुद्धा वेश्यागमन करीत होतीच. त्यामुळे कुटुंबनिर्मितीचा मूळ उद्देशच इथे बाजूला पडतो.

'सांड' कथेत गजा मारुलकरच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या काकाकडे कुटुंबाचे कर्तेपण येते. पण सगळ्या कुटुंबाला आपल्या पंखांखाली घेण्याऐवजी गजाच्या आईशी - आपल्याच वहिनीशी शारीर संबंध ठेवतो, आपल्या पत्नीशी इतका दुष्टपणे वागतो की शेवटी तिला वेड लागून ती मृत्यू पावते, बालवयातल्या गजाशीही कपटाने वागून त्याचा संपत्तीतला वाटा हडप करतो. अगदी गजाची आईदेखील मुलाप्रती असणारे तिचे कर्तव्य निभावताना दिसत नाही. मुलगा गोठ्यात झोपतो, काकाचा सतत मार खात राहातो, याविषयीची कोणतीही खंत तिला दिसत नाही. त्यामुळे वात्सल्यभावनेचा कोणताही अनुभव कथेत येत नाही. शिवाय गजा मुंबईला पळून आल्यावर त्याला माघारी बोलावतही नाही. यामुळे गजा आपल्या आईपासून, कुटुंबापासून आणि गावापासून कायमचा पारखा होतो. येथेही मलकापूरच्या एका संयुक्त कुटुंबाची अनुक्रमे वडील, काकू, मग काकाचा मृत्यू आणि गजाने गावातून मुंबईला केलेले पलायन व शेवटी आईचे भल्यामोठ्या वाड्यात एकटीने भुतासारखे जगणे यातून एक कुटुंब कसे उद्ध्वस्त होते, हे दिसून येते.

'फाईव्ह गार्डन'मधील आबा टुकरूळ हा सुखासीन आयुष्यासाठी पैशाच्या इतका मागे लागतो की आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठी स्वत:च्या पत्नीला- माईला त्यांची शय्यासोबत करण्यास भाग पाडतो. लग्नात कुटुंबाची- पत्नीची जबाबदारी घेण्याच्या आणाभाका विसरून स्वत:च माईकडे गिऱ्हाईके आणतो व तिला वेश्याव्यवसायात

ढकलतो. यामुळे दुखावलेली मुले या दोघांना कायमचीच दुरावतात; त्यातून एक कुटुंब विखुरते आणि ऐन म्हातारपणात दोघांना भीक मागून जगण्याची वेळ येते.

'नवरा' या कथेत दिपूचे आईबाबा त्याच्या काकाचे लग्न करतात पण काका नपुसंक असल्याने काकूचे दु:ख समजून घेत नाहीत. तिच्या शारीर- मानसिक गरजांना दुर्लक्षून तिला काका मारझोड करतो, याकडेही ते दुर्लक्ष करतात. तिला शिवीगाळही करतात व घर सोडून जायला सांगतात. त्यामुळे आपल्याकडे असलेले थोरपण लक्षात घेऊन कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम ते करताना दिसत नाहीत.

'बेबी' कथेतील बेबीचे आईवडील 'बेबी लहान वयातच आपल्या खर्चाचे पैसे स्वत: परस्पर बाहेरून उभे करते', याचा विषाद न मानता ते तिचे कौतुकच करतात आणि तिच्या बाकी बहिणींना बावळट ठरवतात. शेवटी वय उलटलेली बेबी झोपडपट्टीतल्या इबू नावाच्या विवाहित इलेक्ट्रिशियनबरोबर झोपडपट्टीत राहाते आणि आपल्या आयुष्याची वाताहत करून घेते. वाममार्गाला जाण्याच्या शक्यतेची जिथे पहिली पायरी असते, तिथे जबाबदार पालक आपल्या मुलांना वेळीच आवरतात; समजून देतात- घेतात. पण हे काहीही न केल्याने बेबीची शोकांतिका होते.

'बगीचा' कथेतील भास्कर राणे कापड गिरणीतला एक कारकून आहे. आपल्या पत्नीची - अनूची एकामागोमाग सात मुलांना जन्म देऊन हाडाची काडे झाली तरीही तो कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेत नाही आणि मुलांच्या पालनपोषणाचीही जबाबदारी घेत नाही. उलट अनारोग्य होईल असंच जाणूनबुजून बाजारचं अन्न मुलांना खाऊ घालतो. मुलांचा कोणताही विचार न करता आरामखुर्ची आणि बगीचा यातच आपला वेळ घालवितो. त्याचा एकमेव छंद असलेल्या बगीच्यातले गुलाबाचे झाड विकतो पण त्याचवेळी त्याच्या मुलीचा- साधनाचा अपघात होऊन तिच्या पायाचे हाड मोडते व सगळे पैसे त्यातच खर्च होतात. शेवटी आपण स्वत:च वाढविलेला पोरवळा पोसता येत नाही आणि आपला आवडता छंदही जोपासता येत नाही म्हणून वैफल्यग्रस्त होऊन एके मध्यरात्री खोलीला बाहेरून कुलूप लावून आत बायको- मुलांना पेटवून देतो. त्यातच त्यांचा होरपळून मृत्यू होतो आणि एका कुटुंबाची उद्‌ध्वस्तता समोर येते.

या कथांमधून येणारे कुटुंबांचे उद्‌ध्वस्तपण पाहिले तर कुटुंबसंस्थेमागील सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक आणि भावनिक सुरक्षा ही उद्दिष्टे इथे साध्य होताना दिसत नाहीत. एरवी माणसांचे कुटुंबाशी आणि कुटुंबीयांशी जे नाते, जे प्रेम निर्माण होते, ते या पात्रांच्या वर्तनातून कुठेच प्रत्ययास येत नाही. यातून कुटुंबसंस्थेविषयीच प्रश्नचिन्ह निर्माण होतो.

**क) नातेसंबंधांवरील भाष्य :**

माणसे अनेक प्रकारच्या नातेसंबंधांनी एकमेकांशी जोडली गेली असतात. प्रस्तुत कथांमधूनही विविध प्रकारच्या नात्यांचे बंध आढळतात. परंतु नवरा- बायको, आई- मुलगा आणि आई-मुलगी ह्या तीन नातेसंबंधातील ताणेबाणे अधिक ठळकपणे प्रत्ययास येतात. 'मुरगी' कथेतल्या धानू शिरनाळे आणि रुक्मिणीबाई यांच्यात पतीपत्नी म्हणून कोणताही भावनिक बंध नाही. धानू हा दादर स्टेशनवर हमालाचे काम करणारा दारुड्या आहे. पण तो आताशा केवळ बायकोच्या कमाईवरच जगतो. रुक्मिणीबाई धुणीभांडी करून नवरा व पाच

मुलांच्या संसाराचा गाडा ओढते. पण घराचा कर्ता पुरुष हा भाव जोपासणारा धानू मात्र बायकोच्या कमाईवर जगताना जराही खंत बाळगत नाही. उलट बायकोने अडीअडचणीसाठी लपवून घरात ठेवलेले पैसे शोधून दारू पिऊन येत असतो. पदीने केरूसोबत लग्नाला नकार दिल्याने तो दारूच्या नशेत पदीला शिवीगाळी व मारहाण करतो. तेव्हा रुक्मिणीबाईने त्याला विरोध केल्यावर तो -" तू कोण मला सांगणार... मी मालक आहे या घरचा." आणि "मी घरमालक असून मला बोलायचा अधिकार नाही, म्हंजे काय ? (पृ. १२) असा प्रश्न करतो. साहजिकच पत्नीमुलांची जबाबदारी असणाऱ्या धानूचा रुक्मिणीबाईसमवेत भावनिक बंध जुळत नाही. त्यामुळे तीही लग्न झालंय म्हणून केवळ ते नाते निभावत असल्याचे दिसून येते. यातून लग्नसंस्थेद्वारे निर्माण झालेल्या नात्यातील अगतिकताच अधोरेखित होते. किंबहूना पदी आणि केरू (मुरगी), मालती आणि बाबू आकाराम बोरसे (सांड), सुरेखा आणि बाबू (पायातला बूट), माई आणि आबा टुकरूळ (फाईव्ह गार्डन), अनू आणि भास्कर राणे (बगीचा), काकू आणि काका (नवरा), भामा आणि बंडू अवदारे (बायका खाणारी माणसे), आई आणि अण्णा (अक्करमाशा), मैमुना आणि बाकरमिया (पडदा), सुनंदा आणि अंबादास टिपटाळेकर (पोल्ट्री फार्मिंग), या सर्व दांपत्यांमध्ये कोणतेही भावनिक बंध तयार होत नाहीत. पण केवळ शारीर गरज म्हणूनच त्यांना मुले होतात. मुलांच्या असण्यानसण्यातून त्यांना कोणताही फरक पडत नाही. त्यामुळे मुलांच्या भवितव्याचीच नव्हे तर आजच्या अवस्थेचीही त्यांना कसलीच फिकीर असलेली दिसत नाही. मुलांचे आजारी पडणे (बगीचा); मूलाचे दगावणे (बगीचा, पोल्ट्री फार्मिंग); मुलांनी वाममार्गाला लागणे (मुरगी, बेबी, पडदा, फर्ज्य) अशा घटनांनीही ही दांपत्ये विचलित होताना दिसत नाही. त्यांना मुलांविषयी तर राहोच पण एकमेकांबद्दलही प्रेम, आस्था निर्माण झालेली दिसत नाही. पती - पत्नी या नात्यातून स्त्रीपुरुषांमध्ये फुलणारे प्रेम, सामंजस्य, संवाद या सर्वच बाबींचा इथे अभाव आढळतो. 'बायको' म्हणजे केवळ पोटाची आणि पोटाखालची भूक भागविणारे यंत्र आहे तर 'नवरा' म्हणजे आपल्या आयुष्याचा असा मालक, ज्याच्या प्रत्येक आज्ञेसाठी आपण सदैव तत्पर असलं पाहिजे आणि आपल्याला कितीही पटत नसले तरी त्याची प्रत्येक इच्छा स्वेच्छेने किंवा नाईलाजाने शिरोधार्य मानलीच पाहिजे, हा सामाजिक रिवाज मनोमन वागविणारी अगतिक 'बायको', अशा साकार झालेल्या स्त्रीपुरुषांच्या प्रतिमा लक्षात घेतल्या तर पतीपत्नी नात्यातले भावविश्वच इथे आकार घेत नाही. त्यांच्यात भावनिक, कौटुंबिक, सामाजिक पातळीवरील देवाणघेवाण होताना दिसत नाही, त्यांचे दांपत्यजीवन केवळ भौतिक पातळीवरच वावरताना दिसते.

यानंतर आई - मुलाच्या नात्यातला बंध कशा प्रकारे व्यक्त झाला आहे, हे पाहणे इथे महत्त्वाचे आहे. आई आणि मुलगा यांच्यातल्या नात्याचा विचार आपल्याला 'मुगरगी', 'सांड', आणि 'अक्करमाशा' या कथांच्या आधारे करता येतो.'मुरगी' कथेतले सदू आणि म्हादू शिकावेत, त्यांनी मार्गाला लागावे, असे रुक्मिणीबाईला वाटते. धुणीभांडी करून मुलांचे पालनपोषण करत. परंतु तरीही घरात नुसतेच बसून राहाणे, नाक्यावरच्या मुलांसोबत टवाळक्या करणे, पत्ते खेळत राहाणे, आईचा पगार परस्पर घेऊन येऊन तो खर्च होईपर्यंत घरी न येणे अशा गोष्टी करीत राहातात. शेवटी पोलीसांना पकडुन नेल्यावर आईचे काळीज म्हणून रुक्मिणीबाई केरूचे पाय पकडून मुलांना सोडवून आणते. त्यामुळे या मुलांना आपल्या आईचे दिवसरात्र केलेले कष्ट, तिच्या जीवाची होणारी तडफड कळत नाही. सांड

कथेतला गजा हा बालवयापासूनचा  प्रौढ वयापर्यंतचा त्याचा काळ कथेत येतो. प्रौढवयातल्या गजाच्या आजच्या मनोधर्माच्या घडणीमध्ये त्याच्या बालवयातल्या अनुभवविश्वाचा मोठा वाटा आहे. वडील नसलेला गजा आई, काका- काकू, त्यांची दोन मुले, घरगडी यांच्यासोबत संयुक्त कुटुंबात राहात असतो. पण वडिलांशिवाय वाढणाऱ्या गजाला आईचेही प्रेम मिळत नाही. नवऱ्याशिवाय जगणाऱ्या आईचे प्रेम काकावर आहे. तिचे काकासोबत शारीरिक संबंधही आहेत. सर्व काही काकाच असल्याने ती मुलाच्या पालनपोषणाकडे, त्याच्या बालहट्टांकडेही लक्ष पुरवीत नाही.त्याचे कसलेच लाड करीत नाही. अगदी संपत्तीतला गजाचा वाटाही काका हडप करतो. तरीही ती कोणताच आक्षेप घेत नाही. काका येता- जाता गजाला मारतो, तरीही तिला दु:ख होत नाही. इतकेच नव्हे तर रोज गजा आईच्या कुशीत झोपतो तेव्हा मध्यरात्री काका झोपलेल्या गजाला उचलून गोठ्यात नेऊन ठेवतो. रात्री जाग आलेल्या गजाला दरवाज्याच्या फटीतून आईकाकाचा संभोग दिसतो. आडदांड राक्षसासारखा दिसणाऱ्या काकाविषयी त्याच्या मनात  संताप व आपल्या नाजुकसाजुक आईविषयी कणव निर्माण होते. परंतु एके दिवशी जेव्हा आईच काकासोबतच्या संभोगाला पुढाकार घेताना दिसते तेव्हापासून तो स्वत:हून  गोठ्यात झोपायला सुरुवात करतो.याविषयी गजाला दु:ख तर होते; पण त्याहूनही तिच्याविषयीचा तिरस्कार निर्माण होतो.काकाची सततची मारझोड आणि आईचे वेगळे रूप पाहून गजा संधी मिळताच मुंबईला पळून येतो. तिथे तो मूळच्या मलकापूरच्याच असलेल्या आप्पा कोलतेंच्या घरी राहातो.या घटनेनंतर आईही त्याला गावी परत बोलावत नाही. या सगळ्यातून दुखावलेला गजा आपली आई, आपले कुटुंबीय, आपले गाव या साऱ्यांपासून कायमचा दुरावतो; परात्म पावतो.  काही वर्षांतच एक नामांकित चित्रकार म्हणून प्रसिद्धी मिळवितो. आईने आपल्याला जन्म दिला म्हणून तिला न चुकता मनीऑर्डर पाठवत राहातो. पण तिला आयुष्यात कधीही माफ करीत नाही, अगदी ती वृद्धावस्थेने आता फार दिवसांची सोबती नसल्याचे पत्र गावाहून येते तरीही तो तिला भेटायला जात नाही.

सर्वसाधारणपणे आई - मुलामध्ये  ज्या प्रकारचे नाते आढळते, त्या नात्यातील कोणत्याही गोष्टींचा अनुभव इथे प्रत्ययास येत नाही.  तर 'अक्करमाशा' कथेतला लखुमामा अण्णांकडून पैसे घेऊन अन्याच्या आईचे लग्न अण्णांसोबत लावून देतो. (दुसऱ्या भाषेत लखुमामा आपल्या बहिणीला पैसे घेऊन विकतो.) अण्णा नपुंसक असल्याने ती तावडेबरोबर संबंध ठेवते. अन्याही तावडेचाच मुलगा आहे. पण ज्यांचे वडील म्हणून अन्याचे कागदोपत्री नाव लागलेले असते त्या अण्णांविषयी अन्याला कृतज्ञता वाटते.  अण्णांचा मृत्यू झाल्यावर आईने लोकलाजेस्तव का होईना पण दु:ख व्यक्त करावे, असे वाटते. याउलट  ज्या पुरूषाने आपल्याला कोणतेही सुख दिले नाही म्हणून त्याच्या मृत्यूचा खोटा आव तिला आणता येत नाही. एकदा चाळीतल्या लोकांना मृत्यूची बातमी कळली तर  सगळे जमून अंत्यविधी होईपर्यंत किती वेळ जाईल, याचा अंदाज नसल्याने ती  अन्याला व स्वत:ला कॉफी करते. तेरावं झाल्यावर पुन्हा ठरलेल्या हॉटेलात तावडेला भेटायला जाते. त्यावेळी अन्या त्याच्या प्रेयसीला - पुष्पाला घेऊन हॉटेलवर आई- तावडेला पकडण्यासाठी जातो. पण  न पकडताच परत येतो. ज्याच्याकडून कधीच सुख प्राप्त झालं नाही, ज्याच्यावर कधीच प्रेम नव्हतं, ज्याच्याशी कधीच सुखसंवाद झाला नाही, त्याच्यासोबत आयुष्यभर संसार करण्याची आईला सजा मिळाल्याची व तिची झालेली भावनिक- शारीर कोंडी अन्या समजून घेतो. हे प्रचलित आई - मुलगा नात्यातले वेगळे हृद्य दर्शन आहे.

या कथांमधून येणारे प्रत्येक आई पात्र आपल्या मुलांवर संस्कार करताना दिसत नाही. त्यांच्या मुलांना भविष्याविषयीची स्वप्ने देत नाहीत वा स्वत:ही अशी स्वप्ने पाहात नाही. मग ती गजाची आई असो (सांड), दिपूची आई असो (नवरा), बेबीची आई असो (बेबी), अन्याची आई असो (अक्करमाशा), बच्चाची आई (आयशीचे ह्रदय) असो की डेस्डिमोनाची आई असो (आपण ह्यांना पाह्यलं आहे काय?). ही सगळी आईपात्रे आपल्याच मुलांविषयी, त्यांच्या भविष्याविषयी उदासीन, वात्सल्य भावनेचा लवलेश नसणारी तरी आहेत किंवा भाबड्या प्रेमातिरेकाने त्यांना वाया जाऊ देणारी आहेत. (बेबी, फर्ज्य) साहजिकच आई आणि मूल यांच्या नात्यातला एरवीचा गोडवा, भावनिक बंध यांचा प्रत्यय इथे येत नाही.

**ड) मूल्यऱ्हास :**

व्यक्तिजीवन आणि पर्यायाने समाजजीवनही उदात्त मानवी मूल्यांवर अधिष्ठित असावे, अशी सर्वसामान्यत: अपेक्षा असते. प्रस्तुत कथांमधून पात्रांनी अंगिकारलेल्या मूल्यांचे स्वरूप कसे आहे, हे पाहणे इथे उचित ठरेल. 'मुरगी' कथेतला केरू हा लग्नाआधीपासूनच वेश्यागमन करीत असतो. परंतु आपण नपुंसक होण्याच्या वाटेवर आहोत, याची कल्पना असलेला केरू तरीही लग्न करण्याचा अट्टाहास करतो.निम्म्याहूनही वयाने लहान असलेल्या पदीच्या शारीर सौंदयाची आसक्ती बाळगतो. तिची नटण्या-थटण्याची, सिनेमाची आवड लक्षात घेऊन तिला मिळविण्यासाठी रुक्मिणीबाई व धानूला अडीअडचणीला पैसे व घरात सुखचैनीच्या वस्तू पुरवून मिंधे करतो आणि एक प्रकारे गैरमार्गाने पदीला मिळवितो. परंतु लग्नाच्या पहिल्याच रात्री पदीने त्याचा 'नामर्द' असा उपहास केल्यावर तो क्षणाचाही उसंत न घेता तिची तुलना मनोमन कुलाब्यातल्या वेश्येशी करून तिचा खून करतो. यातून त्याचे पदीवर प्रेम आहे म्हणून नव्हे तर मी एक पुरुष आहे. माझ्याकडे पदीला विकत घेण्याइतका पैसा आहे, याच अहंकारातून तो पदीला, तिच्या सौंदर्याला प्राप्त करतो. यातून केरूचे जीवनमूल्य कसे अध:पतित आहे, हे इथे स्पष्ट होते. तर 'पायातला बूट' मधला बापू बायकोची किंमत पायातल्या बुटाइतकीच करतो. तिच्याकडून शारीर सुखाबरोबर हातपाय चेपून घेणे, अशी सेवाही करवून घेतो. परंतु सुरेखाला दिवस जात नाहीत तसे दोघांनी वैद्यकीय तपासणी केली असता बाबूतच दोष आहे, हे सिद्ध झाल्यावर आणि आपल्या आईबहिणींकडून दुसऱ्या लग्नाचा प्रस्ताव आल्यावर तो आपले सुरेखावरच प्रेम आहे, असे सुरेखाला व बहिणीलाही सांगतो. परंतु दुसरे लग्न न करण्यामागे आपले नपुंसकत्व तसेच महागाईच्या काळात दुसऱ्या पत्नीच्या रूपाने खाणारे एक तोंड वाढेल, ही कारणे तो दडवून ठेवतो. यातून एक व्यक्ती म्हणून आपली बायको व आईबहिणींनाही फसवतो. त्यातून प्रत्यक्ष जवळच्या नात्यातल्या आपल्याच माणसांशी बाबूच्या फसव्या वर्तनातून माणसा माणसांमधील पारदर्शक व्यवहाराचा, नात्याचा अभाव कसा आहे, हे कळते.

'फाईव्ह गार्डन'मधील पैशाची चटक लागलेल्या आबा टुकरूळला आपली महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी तो आपल्याच पत्नीला स्वत:च्या वरिष्ठांची शय्यासोबत करण्यास लावतो. इतकेच नव्हे तर घरी स्वत:च गिऱ्हाईके घेऊन येत असतो. आबाच्या या गैरव्यवहारांनी दुखावलेली माई तिच्याकडे येणाऱ्या एका तरुण अधिकाऱ्याच्या प्रेमात पडते.परंतु माईने हा वेश्याव्यवसाय विनातक्रार आणि निर्लेप मनाने करावा, ही आबाची अपेक्षा असते, माईची ही कृती आबाला आवडत नाही. ज्या वरिष्ठाची मर्जी संपादन करण्यासाठी आबाने प्रारंभी माईला शय्यासोबत करण्यासाठी भाग पाडलेले असते, त्याच

कोरेसाहेबाच्या मदतीने पोलीसांना माहिती पुरवून माईला व तरुण अधिकाऱ्याला पकडून देतो आणि 'आपल्याच घरात हे गैरव्यवहार चालू आहेत, हे माहीत नव्हतं', असा पोलीस ठाण्यात जबाब नोंदवितो. माईला स्वत:च वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणारा, तिला स्वत:च गिऱ्हाईके आणून देणारा, या धंद्यातून स्वत:च पैसा मिळविणारा, माईला कमाईचे साधन ठरवून 'वस्तुमूल्य' मानणारा आणि पोलीस ठाण्यावर स्वत:ची जबाबदारी झटकणारा आबा पाहाता प्रत्यक्ष पतीपत्नीतली विश्वासार्हता लयास जाऊन या नात्यालाही कोरडं रुक्ष बाजारूपण प्राप्त झालं आहे आणि नात्यांचेही अवमूल्यन कसं झालं आहे, याचा प्रत्यय इथे येतो.

'एक सुन्हेरा ख्वाब' या कथेचा विचार करता, जगात क्रांती होईल; कामगारांचे राज्य येईल; त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण होईल, या प्रेरणेने तरुण कामगार चळवळीत येतात, संघटनेच्या कामासाठी स्वत:ला वाहून घेतात. अगदी मागचापुढचा विचार न करता पक्षाचे नेतृत्व, संघटनेचे नेतृत्व आणि चळवळीचे नेतृत्व जे जे सांगतील ते ते भक्तिभावाने करतात. बंड्या, नरसू, सिबातिन आणि इबू हे चार तरूण विनायक वाकटकर या युनियनच्या पुढाऱ्यावर आंधळा विश्वास ठेवून वागत असतात. वाकटकरला आपली महत्त्वाकांक्षा साध्य करण्याच्या मार्गातील आणखी एक युनियनचा पुढारी- बोरसे हा काटा ठरत असतो. म्हणून बोरसेचा काटा काढण्यासाठी वाकटकर या चौघांना हाताशी धरतो आणि या चौघांकडून बोरसेचा खून घडवून आणतो. हे चौघेही हा खून शिताफीने करत नाहीत. सर्व पुरावे पोलीसांच्या हाती सहज मिळाल्याने चौघेंनाही सजा होते. तेव्हा पोलीस कोठडीत यांना रोजचीच मारहाण होते. सर्व प्रकारच्या शारीर छळाला सहन करूनही हे चौघे तरुण वाकटकरचेच हे कपट असल्याचे उघड करीत नाहीत.यातून या चौघांचे हसते- खेळते जीवन विदारक बनते. पुढे त्यांना अणिबाणीविरुद्ध लढणारा अनिल भेटल्यावर त्यांचे मतपरिवर्तन होते व ते अणिबाणीविरुद्ध नवा लढा उभारतील, असा निश्चय करतात, परंतु त्यापूर्वीच अनिलला अटक होऊन ठाण्याच्या जेलमध्ये ठेवलेय, असे पत्र येते. आपल्या सर्वस्वाचा होम करून चळवळीच्या उदात्त हेतूसाठी बेभानपणे लढणाऱ्या तरुणांना युनियन लीडर स्वत:च्या महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी कशाप्रकारे वापरून घेतात आणि गरज संपल्यावर कसे फेकून देतात, याचे चित्रण प्रस्तुत कथेतून होते. साहजिकच कामगार चळवळीसारख्या उदात्त हेतूमध्ये आपले हितसंबंध पाहणाऱ्या आणि माणसांना 'साधनमूल्य' ठरविणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेची खेळी इथे उघड होते. तसेच हा तुरुंग केवळ एका वास्तुपुरताच मर्यादित राहिला असे नव्हे तर अणिबाणीच्या रूपाने संपूर्ण देशच कसा तुरुंगवास ठरला आहे, याविषयीचे देखील भाष्य येते.

'देश पुढे गेला' या कथेत चलनवाढ, चलनफुगवटा या अर्थकारणातल्या खेळींचा उपयोग करून मध्यमवर्गाचे कसे अवसान घडविले आहे, याचे चित्रण कथेतून केले आहे. श्रीमंत वर्ग आपल्या आर्थिक क्षमतेच्या बळावर हवं ते मिळवू शकत असतो. त्यामुळे त्याला कोणत्याच क्रांतिकार्यात उतरण्याची गरज भासत नाही. तर गरीब वर्ग हा दिवसरात्र कष्ट करूनही दोन वेळच्या अन्नासाठी मोताद झालेला असतो. त्याची सगळी लढाई ही हातातोंडाची गाठ मिळविण्यात खर्च होत असते. त्यामुळे आवश्यक गरजांची पूर्ती होऊन ज्याच्याकडे काही वेळ आहे, इच्छा आहे आणि बौद्धिक- वैचारिक सामर्थ्य आहे, असा मध्यमवर्ग हा क्रांतिकार्यात अग्रेसर असतो. साहजिकच शोषक असणाऱ्या भांडवलशाही आणि भांडवलशहांना हा मध्यमवर्ग नेहमीच आव्हान देत आला आहे. त्यामुळे त्यांचे नैतिक

खच्चीकरण केले पाहिजे, तरच भांडवलदारांना रान मोकळे होईल.हा आशय इथे समर्थपणे व्यक्त होतो. मधुकर हा जपानमध्ये पंधरा वर्षे नोकरी करून भारतात परतल्यावर त्याला भारतात चलनवाढीची समस्या भेडसावते. रुपयाचे अवमूल्यन होऊन वस्तूंच्या किमती अव्वाच्या सव्वा वाढलेल्या असतात. त्यामुळे परळ लालबागचा कामगारवर्ग तर नामशेष होतोच परंतु दादर- गिरगावातला सुशिक्षित पांढरपेशी मध्यमवर्गही पार कर्जतच्या पलिकडे उल्हासनदीच्या काठी वसलेला असतो. कितीही काम करून देशात लोकांना दोन वेळच्या अन्नाची जेमतेम सोय करता येत असते. अर्थात, हे सगळं सरकारच्याच पंचवार्षिक योजनांचे फलित आहे. म्हणजे शासनव्यवस्था व भांडवली व्यवस्था यांची अभद्र युती होऊन मध्यमवर्गाला मुंबईच्या बाहेर काढायचा त्यांचा कुटिल डाव सफल होतो. त्यामुळे ज्या भांडवली व्यवस्थेतून व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्याचा पुरस्कार झाला, त्याच भांडवली व्यवस्थेने व्यक्तिस्वातंत्र्याला, व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांना आणि पर्यायाने एका विशिष्ट समाजवर्गाच्या अस्तित्वालाच कसे नाकारले जाते. हे या कथेतून दिसून येते.अर्थात, हे केवळ शासनव्यवस्थेचेच कारस्थान नाही, तर मध्यमवर्गीयांनी जोपासलेला खास 'मध्यमवर्गीयपणाचा' अहंभाव, जपलेल्या धारणा, रुढी, परंपरा यातून जी गतानुगतिक मानसिकता आणि निष्क्रियता निर्माण होते, तीही तितकीच कारणीभूत आहे. थोडक्यात, नागरीकरणातून साकार झालेली संस्कृती आणि तिचे संभाव्य परिणाम यातून भविष्यकाळाचे दिग्दर्शन इथे घडविले आहे.

एकूणच प्रस्तुत कथांमधून मुंबई महानगराचा जो इतिहास,भूगोल यांसह सामाजिक- राजकीय- आर्थिक- सांस्कृतिक- भौतिक अवकाश साकार झाला आहे त्यामुळे व्यक्तिजीवनाचे, व्यक्ति-व्यक्ती नातेसंबंधांचे, व्यक्ति-समाजसंबंधांचे आणि व्यक्ति-शासनव्यवस्था संबंधांचेही अवमूल्यन झाल्याचे इथे निदर्शनास येते.

**इ) जगण्या- मरण्याची नगण्यता :**

मुंबई महानगरीत एका छोट्या चिंचोळ्या भूप्रदेशात लोकसंख्येचा विस्फोट झाला आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षण, कला आदी क्षेत्रांत असलेल्या संधी आणि गुणग्राहकता यामुळे केवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे तर पूर्ण देशभरातूनही स्थलांतरितांचे- विस्थापितांचे लोंढे मुंबईत येऊन दाखल होतात. आपला प्रांत, प्रादेशिक भाषा, किंवा बोली, कौटुंबिक किंवा गावच्या परंपरा यातून झालेली जडणघडण आणि नागरी परिवेश यांच्यातील द्वंद्वातून जे व्यक्तिमत्त्व निर्माण होते त्याला कोरडं बाजारूपणा, पैसाकेंद्री नातेसंबंध, रूक्षपणा, संवेदनहीनता, स्पर्धेतून निर्माण होणारा एकमेकांविषयीचा अविश्वास, संशय आदी गुणांचा संदर्भ प्राप्त होतो. तसेच जागेच्या अभावातून झोपडपट्ट्या, चाळीतल्या वास्तव्याला वाहात्या गटारांची सोबत आणि गिरणीतल्या तीन प्रहरी नोकरीमुळे उबलेला दिवस- रात्र या सगळ्यासह एक 'जगणे' आकार घेत असते. याचाच प्रत्यय आपल्याला प्रस्तुत कथासंग्रहातून येतो.

केरू या हमालाचे दादर रेल्वे स्टेशनवर हमाली करून पोट भरणे, झोपडपट्टीत राहाणे, आपले स्वत:चे कुणी हक्काचे , जवळचे नसणे, निवाऱ्याचे स्थान नाही म्हणून दीर्घकाळ अविवाहित राहाणे, शरीराची गरज म्हणून वेश्यागमन करणे या साऱ्या प्रसंगांतून सर्वसामान्य मुंबईकर माणूस हा कोणकोणत्या गोष्टींपासून वंचित राहातो, हे लक्षात येते व त्याच्या

जगण्याचाही स्तर अधोरेखित होतो. तर 'सांड' कथेत बाबू आकाराम बोरसे हा गिरणीकामगार असून बाबूसोबत मालती आणि त्यांची तीन मुले व त्याचे आईवडील हे 'बारा चाळ' नावाच्या परिसरातील एका चाळीतल्या दहा बाय दहाच्या अंधाऱ्या खोलीत राहात आहेत. साहजिकच अशा कंटाळवाण्या परिसरात इतक्या माणसांची दाटीवाटी, अपुरा पैसा, अर्धवट शिक्षण, माणसांतील षट्विकार या सगळ्यातून जीवनाला जो पोत लाभतो, त्याचा प्रत्यय बाबू, त्याचे आईवडील यांच्या वर्तनातून येतो.

'पायातला बूट' कथेतला बाबू (हाही बाबूच) हा मूळचा कोल्हापूरचा असला तरी तो पानशे काकांच्या चाळीतच लहानाचा मोठा होतो. अजिबातच शिक्षण नसलेला बाबू काकांच्या मृत्यूनंतर त्यांच्याच खोलीत राहातो.रस्त्यात उभं राहून उटणे, अगरबत्त्या, लिंबे विकणे, पेपर टाकणे अशा धंद्यातून पैसा जमवून स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचे दुकान थाटणे इथपर्यंत मजल मारतो. परंतु मुंबईत आपल्या माणसांशिवाय वाढलेला आणि शिक्षणाचा जराही गंध नसलेला बाबू आपल्या पुरुषपणाचा अहंकार बाळगतो. अन्य कुठेही आपले स्वतंत्र अस्तित्व नसलेला, दुनियेच्या स्पर्धेत नगण्य ठरलेला बाबू सुरेखाकडून आपल्या तथाकथित पुरुषत्वाच्या अहंकाराला कुरवाळून घेतो व त्यातच सुखाची परमावधी मानतो. त्यामुळे महानगरामध्ये बाबू आणि बाबूसारखे जीवन जगणाऱ्या माणसांची सुखाची कल्पना कोणत्या स्वरूपाची आहे, हे लक्षात घेता येते.

'फाईव्ह गार्डन' मधला आबा टुकरूळ हा म्युनिसिपाल्टीत कारकून असून तो व माई हे दांपत्य फाईव्ह गार्डन जवळच एका पत्र्याच्या खोलीत राहातात. विटलेला परिसर आणि विटलेले जीवन यांचे एकात्म दर्शनच आपल्याला त्यांच्यासंदर्भात अनुभवास येते.

एक सुन्हेरा ख्वाब'मधील बंड्याही गिरणी कामगार असून विनायक वाकटकर ह्या एका युनियन लीडरसाठी बोरसेचा खून करतो. 'काहीतरी' करण्याची जिद्द असणारा पण हे 'काहीतरी' म्हणजे काय आणि कसे साध्य करायचे, याचे भान आणि मार्गदर्शन नसणारा बंडू चाळीतल्या खोलीत राहात असला तरी त्याचा सगळा बाडबिस्तारा चाळीच्या गच्चीवरल्या टाकीखालीच असतो. गिरणी, चाळ आणि तुरुंग या स्थलावकाशातच त्याचा सगळा वावर असतो. त्यामुळे त्याचे सगळे भावविश्व, त्याची स्वप्ने आणि प्रत्यक्ष जगणं याच स्थलांशी संबद्ध आहे. साहजिकच या जगण्यातली प्रतवारी व त्याची नगण्यता इथे तीव्रतेने समोर येते.

एकूणच 'देश पुढे गेला', 'वेड', 'तुम्ही ह्यांना पाह्यलं आहे काय' या कथा वगळता सर्वच कथांमधील पात्रे ही निम्नमध्यमवर्गीय किंवा निम्नवर्गीय असून ती चाळीत किंवा झोपडपट्टीत राहातात. मुंबईसारख्या महानगरात त्यांच्या जगण्याला कोणतेही मोल प्राप्त होत नाही. चेहरा नसलेल्या गर्दीच्या शहरात ही पात्रे केवळ संख्येची आकडेवारी बनून जगतात. याविषयीची खंत व्यक्त करताना माई -" मेलं कसलं हे जिणं? महाराच्या जन्माला आलो असतो, तरी बरं झालं असतं. त्यांना मान आहे समाजात, पण आपल्याला मात्र नाही. आपल्या समाजात नाही, आपल्या मलाबाळांत नाही! आपल्या पोटचा गोळा, आपल्याला दोन घास मिळतात की नाही हे पाहायला तयार नाही." (पृ.४३) या शब्दांत व्यक्त करते. यातून महानगरात माणसे गर्दीत जगत असली तरी ती आपल्या माणसांमध्ये असतातच, असे नाही. तर मरण्याची नगण्यता व्यक्त करताना- "आपल्याला समाजात कोण आहे? मी

भिकारी नि ही रांड. आपली मुलंही आपलं तोंड बघायला तयार नाहीत. पुढं असं जगूनही असं काय होणाप आहे? कुणाशी बोलायची सोय नाही की कुणाला काही सांगायची नाही. आणखी किती वर्षे आपण इथे फाईव्ह गार्डनमध्ये बसून वेळ घालविणार आहोत.त्यापेक्षा जीव गेलेला पत्करला. खरं म्हणजे उशीरच झालाय जीव द्यायला. आपण पूर्वी जीव दिला असता तप निदान लोक प्रेतयात्रेला आले असते. आता आपल्याला म्युनिसिपालटीची गाडीच घेऊन जाईल." (पृ.४७) अशा शब्दांत आबा व्यक्त करतो. यातून महानगरातल्या माणसांच्या अभिलाषा, त्यासाठी निवडलेला वाममार्ग, आपल्याच मुलाबाळांनी दूर जाणे आणि वैफल्यग्रस्त एकाकी जगणे- मरणे यातली विदारकता इथे चित्रित होते.

भाऊ पाध्ये यांच्या कथांमधील पात्रांचे मृत्यूदेखील असेच नगण्य आहेत. या मृत्यूंना प्रत्यक्ष महानगरी जगण्याचा संदर्भ नसला तरी परोक्षरूपात मात्र तो महानगरी जगण्याशीच निगडित आहे. उदाहरणार्थ 'मुरगी' कथेतला पदीचा मृत्यू हा सकृद्दर्शनी केरूच्या कृतीतून होत असला तरी केरूच्या या कृतीमागे महानगरातील जगण्याची नगण्यताच कारणीभूत ठरते.अल्पशिक्षण, हमालीचे काम, जागेचा अभाव, आप्तस्वकीयाचे नसणे, शारीर भूकेची गरज म्हणून वेश्यागमन करणे अशा सर्व प्रकारच्या अभावग्रस्ततेतून जी काही मानसिकता तयार होते. त्या मानसिकतेचा परिपाक म्हणून आणि केवळ नवरा/ एक पुरुष म्हणूनच सत्ता गाजविण्यासाठी एकमेव अवसर असलेल्या ठिकाणीच आपण उपहसनीय ठरतो, हा अपमान पचवू न शकलेला केरू पदीचा खून होतो. त्यामुळे पदीचे जीवन आकार घेण्यापूर्वीच संपुष्टात येते, झोपडपट्टीत एक मुलगी जन्माला आली आणि एखाद्या 'मुरगीसारखी कटून' मेली, इतकाच संदर्भ तिच्या मृत्यूला प्राप्त होतो. तर 'पोल्ट्री फार्मिंग' कथेतला अंबादासही केरूसारखाच चाळीशीपर्यंत अविवाहित राहिला आहे. फारसे कर्तृत्व अंगी नसलेल्या अंबादासच्या जीवनात सर्व प्रकारची अभावग्रस्तता आढळून येते. त्याच्याकडेही हक्काचा निवारा नाही. कधी समाजवादी पक्षाच्या तर कधी काँग्रेसच्या कार्यालयात राहून तो आयुष्य व्यतीत करतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या अंबादासचेही लग्न रखडले आहे. परंतु काँग्रेसमधील गुमास्त्यांच्या संघटनेचे काम करण्यासाठी महिना नव्वद रुपये मिळू लागताच बाबीशेट डिचोलकरच्या सोळा- सतरा वर्षांच्या भाचीशी लग्न करतो. परंतु इतकी वर्षे सडाफटिंग आयुष्य जगलेल्या/ जगावे लागलेल्या अंबादासला माणसांची नाती, लग्नसंस्था, कुटुंबसंस्था यांचे गांभीर्य जाणवत नाही व तो मुलाची आणि सुनंदाची खाण्यापिण्याची, औषधांची आबाळ करतो. त्यातच त्याच्या मुलाचा मृत्यू होतो. मुलाचा मृत्यू व अंबादासचा बाहेरख्यालीपणा या दोन घटनांनी सुनंदा खचते व वेडसर होऊन अन्नपाणी सोडते. त्यातच तिचाही करुण मृत्यू होतो. एका अनाथ मुलीची महानगरातल्या महागाईच्या परिस्थितीतील केवळ 'एक खाणारे तोंड' म्हणून मामाकडून आणि नवऱ्याकडून गणना केल्याने तिचा मृत्यू ओढावतो. तर 'सांड' कथेतील अपुऱ्या जागेतला संसार, अपुरी कमाई आणि सतत जन्माला घालावा लागणारा पोरवडा यामुळे खंगून खंगून मालतीच्या जावांचा मृत्यू होतो. ह्या सर्व परिस्थितीला प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे महानगरी अवकाश आणि या विशिष्ट अवकाशातून साकार झालेली मानसिकताच जबाबदार आहे.

'एक सुन्हेरा ख्वाब'मध्ये विनायक वाकटकरच्या अतिरिक्त महत्त्वाकांक्षेतून तो बंड्या, इबू, सिबातिन आणि नरसू या तरुणांच्या आयुष्याशी खेळतो आणि बोरसेचा खून घडवून आणतो. महानगरातील विविध स्वरूपाच्या अभिलाषा प्राप्त करण्यासाठीचा सत्तासंघर्ष इथे दिसून येतो. प्रसंगी या सत्तासंघर्षात कुणाचा मृत्यू घडवून आणावा लागला तरी मागेपुढे

पाहिले जात नाही. त्यामुळे सत्तासंघर्षात कुणाच्या मृत्यूचाही मुलाहिजा न बाळगण्याचा निबरपणा इथे प्रत्ययास येतो.

'बेबी' कथेत बेबीला आपल्या सौदर्याचा अभिमान वाटतो. स्वत:च्या सौंदर्याविषयी, कर्तृत्वाविषयी आत्मविश्वास असलेली, आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर असलेली बेबी वय उलटले तरीही कोणत्याच पुरुषाला जवळही फिरकू देत नाही.पण वय उलटून गेल्यावर शारीर गरज आणि भावनिक सुरक्षा यासाठी झोपडपट्टीतल्या इबू या अशिक्षित आणि विवाहित असलेल्या मुस्लीम इलेक्ट्रिशियनबरोबर 'रखेल' म्हणून राहाते. त्याचा व त्याच्या बायकोचा सगळा खर्च  चालविते. तिला दिवस गेल्यावर गर्भपात करण्यासाठी इबू हकिमाकडून कसलेसे चाटण आणून तिला खायला देतो. त्यात प्रचंड रक्तस्राव होतो. डॉक्टरांनी पोलीसांना बोलावल्यावरही ती कोणताच जबाब देत नाही व त्यातच तिचा करुण अंत होतो. महानगरातील मुली स्वावलंबी असल्याने स्वतंत्र राहू शकतात, पुरुषाच्या सोबतीशिवाय राहू शकतात, हा  विचार करून लग्न न करण्याचा घेतलेला निर्णय जेव्हा स्वत:लाच निभावता येत नाही. तेव्हा कोणत्या प्रकारच्या शोकांतिकेला सामोरे जावे लागते, याचे चित्रण इथे आढळते.  हे इथे बेबीच्या निमित्ताने अधोरेखित होते.महानगरातील व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेकी विचार कसा नकळत व्यक्तिकेंद्रिततेत परावर्तित होऊन एकाकी झालेला माणूस माणसांतूनच उठतो, हे इथे बेबीच्या निमित्ताने अधोरेखित होते.

'बगीचा' या कथेतील  कापडगिरणीत कारकून असलेला भास्कर राणे हा महागाईने हैराण झालेला असतो. एका रोपाचे शंभर रूपये मिळतील या लालसेने तो गॅलरीतली आवडीची गुलाबाची रोपे फलीशेटला विकतो. तेव्हा त्याच्या जगण्याचा आधार असणाऱ्या  गुलाबाच्या रोपांना दुरावल्याने तो वेडसर वागू लागतो आणि महागाईत बायको व सात मुलांच्या खाणाऱ्या तोंडांना पुरा न पडल्याने एके रात्री खोलीला बाहेरून कुलूप लावून त्यांना पेटवून देतो. त्यातच त्यांचा करुण अंत होतो. प्राप्त आर्थिक परिस्थितीत मुलांची संख्या किती असावी, याविषयीचा निर्णय घेता येत असताना आणि आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया उपलब्ध असतानाही भास्कर केवळ स्वत:च्या अहंकारामुळे कुटुंबाची वाताहत करतो. त्यामुळे तो ज्या 'विशिष्ट' सामाजिक- सांस्कृतिक  पर्यावरणात वाढतो, ते पर्यावरणच त्याची  'विशिष्ट' मानसिकता घडविते.

थोडक्यात, या सर्व मत्यूंना माणसांचे विशिष्ट वर्तन कारणीभूत आहे. असे वर्तन करण्यापर्यंतचा त्यांच्या मानसिकतेचा प्रवास पाहिला तर ही मानसिकता महानगरातील परिस्थितिशरणता, यंत्रवतता, नात्यातील कोरडं बाजारूपण, किडामुंगीसारखं जगणं- मरणं यांनी  घडवलेल्या भवतालातच  आहे. त्यामुळे अधोलोकातून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास हा शेवटी अधोलोकातच जिरून जातो. अशा पात्रांच्या जगण्यामरण्याची नगण्यता प्रस्तुत कथांद्वारे भाऊ पाध्ये अत्यंत तीव्रपणे मांडतात.

महानगरी जीवनाचे आणखी एक नाकारता न येणारे कटुसत्य म्हणजे इथे व्यक्तीच्या स्वप्नांना पंखांचं बळ देऊन ही स्वप्नपूर्तीही होते त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला स्वप्नांच्या पंखांना छाटून व्यक्तीला रक्तबंबाळ करून कोलमडण्याचेही प्रसंग याच महानगरी जीवनात पाहावयास मिळतात. त्यामुळे पितृसत्ताक आणि पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत जसे स्त्रीचे शोषण होते, तसेच ते पुरुषाचेही होताना  दिसते. महानगरातील जागेची अडचण,



munotes.in

निम्नमध्यमवर्गीय किंवा कनिष्ठवर्गीयांतील ज्यांच्याकडे फारसे वैयक्तिक कर्तृत्व नाही, अशा पुरुषांना स्वत:ला सिद्ध करता येत नाही आणि मग चारचौघांसारखे सर्वसामान्य आयुष्यही त्यांच्या वाट्याला येत नाही. महानगरातील स्पर्धा, जागेची अडचण, माणसांना चेहरा नाही, भावना नाही, संवेदनशीलता,सामंजस्य नाही  पण तरीही भोवती असणारी कोरडी गर्दी यातून व्यक्ती परात्म होते. पण भावनिक- शारीरिक गरजा मात्र शमवता येत नाहीत. असाचा प्रत्यय केरू गाबते आणि अंबादास टिपटाळेकरच्याही संदर्भात येतो. त्यामुळे कथांतून येणारा वेश्यांचा संदर्भ या दोन न- नायकांच्या बाबतीतील अगतिकता, असाहाय्यता आणि अन्न, वस्त्र, निवारा यांची अभावग्रस्तता,  याची परिणती म्हणून लग्न, कुटुंब यांनाही मुकणे या बाबी  ठळक करण्यासाठी येतो.

## ३.५ पात्रचित्रण

भाऊ पाध्ये यांच्या कथा पात्रबहुल कथा आहेत. त्यातील बरीचशी पात्रे टोपणनावाने किंवा नातेसंबंधांवरूनच ओळखली जातात.

मुंबईच्या पोटात बहुस्तरीय लोक जगत असले तरी भाऊंनी साकारलेली स्त्रीपुरुष पात्रे ही कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि निम्नवर्गीय स्तरातली आहेत.

पारंपरिक कल्पनेप्रमाणे प्रस्तुत कथासंग्रहातील स्त्रीपात्रांचेही स्त्रीचारित्र्याविषयीचे आदर्श 'सीतासावित्री' ह्या पौराणिक स्त्रियाच आहेत. परंतु त्यांची आंतरिक ओढ मात्र आपण हिंदी सिनेनटीसारखे असावे, अशीच आहे. 'फाईव्ह गार्डनमधील' माई आपल्या नवऱ्याने 'रांड' असा उल्लेख केल्यावर त्याचा आरोप परतवताना आपण सीतासावित्री नाहीत, याचा खुलासा करते. तर 'पायातला बूट' कथेतील सुरेखा स्वतचे: लग्न ठरताना रस्त्यावर नजर टाकते तेव्हा तिला एक राजेश खन्ना हेमा मालिनीला घेऊन गुलूगुलू बोलत जाताना दिसतात. पण आपलं तेवढं नशीब कुठलं? आणि आपणही कुठे हेमा मालिनी लागून गेलो आहोत!" अशी स्वत:शीच खंत करते. (पृ.३०) 'मुरगी' कथेतली पदीही एखाद्या सिनेनटीइतकीच सुंदर आहे. परंतु तिचे सौंदर्य खूलून- उठून दिसायला हवे असेल तर तिला तसे कपडे आणि सौदर्यप्रसाधने हवीत, असे वाटते. तर 'बेबी' कथेतली बेबी आणि 'आयशीचे हृदय' कथेतली बच्चा ह्या अत्यंत सुंदर, उफाड्याचे सौंदर्य असणाऱ्या, चारचौघांना सहजच आकर्षित करणाऱ्या आहेत.  त्यांना स्वत:च्या सौदर्याचा बडेजावही मिरवता येतो आणि आपल्या सौंदर्याने कोणत्या गोष्टी आपण प्राप्त करू शकतो, याचाही विश्वास आहे. प्रस्तुत कथासंग्रहातील जवळपास सर्वच स्त्रीपात्रे अत्यंत सुंदर परंतु चाळीतल्या- झोपडपट्टीतल्या आर्थिक स्तरानुसारच्या राहणीमानामुळे आपण या ठिकाणी फुकट जात आहोत. आपल्यासारख्या सौंदर्यवतीला अधिक उत्तम राहणीमान प्राप्त झाले पाहिजे, असे त्यांना वाटत राहाते. त्यासाठी ही पात्रे भौतिक सुखसोयी मिळविण्याचा प्रयत्न करतात;आपला आर्थिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी नैतिक- अनैतिक काय किंवा यातून  कोणत्या परिणामांना सामोरे जावे लागेल, याचाही ती विचार करताना दिसत नाहीत. त्यामुळे समाजव्यवस्थेने रुजविलेली मानवी मूल्ये आणि प्रत्यक्षातील अवमूल्यन झालेले जगणे यांच्यामधील द्वंद्वात्मकता इथे उघड होते.

थोडक्यात, *भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा* या कथासंग्रहातून व्यक्त झालेल्या स्त्रीप्रतिमांचा वेध घेतल्यास असे लक्षात येते की या स्त्रिया मुंबई महानगराच्या अधोलोकातील आहेत. त्या जगत असलेला अवकाश इतका विटका आहे की अपरिहार्यपणे त्यांच्या जीवनाचा पोत विटलेला आहे.त्यामुळे त्यांच्या जीवनाची पत आणि प्रतही खालावलेली आहे.

वरच्या वर्गाकडे सरकता येण्याची असोशी असलेली पण न सरकता आल्याने बाह्याचाराचे अनुकरण करणारी ही पात्रे आहेत. या द्वंद्वात अटळपणे त्यांची शोकांतिका घडते. किंबहुना त्यांच्या धारणाच त्यांना विशिष्ट वर्तनधर्म अंगिकारण्यास प्रवृत्त करतात व त्या वर्तनधर्माकडून अटळपणे स्वत:च्या शोकांतिकेकडे ही पात्रे स्वत:च्याच पावलांनी चालत जातात. खा-प्या-ल्या इतक्या प्राथमिक पातळीवरील भौतिक जीवन ती जगतात, त्यांना जीवनात कोणतेष्टी विशिष्ट/ उदात्त ध्येय नाही. त्यामुळे त्यासाठीचे समर्पण, धडपड आदी गोष्टी त्यांच्याबाबतीत संभवताना दिसत नाहीत.

प्रस्तुत कथासंग्रहातील पुरुषपात्रांचा शोध घेता असे लक्षात येते की पराक्रम, धाडस, बुद्धिमानता, कणखरपणा, मर्दानीपणा, धीरत्व, उदात्तता आदी गुणसमुच्चयांना 'पुरुषतत्व' अथवा 'पौरुषत्व' या संकल्पनानी संबोधले जाते, ते या पात्रांच्या ठायी असलेले दिसत नाही. उदाहरणार्थ, केरू गाबते, धानू शिरनाळे (मुरगी), काका, बाबू आकाराम बोरसे (सांड), बाबू (पायातला बूट), आबा टुकरूळ (फाईव्ह गार्डन), भास्कर राणे (बगीचा), काका, बाबा (नवरा), बंडू अवदारे, दादा, नाना, तात्या (बायका खाणारी माणसे), बाकरमियाँ (पडदा), अंबादास टिपटाळेकर (पोल्ट्री फार्मिंग), ह्या सर्व पात्रांच्या ठायी कोणतेही कर्तृत्व नाही. उलटपक्षी, तथाकथित अर्थाने 'पुरुष' आणि 'पौरुषत्व' या संकल्पनेशी अपरिहार्यपणे जोडले गेलेले कोणतेही गुण त्यांच्या उक्तिकृतीतून प्रतीत होत नाहीत. त्यांचे सारे पौरुषत्व केवळ स्त्रीचा उपभोग घेणे आणि मुलांना जन्म घालणे, इतपतच मर्यादित असल्याचे दिसते. यातील कित्येक पुरुषांना तर आपली नोकरी टिकविण्याइतकीही अक्कल नाही तसेच काही पुरुषपात्रांना पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने दिलेल्या पत्नी, मुलांच्या (कुटुंबाचे) पालनपोषणाच्या जबाबदारीचेही भान नाही. त्यामुळे पत्नी -मुलांच्या मृत्यूचा कसलाही खेद त्यांना वाटत नाही. शिवाय यातील पात्रांना घरी बायको-मुले सर्व काही नीट असतानादेखील बाहेरख्याली करण्याचा नाद आहे. यातून प्रस्तुत पात्रांमध्ये मूल्यऱ्हास कसा घडून आलेला आहे. याचा प्रत्यय येतो. भाऊ पाध्ये इथे महानगरातील पात्रांच्या वर्तनातून, जीवनधारणांतून मानवी मूल्याचेच मूल्यांकन करतात.

एकूणच महानगराचा इतिहास, भूगोल यांसह सामाजिक-राजकीय- आर्थिक- सांस्कृतिक- भौतिक- मानसिक- समस्या आणि जीवनसंघर्ष यामुळे पिचलेली, नातेसंबंधामध्ये निर्माण झालेल्या दुराव्याने दुखावलेली, बुरसटलेली, खुरटलेली, विकृत, हिंसक अशी ही पात्रे आहेत.

थोडक्यात महायुद्धोत्तर काळात देव, धर्म, लग्नसंस्था, कुटुंबसंस्था आणि उदात्त मानवी मूल्ये आदी श्रद्धेय बाबींना महानगरी जगण्याच्या पेचांनी प्रश्नांकित केले. अशा महानगरी जीवनाचा उभाआडवा छेद घेण्यात भाऊ पाध्ये यांची कथा यशस्वी ठरली आहे, असे निश्चित म्हणता येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) भाऊ पाध्ये यांची कथा महानगरातील जगण्यातील ताणेबाणे मांडते या विधानाची चर्चा करा.

## ३.६ समारोप :

प्रस्तुत कथांमध्ये लग्नसंस्थेच्या मूल्यचौकटीतून निर्माण होणाऱ्या पतीपत्नी नातेसंबंधातून निकोप सहजीवन साकार होत नाही. त्यामुळेच या कथा लग्नसंस्थेविषयीच एक साशंकता निर्माण करतात. ग्रामीण जीवन आणि शहरी जीवन विशेषत: महानगरी जीवन अशी जीवनाची परस्परविरोधी सहजस्पष्ट रूपे असल्याचे दिसून येते. ग्रामीण जीवनात तुलनेने आजही लग्नसंस्था जोपासली आहे. परंतु महानगरात मात्र लग्नसंस्था दुर्लक्षित आणि सोयीचा व्यवहार ठरली आहे, त्याचाच प्रत्यय या कथा देतात.

प्रस्तुत कथांमधून आलेली सर्व कुटुंबे ही पितृसत्ताक कुटुंबे आहेत. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत कुटुंबाची सर्व सत्ता ही वडिलांकडे किंवा वडीलसदृश व्यक्तीकडे पर्यायाने पुरुषाकडे असते. साहजिकच या सर्व कथांमध्ये कुटुंबातील सर्व अधिसत्ता आणि वर्चस्व पुरुषाकडेच आहे. पण अशा प्रकारच्या कुटुंबपद्धतीत व्यवस्थेने कुटुंबाच्या पालनपोषणाची जी जबाबदारी घरातल्या पुरुषाकडे सोपविली आहे, तिचे वहन यातील कोणतेही पुरुषपात्र करताना दिसत नाही. याउलट पुरुषपात्रांच्या नाकर्तेपणामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी स्त्रीपात्रे उचलतात. त्यामुळे एकाचवेळी घरच्या व बाहेरच्या आघाडीवर लढण्याचे काम यातील बरीचशी स्त्रीपात्रे करतात. असे असूनही कुटुंबातील प्रत्येक कृतीविषयीच्या निर्णयाचे अधिकार मात्र ही पुरुषपात्रे स्वत:कडेच ठेवतात. त्या निर्णयांच्या अनुषंगाने स्वत:चे वर्चस्व अबाधित ठेवतात. परंतु जबाबदारीच्या वहनासंदर्भातील त्यांच्या नाकर्तेपणामुळे कुटुंबातील अन्य सदस्यांची विशेषत: स्त्रीपात्रांची वाताहत होते. महानगरी जीवनात व्यक्तिस्वातंत्र्याला असणारे महत्त्व लक्षात घेता ही सर्वच पात्रे एका कुटुंबात राहूनही सुटीसुटी जगतात. त्यांच्या कोणत्याच उक्तिकृतीला ते एकमेकांना बांधील मानत नाहीत. त्यांचे कुटुंबात कोणाशीच भावनिक बंधही दृढ असल्याचे दिसत नाहीत. फक्त एका कुटुंबात राहातात म्हणून ते कुटुंबीय आहेत, असे आपल्याला दिसून येते. त्यामुळे महानगरी अवकाशात वरकरणी कुटुंबसंस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येत असले तरी आतून ती पूर्णपणे विस्कळीत झाली आहे; मोडकळीस आली आहे, याचा स्पष्ट प्रत्यय या सर्वच कथांमधून येतो.

महानगरी जीवनात अपुरा पैसा, अपुरी जागा यामुळे निर्माण होणाऱ्या अभावांनी इथल्या माणसांमध्ये एक विशिष्ट प्रकारची विकृती, कोरडेपण येते. त्यावर मात करायची असेल तर पैसा अधिक मिळवायला हवा, अशी एक इच्छा त्यांच्यामध्ये निर्माण होते. परंतु अल्पशिक्षण आणि बौद्धिक, शारीर श्रमकौशल्याचाही अभाव असल्याने अधिक पैसा

मिळवण्याच्या वाटाही खूपच अरुंद असतात. अशा परिस्थितीत प्रस्तुत कथांमधील पात्रे मूल्यांना सहजतया बाजूला ठेवून 'आज'चे जगणे स्वीकारतात; तात्कालिक सुख मिळवतात. परंतु त्यांचे हे जगणे इतके नगण्य असते की त्याचे पुढे काय दुष्परिणाम होतील, याचीही त्यांना जाणीव नसते. त्यांचा एकूण मनोधर्म आणि वर्तनधर्म लक्षात घेतला तर  नीती- अनीतीच्याही पलीकडे जाऊन ती आपला जीवनव्यवहार करतात. वरच्या वर्गात त्यांची सरकण्याची असोशी आणि सरकता न येण्याची असमर्थता या द्वंद्वातून त्यांच्यात हिंसक वृत्तीही विकसित होताना दिसते. त्यामुळेच आपल्याच नात्यातल्या माणसांसोबत ही माणसे हिंसक आणि बीभत्स वर्तन करतात. साहजिकच हे वर्तनच ह्या पात्रांना अटळपणे  शोकांतिकेकडे घेऊन जाते आणि त्यातून त्यांचे होणारे मृत्यूही नगण्यच ठरतात. या संदर्भातील विदारकतेचा प्रत्यय भाऊ पाध्ये यांच्या कथांमधून येतो.

थोडक्यात, महायुद्धोत्तर काळात देव, धर्म, लग्नसंस्था, कुटुंबसंस्था, नातेसंबंध आणि उदात्त मानवी मूल्ये आदी श्रद्धेय बाबींना महानगरी जगण्याच्या  पेचांनी प्रश्नांकित केले. अशा महानगरी जीवनाचा उभाआडवा छेद घेण्यात भाऊ पाध्ये यांची कथा यशस्वी ठरली आहे, असे निश्चित म्हणता येते.

## ३.७ सरावासाठी प्रश्न

**टिपा.**

१) 'भाऊ पाध्ये यांची श्रेष्ठ कथा' या हा संपादित कथासंग्रह कोणत्या वर्षी प्रकाशित झाला?

२) 'भाऊ पाध्ये यांची श्रेष्ठ कथा' मधील आई पात्र

**एका वाक्यात उत्तरे**

१) 'भाऊ पाध्ये यांची श्रेष्ठ कथा' मधील जगण्या-मारण्याची नगण्याता

२) कोणत्या कथेत कोणत्या कथेत शेवटी माई आबांचा गळा दाबून खून करते?

३) भास्कर राणेला कोणत्या फुलांची आवड असते?

४) बंडू अवदारेच्या पत्नीचे नाव सांगा.

५) इंदिरा बाणवलीकर यांचा कोणता व्यवसाय आहे?

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) 'भाऊ पाध्ये यांची कथा महानगरी जगण्यातील ताणेबाणे मांडते' या विधानाची सांगोपांग चर्चा करा.



munotes.in

२) महानगरी जीवनातील हिंस्त्रतेचा आणि क्रूरतेचा वेध 'भाऊ पाध्ये यांची श्रेष्ठ कथा' या कथासंग्रहातून कसा घेतला आहे?

## ३.८ संदर्भ


- आजगावकर, सूर्यकांत (संपा.) : (२०१९) *महानगरी वास्तव : भारतीय कादंबऱ्यांसंदर्भात*, ललित पब्लिकेशन, मुंबई.
- गवस, राजन : (२००९) *भाऊ पाध्ये यांची कथा*, दर्या प्रकाशन, पुणे.
- गवस, राजन : (२०१५) *भारतीय साहित्याचे निर्माते: भाऊ पाध्ये*, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.
- गवस, राजन : (२००६) *भाऊ पाध्ये यांची कादंबरी*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
- चित्रे, दिलीप पुरुषोत्तम (संपा.) : (१९९५) *भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा*, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
- शिरवाडकर, वसंत (संपा.): (१९८३) : *वासुनाका / सांगोपांग* , डिंपल प्रकाशन, वसई.


❖❖❖❖

munotes.in

# ४

## काय डेंजर वारा सुटलाय
## लेखक : जयंत पवार

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टये

४ .२ प्रस्तावना

४.३ लेखकाविषयी

४.४ ' काय डेंजर वारा सुटलाय ' नाटकामागील प्रेरणा

४.५ नाटकाची पार्श्वभूमी

४.६ 'काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाचे शीर्षक

४.७ नाटकाचे कथानक

४.८ नाटकातील व्यक्तिचित्रण/ पात्रचित्रण

४.९ रचनातंत्र

८.१० नाटकातील कालावकाश

४.११ नाटकातील संवाद/ भाषाशैली

४.१२ समारोप

४.१३ सरावासाठी प्रश्न

४.१४ संदर्भ ग्रंथ

४.१५ विद्यार्थ्यांसाठी पूरक वाचन

## ४.१ उद्दिष्ट्ये

महानगरीय साहित्याचे स्वरूप विद्यार्थ्यांना समजावून देणे.

- महानगरीय समस्यांचे साहित्यातून दिसणारे प्रतिबिंब विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.
- लेखक जयंत पवार यांच्या नाटकातून समकालीन प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे.
- 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाचे कथानक, व्यक्तिचित्रण, नाटकाचे रचानातंत्र याद्वारे नाटकाची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे.

munotes.in

## ४.२ प्रस्तावना

महानगरीय साहित्यामध्ये अतिशय महत्वपूर्ण लेखन करणाऱ्यांमध्ये लेखक जयंत पवार यांचे नाव अगदी महत्वपूर्ण आहे.१९६० च्या सुमारास सर्वच स्तरातून अंसंतुष्ट अशी पिढी निर्माण होत होती. महानगरातील तुटलेपण जाणवायला लागलं होतं. त्याचे प्रतिबिंब मराठी साहित्यात विपुल प्रमाणात दिसते. मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात असाल्यामुळे या मध्यमवर्गीयांचे चित्रण बऱ्याच महानगरीय साहित्यातून दिसून येते. १९९१ मध्ये जागतिकीकरणाची सुरवात झाली आणि त्यामुळे ग्रामीण भागातून महानगराकडे धावणाऱ्या माणसांचा प्रचंड लोंढा, त्यांच्या गरजा भागवण्यासाठी महानगरीय जीवन शैलीवर होणारा परिणाम आणि त्यामुळे येथील व्यवस्थेवर पडलेला ताण! एकीकडे गगनचुंबी इमारती तर दुसरीकडे बकाल झोपडपट्ट्या एवढा विस्तृत पट दिसतो.

'काय डेंजर वारा सुटलाय ' हे जयंत पवार लिखित नाटक असून ते २०११ मध्ये ' पॉप्युलर प्रकाशना' ने प्रकाशित केले आहे. या नाटकाचा पहिला प्रयोग नाटकाची संहिता प्रकाशित होण्यापूर्वी म्हणजेच २९ जुलै २०१० रोजी झाला. हे नाटक ' महाराष्ट्र रंगभूमी' या संस्थेतर्फे ' गडकरी रंगायतन' ठाणे येथे सादर करण्यात आले आणि दिग्दर्शक अनिरुद्ध खुटवड यांनी दिग्दर्शित केले.

## ४.३ लेखकाविषयी

जयंत पवार हे एक पत्रकार, मराठी नाटककार आणि नाट्यसमीक्षक !

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने घेतलेल्या नाट्यलेखन स्पर्धेत 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकासाठी जयंत पवार यांना सर्वोत्कृष्ट लेखनाचे प्रथम पारितोषिक मिळाले. तेच नाटक नंतर निर्माते संतोष कोचरेकर यांनी कल्पना कोठारी आणि उदय कुलकर्णी यांस सहनिर्माता म्हणून घेऊन आपल्या 'महाराष्ट्र रंगभूमी'तर्फे व्यावसायिक रंगभूमीवर आणले.

२०१४ सालच्या जानेवारी महिन्यात १० ते १२ या तारखांना महाड येथे झालेल्या १५ व्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या साहित्य संमेलनाचे जयंत पवार हे अध्यक्ष होते.

जयंत पवार यांना २०१२ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहासाठी मिळाला.

**जयंत पवार यांची ग्रंथसंपदा :-**

अधांतर

काय डेंजर वारा सुटलाय

टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन (दीर्घांक)

दरवेशी (एकांकिका)

पाऊलखुणा (वंश या नाटकाचे व्यावसायिक रूप)

फिनिक्सच्या राखेतून उठला मोर (कथासंग्रह)

बहुजन संस्कृतिवाद आणि लेखक (भाषाविषयक)

माझे घर

वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा (कथासंग्रह)

वंश

शेवटच्या बीभत्साचे गाणे (दीर्घांक)

होड्या (एकांकिका)

२९ ऑगस्ट२०२१ रोजी वयाच्या अवघ्या ६१ व्या वर्षी त्यांनी जीवनाच्या रंगमंचावरून एक्झिट घेतली.

गिरणी कामगारांचे जगणे आजूबाजूला बघत असताना जयंत पवार यांच्या संवेदनशील मनाने हे सारे टिपायला सुरुवात केली होती. कौटुंबिक जबाबदारी पेलत त्यांनीशिक्षण आणि नोकरी असा संघर्षमय प्रवास सुरू केला.शिरोडकर शाळा आणि महर्षी दयानंद महाविद्यालयामध्ये त्यांनी शिक्षण घेतले. महाविद्यालयीन काळामध्ये त्यांनी लेख, कविता, एकांकिका लिहायला सुरुवात केली. त्यांच्या 'निनाद' या एकांकिका संग्रहातून अनेक कलाकारांना व्यासपीठ मिळाले..पवार यांनी गिरणीमध्ये काम करत व्यावसायिक कारकिर्दीस सुरुवात केली. लोअर परळ येथील बालपण, गिरणीमधील कामाचा अनुभव त्यांच्या साहित्यामध्ये उमटला. गिरणीमध्ये त्यांनी फार काळ नोकरी केली नाही. पदवी शिक्षण आणि पत्रकारितेचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पत्रकारिता सुरू केली. 'चंदेरी' पाक्षिक हा त्यांच्या पत्रकारितेच्या प्रवासातील पहिला टप्पा. त्यानंतर महानगर, सकाळ, लोकसत्ता दैनिकांमध्येही त्यांनी नोकरी केली. 'महाराष्ट्र टाइम्स'सोबत त्यांचा प्रवास सर्वात दीर्घ ठरला. 'मटा'मधून ते २०१८मध्ये निवृत्त झाले. 'महाराष्ट्र टाईम्स .' या वृत्तपत्रामधून ..प्रसिद्ध होणारे त्यांचे 'चौथी भिंत' हे नाट्यसमीक्षणविषयक सदर नव्या-जुन्या रंगकर्मींसाठी अभ्यासनीय होते.फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला त्यांना २०१२चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्यांच्या 'चंदूच्या लग्नाची गोष्ट' या कथेवर 'रज्जो' हा चित्रपट घडला. हा चित्रपट विश्वास पाटील यांना दिग्दर्शित केला होता. 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोंचा' यामधील कथेवरही एक चित्रपट प्रस्तावित होता. यावर काम सुरू होते.

साहित्य अकादमी, महाराष्ट्र फाऊंडेशन, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, राज्य नाट्य हौशी स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये आणि स्तरावर पवार यांनी लेखनाचा वेगळा ठसा उमटवला. आजच्या पिढीलाही पवार यांच्या एकांकिका स्पर्धांमध्ये सादर करण्याची इच्छा होते यावरून बदलत्या काळाशीही त्यांच्या लेखनाचे असणारे अतूट नाते दिसून येते.

( संदर्भ :- महाराष्ट्र टाईम्स 30 ऑगस्ट २०२१ )

## ४.४ ' काय डेंजर वारा सुटलाय ' नाटकामागील प्रेरणा:-

काय डेंजर वारा सुटलाय या नाटकाच्या लेखनामागील प्रेरणा सांगताना लेखक जयंत पवार म्हणतात ,

munotes.in

काय डेंजर वारा सुटलाय.

" हतबलता ही लेखनाची प्रेरणा होऊ शकते का ? मला माहीत नाहीं. पण ही हतबलतेची जाणीव इतकी वाढत गेली की स्वतःशीच बंड केल्याप्रमाणे ती झटकून टाकण्यासाठी कधीतरी मी लिहायला बसलो. तेहे नाटक— ' काय डेंजर वारा सुटलाय !'

नाटकाचे कथानक सरळसरळ वाटत असले तरी ते सरळसरळ नाही त्यात प्रचंड गुंतागुंत आहे. स्वतः लेखकच म्हणतो," वास्तवाचा गुंता दिसणं ही एक कदाचित माझ्या लेखनाची प्रेरणा असू शकेल...." ( पृष्ठ ९ काय डेंजर वारा सुटलाय )" "...... आणि मग लक्षात येतं खूप मोठा गुंता समोर पडलेला आहे. आपल्या आवाक्यात न येणारा.... मला तो सगळा गुंताच महत्त्वाचा वाटतो. समग्र वास्तव समजून घेणं गरजेचं वाटतं. ते पेलवणार नाही, हे तर पहिल्यापासून जाणवत असतं, पण माझी स्वतःपासून सुटका नसते. ते उरावर घेतल्याशिवाय मला चैन पडणार नसते. लेखक म्हणून माझा खूप काळ अंधारात चाचपडण्यात, धडपडण्यात, ठेचकाळण्यात जातो या सर्व काळात वास्तवाचे पदर इतके पसरत जातात की, आपल्याला काहीच कळत नाही, हेच अधिकाधिक कळत जातं. पण गोष्टी स्वतःपुरता सोप्या करण्यापेक्षा त्या स्वतःसाठी जास्तीत जास्त अवघड करून ठेवण, हीच जर माझी खोड असेल तर त्यातून माझं लेखन तरी सुटणार कसं?... ' काय डेंजर वारा सुटलाय' ही ह्या त्रासातून सुटलं नाही. " अशी या नाटकाच्या निर्मितीमागील प्रेरणा सांगितली आहे. ( पृष्ठ १० )

## ४.५ नाटकाची पार्श्वभूमी

**१९९५** च्या थोडा आधीचा काळ नाटकात दिसतो. सुप्रसिद्ध अशा गिरणी संपानंतर सुरु झालेल्या गिरण्या कोणत्या ना कोणाया कारणांमुळे पुन्हा बंद पडत होत्या किंवा गिरणी मालकांना त्यात रस उरला नसल्यामुळे गिरण्या बंद पाडल्या जात होत्या आणि त्याकाळी गिरणी कामगारांची थकित देणी देण्यासाठी गिरणीमालक गिरण्यांच्या जमिनींचा अधिकाधिक हिस्सा विकण्याची परवानगी सरकारकडे मागत होते. सरकारने देखील मुंबई शहर विकास नियंत्रण नियमावलीत( डीसी रुल ) बदल करून व्यावसायिक कारणासाठी एकूण जमिनीचा तृतियांश भाग विकायला गिरणीमालकांना परवानगी देऊन टाकली. त्यातच महत्वाची गोष्ट म्हणजे ही परवानगी देतानाच त्यात निवासी संकुलं उभी करण्याची **परवानगी दिली** गेली. आणि याच वेळी मुंबईत रिअल इस्टेटचा धंदा तेजीत सुरु झाला होता. जागांना सोन्यापेक्षाही जास्त भाव येऊ लागले होते. राजकारण, बिल्डर लॉबी उदयोजक, उदयोगपती, मुंबईत जागा बळकावण्याच्या घटना, कुंपणानेच शेत खाण्याचे प्रकार सर्रास होऊ लागले होते. लेखक जयंत पवार प्रस्तावनेत म्हणतात,".... आयुष्यात आपल्याला राहायला किमान एक साधी जागा मिळावी आणि ती टिकावी यासाठी जिवाचं रान करणारी माणसं तर मी खुद्द माझ्याच आयुष्यात पाहिली होती. त्यांच्या यातनांचा आणि तडफडाटांचा मी असहाय्य साक्षीदार होतो."( पृष्ठ ११ )

या सगळ्या पार्श्वभूमीवर आधारित लेखक जयंत पवारांनी एकांकिका लिहिली. पण तो अवकाशपट तितका व्यापक न वाटल्यामुळे त्या अस्वस्थतेतूनच त्यांनी एकांकिकेचे नाटक करायला घेतले.

## ४.६ 'काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाचे शीर्षक

काय डेंजर वारा सुटलाय " हे नाटक महानगरीय जाणीवा विस्तृत करणारे नाटक आहे. हे केवळ मुंबई मध्ये घुसणाऱ्या घुसखोरांचे नाटक नाही किंवा बेघर झालेल्या कोण्या एका दाभाडेचे नाटक नाही. हे या मुंबई शहराचे नाटक आहे. नाटकाचे शीर्षक लिहिताना कवी मनोहर ओक यांच्या ' मुंबई मुंबई मी तुझ्यातून फाटक्या भणंगासारखा निघून जाईन' या ओळींचा आधार लेखक घेताना दिसतो. r

मुंबई तू हरवून बसलीस स्वतःची सिंफनी

किती लपवून ठेवशील अंतर्वाद्य

मला शेवटच्या बिभत्साची गाणी गायचीयेत .... या नामदेव ढसाळांनी लिहिलेल्या कवितेचा संदर्भ लेखकाला जाणवू लागला. तर शाहीर अमरशेखांच्या

सुटला वादळीवारा

वल्हव जोमानं जरा

चला गाठू किनारा

या गीतातल्या वादळी वाऱ्याचा विपरित अर्थ लेखकाला जाणवू लागला आणि लेखक म्हणतो, " शाहिरांना अभिप्रेत असलेला ' क्रांतीचा वारा' आज ' भयाचा वारा' होऊन वाहत होता, जो मला एका तार्किक संगतीने अरुण कोलटकरांच्या ' डेंजर वाऱ्या' पाशी घेऊन आला." अशा रितीने नाटकाला दिलेल्या शीर्षकामागील निर्मिती प्रक्रिया दिसून येते.

## ४.७ नाटकाचे कथानक

काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाचे कथानक थोडक्यात असे सांगता येईल. या नाटकात पांढरपेशा, मध्यमवर्गीय मराठी माणसाची झालेली गळचेपी दिसून येते तसेच सर्वसामान्य गरीब माणसाची मुंबईसारख्या शहरात आपले अस्तित्त्व टिकवून ठेवण्यासाठी बिलर, उदयोगपती, अंडरवर्ल्ड आणि राजकीय शक्ती याच्या अरेरावीपुढे चाललेली केविलवाणी धडपड, त्यांचे जगण्याचे अधिकार हिरावून घेत त्यांच्यावर होणारे अन्याय अत्याचार याचे वास्तवादी चित्रण येथे दिसते..

राजकारणी, बिल्डर लॉबी , उदयोगपती आणि अंडरवर्ल्ड यांच्या भोवती हे नाटक फिरताना दिसते आणि त्यात सर्वसामान्यांची होणारी ससेहोलपट अधोरेखित होते.

जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे महानगरांचा विस्तार होऊ लागला. या महानगरातील जमीनीला प्रचंड भाव येऊ लागला आणि त्याचाच परिणाम म्हणून या महानगरांच्या केंद्रस्थानी रहाणाऱ्या मध्यमवर्गीय, पांढरपेशा कुटुंबांना तसेच कनिष्ठ वर्गीय लोकांची हाकालपट्टी करण्याचा प्रयत्न हे बिल्डर, गावगुंड करू लागल्याचे दिसते. आणि हेच जळजळीत वास्तव लेखक जयंत पवार यांनी आपल्या नाटकाच्या माध्यमातून मांडलेले आहे.

munotes.in

नाटकाचे दोन स्तर आपणास दिसतात. पहिल्या स्तरात नाटकाच्या पहिल्या अंकाची सुरवात ' बिल्डर रत्न' अवॉर्डच्या मोठ्या इन्हेंटने होते. तसेच दुसऱ्या अंकाची सुरवातही पुढे नाटक चालू ठेवण्याने आणि नाटकाचा शेवट ही ' बिल्डररत्न' पारितोषिक देण्याच्या शानदार सोहोळ्याने होतो. नाटकाच्या या दोन्ही अंकात मिळून एकूण सात इव्हेंट रंगमंचावर दृश्यमान होतात. तर दुसऱ्या स्तरात या सोहोळ्यामागील राजकारण, बिल्डर लॉबीचा दहशतवाद, त्यामागील सामाजिक वास्तवसंदर्भ प्रत्यक्षात रंगमंचावर अभिनया द्वारे दिसतत. हा इन्हेंट घडण्यामागील घटनांचे दृश्यमान होत जाणे म्हणजे ' काय डेंजर वारा सुटलाय ' हे नाटक होय. या नाटकात आतली आणि बाहेरची अशा दोन बाजू दिसतात त्यासाठी लेखकाने नाटक सादर करत असताना अनेक तंत्रे वापरली आहेत. रंगमंचावरील अवकाश पट, रंगमंचावर दाखवलेली स्क्रीन आणि निवेदन अशा विविध स्तरावर या नाटकाचा पहिला अंक दिसतो . पहिल्या प्रवेशात ' बिल्डररत्न' अवॉर्डचा इव्हेंट दाखवला आहे. हे लाईव्ह प्रसारण असते. घरोघरी चॅनेलमार्फत हे सगळ्यांपर्यंत पोहोचलेले असते. त्याचा अनुभव घरोघरचे प्रेक्षक कोणत्याही संदर्भाशिवाय घेत असतात पण त्याच वेळी या इव्हेंटला आलेले प्रेक्षागृहातील प्रेक्षक मात्र संदर्भासहीत दुहेरी अनुभव घेतांना दिसतात.

म्हणजेच घरी बसून हा सोहोळा बघणाऱ्या प्रेक्षकाला या बिल्डररत्न अवॉर्डमागील कारणमीमांसा ज्ञात नसते; पण प्रेक्षागृहात बसून हा सोहोळा बघणाऱ्या प्रेक्षकांना मात्र पडद्यावर चाललेला सोहोळा आणि निवेदक सांगत असलेले वास्तव (म्हणजेच या सोहोळ्याच्या ठिकाणासमोर असणाऱ्या गगनचुंबी इमारतीच्या उभारणी मागील दाभाड्यांची शोकांतिका) या दोघांचा दहशतीखाली असणारा अनुभव घेत असतात. लेखक औदयोगिक मुंबई चे सिमेंट कॉंक्रिटच्या जंगलात होत असणारे रुपांतर आणि त्यामागील हिंसेची, दहशतीची उकल करून सांगणारे राजकारण एकाचवेळी स्पष्ट करण्यासाठी दोन माध्यमांचा महत्वपूर्ण वापर करताना दिसतात एका बाजूला मुंबईचे झगमगाटी रुप तर दुसऱ्या बाजूला तिची तितकीच काळीकुट्ट ,कुरुपता ! ही कुरूपता रंगमंचावर दाखवण्यासाठी लेखकाने ' बिल्डररत्न हा अवॉर्ड सोहोळा स्क्रीनवर दाखवला आहे हा एक वेगळाच प्रयोग नाटकात दिसून येतो.

स्वातंत्र्योतर काळात आणीबाणी नंतर साधारण आठव्या दशकात भारतीय नागरीकांच्या वैयक्तिक आयुष्यात राजकीय हस्तक्षेप फार मोठ्या प्रमाणात झालेल्या दिसतो. जवळपास प्रत्येक नागरिकाचे सामाजिक जीवन कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे प्रभावित होऊन प्रत्येकावर त्याचा काहीना काहीतरी परिणाम होताना दिसत होता. समाजाचे हेच प्रतिबिंब नाटकात दाखवण्यासाठी नाटककार दोन परस्पर विरोधी माध्यमांचा उपयोग करतो असे दिसून येते. त्यामुळे प्रत्येक माध्यमांचे जे वैशिष्ट्य आहे त्यालाच धक्का देण्याचे काम लेखकाने केले आहे असे दिसते..

कोणाच्या अध्यात मध्यात नसलेल्या 1मध्यमवर्गीयांचे आयुष्य अतिशय शांततेत जाऊ शकेल अशी शाश्वती आता उरली नाही. परिस्थितीशरण असा मध्यमवर्गीय माणूस प्रवाहपतीत होऊ लागतो. प्रत्येक प्रवाहात त्याच्या हातून बऱ्याचश्या गोष्टी सुटतात आणि तो अधिकाधिक कणाहीन संदर्भहीन बनत जातो. हे नाटक केवळ घुसखोरांचे आणि बेघर झालेल्या एका माणसाचे नाही तर हे नाटक एखाद्या अजस्त्र अजगरासारख्या सगळ्याचं गोष्टी गिळंकृत करणाऱ्या एका महानगराचे आहे..

महानगरामधील शिवाजी पार्क येथील ४२,कुसुमकुंज या सोसायटीत साडेपाचशे स्क्वेअर फुटांत रहाणारे मध्यमवर्गीय सत्यविजय नरहरी दाभाडे त्याची पत्नी आणि त्याची दोन मुले बंटी आणि चिंगी असे हे चौकोनी कुटुंब. श्री दाभाडे सेल्फ इंडिया इन्शुरन्स कंपनीत डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून काम करत आहे नावाप्रमाणेच अगदी सरळमार्गी मध्यमवर्गीय पापभीरु पांढरपेशा असा. संपूर्ण आयुष्य आपल्या कामासाठी वाहून घेतलेले दाभाडे नोकरीच्या ठिकाणी अतिशय प्रामाणिक आणि पोटतिडिकेने काम करणारे. प्रत्येक व्यक्तीत ग्राहक शोधणारे आणि आपला इन्शुरन्सचा धंदा वाढविणारे. दाभाड्यांची पत्नी या शाळेत शिक्षिका होत्या आणि त्यांनी सध्या व्ही आर एस घेतलेली असते त्यातून येणारा रिकामेपणा त्यांच्या चिडचिडीस कारणीभूत होत असतो. मुलगा बंटी सुयोग्य, पांढरपेशाला अनुसरून अशी नोकरी न करता छोट्या पडद्यावर डेली सोप्सचे शुटींग करतो असे म्हणतो पण अद्याप त्याची एकही मालिका प्रेक्षकांसमोर आलेली दिसत नाही तसेच या कामाचा आर्थिक मोबदलाही त्याला मिळालेला नसतो. चिंगी ही कोणत्याही मध्यमवर्गीय मुलीसारखी शहाणी आणि अभ्यासात हुशार आहे. ती वीस वर्षाची असून तिला एम . बी. ए . करायचे आहे.

ऐन मोक्यावरची जागा दाभाड्यांची महत्वाची मालमत्ता आहे. दाभाड्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टी भागल्या जातात पण निवारा ही गोष्ट आपल्यापुढे प्रश्नचिन्ह घेऊन येईल असे त्यांना कधीच वाटत नाहीं. दाभाड्यांच्या घरातून समोर ब्लॉक दिसतो. दाभाडे पापभीरु, आध्यामिक तत्वचिंतक असून त्यांच्या समोरील समुद्र त्यांना एखाद्या तत्वज्ञा सारखा वाटतो. आपल्या अनेक प्रश्नांची उत्तरं देणारा असा तो वाटतो.

हा समुद्र दाभाड्यांच्या पत्नीला मात्र रात्रीच्या वेळी आयाळ विस्फारलेल्या जंगली श्वापदासारखा चाल करून येत आहे असा वाटतो. पण आयुष्याच्या एका वळणावर हाच समुद्र खरोखरच एखादया हिंस्त्र श्वापदा सारखा त्यांच्या आयुष्यात घुसतो आणि त्याचे आयुष्य बदलवून टाकतो. एका मोठ्या बिल्डरच्या एकुलत्या एक लाडावलेल्या मुलाला समुद्र दिसणारा हा ब्लॉक कोणत्याही परिस्थितीत हवाच असतो. त्यासाठी बिल्डर दाभाड्यांशी सर्वप्रथम अतिशय गोडीगुलाबीने बोलतो त्यांच्याशी तसाच वागतो पण जसजसे दाभाडे कोणत्याही प्रकारे आपला हेका सोडत नाही हे बघितल्यावर साम,दाम दंडभेद अशा सगळ्या गोष्टी बिल्डर वापरतो. दाभाड्यांसारख्यांच्या दृष्टीने प्रचंड मोठा 'दाम' देऊन ही जागा खाली करून देण ही मोठ्ठी गोष्ट असते. हा दबाव हळूहळू वाढत जातो. पण लहानपणापासून शिवाजी पार्कला चिकटून राहिलेल्या दाभाड्यांच्या मनाचा आवाज मात्र सदैव 'नाही' असाच येत असतो आणि दबावाचं रुपांतर हळूहळू दहशतीत होत. दाभाडेंच्या अर्ध्या घराचा ताबा फसवून गुंड/ बिल्डरचे लोक घेतात. आणि भाडोत्री गुंडांच्या रुपातली दहशत दाभाड्यांचे जीवन उद्ध्वस्त करून टाकते.

दाभाडेंचा फ्लॅट मुळात त्यांच्या परदेशातील काकांचा आहे. त्यांच्याकडून काही लेखी कागदपत्र त्यांनी तयार करून घेतलेले नाही. फक्त सोसायटीच्या मेंटेनन्सच्या पावत्या त्यांच्याकडे असतात, त्याही ज्या टेबलाच्या ड्रॉवरमध्ये आहेत, त्यावर घुसखोरांनी सर्व समान रचून ठेवलेले असतात. उलट काकांनी फ्लॅट विकल्याचे कागदपत्र घुसखोरांजवळ असतात. त्यामुळे आतली खोली घुसखोरांना, बाहेरची दाभाडे यांना, तर संडास बाथरूम तासांच्या हिशेबाने कॉमन अशी घराची विभागणी करून इन्स्पेक्टर निघून जातो.

बिल्डर दडपशाहीने त्यांच्या आजूबाजूचे फ्लॅट आधीच बळकावतो. त्यामुळे शेजारी दाभाड्यांना मदत करत नाही. सोसायटीचे सेक्रेटरी बाजी प्रभाकर देशपांडे त्यांच्या मदतीला येतात. ते दाभाड्यांना मुख्यमंत्र्यांकडे घेऊन जातात, तर मुख्यमंत्रीच हतबल असतात. ते म्हणतात, 'शेवटी माणसाला किती जागा लागते? साडेतीन हात. आजच्या तारखेला तुम्हाला एक रूम आणि बाथरूम या शहरात मिळत असेल तर सफिशंट आहे...विकास दर दहा टक्क्यांवर न्यायचाय..(यासाठी) दाभाडे तुम्ही मला हवे आहात.' (पृ. ५९-६०)

काय डेंजर वारा सुटलाय.

या साऱ्यांमुळे वैतागून दाभाडे आपल्या लोकशाही व्यवस्थेवरच चिडतात. ते म्हणतात, 'नष्ट करून टाका ती लोकशाही. ज्याला हवं ते करायची मुभा देते लोकशाही. गोंधळ घालते. मग त्यात सुमार लोकांना महत्त्व येतं आणि हुशार लोकांचा अपमान होतो...लोकशाहीतल्या निवडणुका म्हणजे मिडीऑक्रिटीचा धुडगूस...राज्यक्रांती झाली. मध्यमवर्गाला सत्तेत वाटा मिळाला. संपली क्रांती...गरिबांना स्वातंत्र्य नाही. गरिबांना समता नाही. गरिबांशी बंधुभाव?

शक्यच नाही. असा आप्पलपोटा मध्यमवर्ग बरोबर घेऊन जीडीपी दहा टक्के करायचाय आपल्याला?' (पृ. ६०)

छोट्या पडद्यावरील अभिनेता व्हायला निघालेला बंटी पोलिसांचा मार खाऊन चरसी आणि टोळीवाल्यांच्या जगाशी जोडला जातो. दाभाड्यांची पत्नी आपला उद्ध्वस्त संसार शोधत रहाते आणि चिंगी परदेशी जाण्याचा पलायनवाद स्विकारते.

या कथानकात एक उपकथानक देखील जोडल आहे पण ते उपकथानक त्या कथानकाशी एकजीव झालेले आहे असे वाटते. दाभाड्यांप्रमाणेच हे नाटक ' बबन **येलमामे चे आहे, त्याचप्रमाणे** नाटकात अनेक पात्रांची वेळोवेळी गाठ घालून देणाऱ्या निवेदकाचे देखील आहे. दूरचित्रवाणीवर सदैव चालत असलेल्या मालिकांमधले संवाद लिहिण्याचे काम तो करतो त्याचप्रमाणे वेगवेगळ्या सोहोळ्यांच्या कल्पना आणि संवाद लिहिण्याचे आजच्या काळात महत्वपूर्ण ठरणारे सृजनशील काम तो करतो. नाटकाची सुरवात ज्या प्रसंगाने होते त्या ' रियल इस्टेट इण्डस्ट्रीच्या ' बिल्डर रत्न' पुरस्कार वितरण सोहोळ्याचे अँकरिंग करणाऱ्या लोकांसाठी त्यानेच संवाद लिहिले असतात. वास्तविक या इव्हेंटसाठी स्क्रीप्ट लिहिणारा निवेदक या सोहोळ्याचा एक सन्माननीय पाहुणा असायला हवा असतो पण ज्या ठिकाणी कार्यक्रम घडत असतो त्या ठिकाणासमोरील गगनचुंबी इमारत बघून या ठिकाणी असलेल्या जुन्या इमारतीच्या आठवणी त्याच्या मनात उभ्या रहातात आणि त्याच्या अंगाचा तिळपापड होतो आणि हा निवेदक आपल्याला त्रासदायक ठरणार हे जाणवून रियल इस्टेटवाले संयोजक त्याला हाकलून लावतात. ' बिल्डर रत्न' सोहोळ्यामध्ये निवेदकाने च लिहिलेले स्क्रिप्ट वाचले जात असते आणि बाहेर हाच निवेदक तावातावाने कुसुमकुंजचा इतिहास उलगडत असतो. निवेदकाच्या मनात खोलवर रुतून बसलेले दाभाडे यावेळी बाहेर पडतात त्याच्या शब्दाशब्दांतून ही सगळी दहशत व्यक्त होत जाते. था कहाणी बरोबरच पाथर्डीहून आलेल्या **बबन येलमामे** याची देखील समांतर कहाणी प्रेक्षकांसमोर उलगडत जाते.. या विषय लेखक म्हणतात, " दुष्काळी प्रदेशातली स्थिती, तिथून शहरात स्थलांतर करणारी माणसं, शहरात येणारे परप्रांतातले मजूर, नाका कामगार, त्यांचं शोषण, दमन, परप्रांतातून आलेल्यांचा स्ट्रगल हे बघताना वाचताना नाटकाचा नायक दाभाडे याच्या

munotes.in

कथानकाबरोबर बबन येलमामे ह्या मराठवाडा- नगरकडच्या दुष्काळी भागातून मुंबईत जगण्यासाठी आलेल्या तरुणाचं उपकथानक आकार घेऊ लागलं. "( पृष्ठ बारा )

नाटकाचा अवकाशपट अतिशय व्यापक आहे. डंपिंग ग्राऊंडवर कचरा वेचण्याचे काम बबन करतो , त्याचप्रमाणे नॅशनल पार्क मध्ये ज्यूस विकणाऱ्या पांडे चाही तो मदतनीस म्हणून काम करतो. शिवाजी पार्क च्या स्मशान भूमीत देखील तो काम करतो . अश्या विविध अवकाशपटात वावरणारा बबन विस्थापित आणि स्थलांतर करणाऱ्या असंख्य लीकांचा प्रतिनिधी आहे. प्रत्येक क्षणाक्षणाला महानगरीय जाणीवा व्यक्त करणारा बबन एक ' नाही रे' गटातील महत्वाचा दुवा आहे. आणि या पाश्वभूमीवरच मध्यमवर्गीय, पांढरपेशा दाभाडे धास्तावलेल्या मनाने, दहशतीखाली कणाकणाने मरत असतो.

या दोन कथानकांमध्ये अनेक घटना प्रसंग घडताना दिसतात. दाभाडेंचे शेजारी, बिल्डर , पत्ता विचारण्याचे नाटक करून घरात घुसून अर्धे घर बळकावणारे बिल्डरचे गुंड, पोलीस, राजकारणी, दाभाडयांच्या समोरच एका व्यावसायिक गुंडाचा मृत्यू, दाभाड्यांच्या मुलाचे व्यसनाधिन होणे तर मुलीचे अलिप्त होऊन या लिप्ताळ्यातून स्वतःला सोडवून घेत परदेशात निघून जाणे असा व्यक्तिरेखांचा विस्तृत पट दिसतो. या सगळ्या व्यक्तिरेखा प्रत्यक्ष- अप्रायक्षपणे एकमेकांमध्ये गुंतले ल्या दिसतात. त्या वेगवेगळ्या आर्थिक, सामाजिक स्तरावर आहेत पण तरी त्या एकमेकांशी जोडल्या गेलेल्या आहेत. या सगळ्या व्यक्तीरेखांचे स्वतःभोवती तसेच समाज व्यवस्थेशी असलेले नाते, करकचून बांधले गेलेले हितसंबंध , प्राप्त परिस्थितीशी झुंजत अस्तित्व टिकवण्याची चाललेली त्यांची धडपड, मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गाची असहाय्यता , परिस्थितीमुळे निर्माण झालेली निष्क्रियता या सगळ्यांची गुंतागुंत आणि त्यातून निर्माण होणारा कधीही न भेदता येणारा चक्रव्यूह लेखक जयंत पवार यांनी प्रचंड ताकदीने रेखाटला आहे.

"….. नाकाचा विमा काढता येतो, पण श्वासाचा विमा नाही काढता येतं, दाताचा विमा काढता येतो पण नाटक फिरतानाठणक्याचा नाही काढता येत. मरणाचा विमा काढता येतो पण मणक्यात गोठणाऱ्या थंडीचा नाही काढता येतः "

सत्यविजय नरहरी दाभाडेंना येणार हे आत्मभान कोणतंही उपद्रवमूल्य नसणाऱ्या माणसांना नासाडीच्या झंझावातात उद्ध्वस्त होत जाताना कधीतरी ये तचं म्हणूनच ही गोष्ट केवळ दाभाडेंची राहत नाही, तर त्यांच्यासारख्या असंख्यांची होते. सोहोळ्याचा वृंतात सांगणारा निवेदक, दाभाडे आणि बबन येलमामे अशा वेगवेगळ्या स्तरावर हे नाटक फिरताना दिसते. दाभाडे किंवा बबन आणि प्रेक्षक यांच्यातील अंतर रंगमंचावरील पडद्याइतकेही उरणार नाही असा इशारा लेखक देताना दिसतात.

शिवाजी पार्कसारख्या प्राईम लोकेशन प्राप्त झालेल्या ठिकाणी स्वतःचं घर असलेले दाभाडे' मरताना माझे हात बांधू नका' अशी पृथ्वीराज चौहान सारखी इच्छा व्यक्त करतो, कारण पृथ्वीराज चौहानने देखील हीच इच्छा व्यक्त केली होती. जगजेत्या या राजाचे हात जाताना रिकामेच होते हे जगाला कळल पाहिजे असं दाभाडे म्हणतात त्यामागे मोठ्ठा अर्थ दडलेला आहे. सर्वकाही असूनही शेवटच्या क्षणी त्याच्या हातात काहीच उरत नाही, सगळेच त्यांची साथ सोडून निघून जातात. दाभाडें चे हातही जाताना पृथ्वीराज सारखेच रिक्त आहेत असे त्यांना सांगायचे आहे.

या संदर्भात श्रीमती मंगला आठलेकर म्हणतात, " इतिहासातल्या, पुराणातल्या घटनांचे संदर्भ थेट वर्तमानाशी जोडत ह्या साऱ्याच गोष्टी आजही माणसाच्या जगण्याचा अपरिहार्य हिस्सा कसा आहेत, हे जयंत पवार स्पष्ट करतात. " (पृष्ठ ७८ ' काय डेंजर वारा सुटलाय'... साधना दि.१२ जानेवारी २०१३)

## ४.८ नाटकातील व्यक्तिचित्रण/ पात्रचित्रण

काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकात निवेदक, बबन येलमामे आणि हवालदार ही पात्रे नाटकातील वास्तवातील आणि वर्तमानातील पात्रे आहेत ; तर सत्यविजय दाभाडे यांसह त्यांचे कुटुंब ही भूतकाळातील पात्र आहेत. दाभाडयांचे मुख्य कथानक फ्लॅश बॅक पद्धतीने अधोरेखीत होत. त्यामुळे नाटकात दोन स्तर दिसतात. एक म्हणजे भूतकाळातील सत्यविजय दाभाडे यांचे कथानक तर वर्तमानकाळातील बबन येलमामे या विस्थापिताचे दुसरे उपकथानक. हक्काचे आणि कायदेशीर घर असलेल्या दाभाडेंचा आणि हक्काचे घर मिळवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या बबन येलमामे या दोघांचा लढा समान स्तरावर येतो कारण दोघांचाही ' स्व' अस्तित्व टिकवण्याचा संघर्ष चालू आहे. सर्वसामान्य नागरिकाचे जीवन आणि त्यावर राजकारणाचा झालेला परिणाम आणि आर्थिक ध्येय धोरणे या सगळ्यांचा सर्वसामान्यांवर झालेला परिणाम आणि या सगळ्यांमुळे निर्माण होणाऱ्या संघर्षाचा अनुभव ही दोन्ही पात्रे देतात मात्र ही दोन्ही पात्रे एकाच काळातील नसूनही या संघर्षामागील दीर्घ कालावकाशाला ही दोन्ही पात्रे एकाच' ' वर्गातील' नसूनही अधोरेखीत करतात.

काय डेंजर वारा सुटलाय ' या शोकात्म अनुभूती देणाऱ्या या नाटकात सत्यविजय नरहरी दाभाडे हे पात्र मध्यवर्ती असून, त्याची पत्नी ,मुलगा बंटी , मुलगी चिंगी हे एका चौकोनी कुटुंबातील सदस्य ! याच्याभोवती नाटक फिरते. त्याचप्रमाणे शेजारी बाजी प्रभाकर देशपांडे, नाडकर्णी, गुप्ते , डॉक्टर, उद्योगपती, बिल्डर, मुख्यमंत्री, इन्स्पेक्टर, पुरुष-१ , पुरुष-२ , मुन्ना, स्त्री, हवालदार, भाई चा माणूस, निवेदक तसेच उपकथानायक बबन येलमामे ही महत्त्वाची पात्र दिसतात.

**४.८.१. सत्यविजय नरहरी दाभाडे:-** नाटकातील महत्वाचे पात्र म्हणून सत्यविजय नरहरी दाभाडे ही व्यक्तिरेखा म्हणता येईल. प्रामाणिकपणे नोकरी करणारे मध्यमवर्गीय कुटुंबवत्सल दाभाडे अशी त्यांची पूर्व ओळख सांगता येईल. पत्नी, मुलगा, मुलगी यासारख्या चौकोनी कुटुंबाचा हा कर्ता पुरुष ! सगळे सुरळीत चाललेल (?) असताना अचानक उद्ध्वस्त होणारा पापभीरु व्यक्तिमत्वाचा असा सज्जन माणूस ! अशी सुरवात होऊन आपल्याच घरात बंदिस्त होऊन बसलेला, आपल्या घराला चिकटून बसलेला आणि कणाकणाने खचत जाणारे दाभाडे अशी ही व्यक्तिरेखा आहे. नाटकाची मध्यवर्ती अशी व्यक्तिरेखा म्हणजे सत्यविजय दाभाडे. पण नावाप्रमाणे त्यांच्या बाबतीत सत्याचा विजय अजिबात होत नाही हे येथे अधोरेखित केले गेले आहे विमा कंपनीचा डेव्हलपमेंट ऑफिसर असलेला हा माणूस बोलायला अतिशय मिठ्ठास. विम्याद्वारे सगळ्यांची आयुष्य सुरक्षित करणारा हा विमा (एजंट) ऑफिसर स्वतःच आयुष्य मात्र सुरक्षित करू शकत नाही. माणसाचं आयुष्य सुरक्षित करणारी एकही पॉलीसी नाही हे सत्य त्याला एक दिवस जाणवतं. एक सुन्न करणारा अनुभव त्यांना येतो. एवढे विदारक पणे त्यांच्या सामोर येतं की ते हादरून जातात. हतबल होतात. त्यांच्याच डोळ्यासमोर मुन्ना मारला जातो. त्यावेळी त्यांच्या आतलं

काहीतरी हलतं एकदम शून्य अवस्था प्राप्त होते. ते एकदमच गप्प होऊन जातात. दाभाड्याचे संवेदनशील व्यक्तिमत्व येथे अधोरेखीत होते. माणसाच्या आयुष्यातली विसंगती, अर्थशून्यता त्यांना अस्वस्थ करते त्याचा जगण्याचा वरचा विश्वासच उडून जातो . त्याचं मूक होण म्हणजे केवळ हतबलता नसून आपल्याही मनात महत्वाचे प्रश्न त्यामुळे उपस्थित होतात. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागण्याऐवजी काही जण इतकी क्रूर कशी होतात? एखाद्याची वस्तू हिसकावून घेण्याची वृत्ती आदिम काळातही होती पण सध्याच्या कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्या च्या काळात कोणी एखादयाचे घर कसे हिसकावून घेऊ शकतो? इतके क्रौर्य येते कुठून? सुशिक्षित म्हणवल्या जाणाऱ्या समाजात एवढी हिंसा येते कुठून? दाभाडेंना वाटत, माणसाच्या उत्क्रांतीत उपयुक्त नसलेल्या गोष्टी नष्ट होतात असं डार्विननं म्हटल आहे, पण ज्याअर्थी क्रोध, हिंसा, लढाया, राग , लोभ, हेवा, मत्सर या गोष्टी आजही शिल्लक आहेत त्याअर्थी त्या उपयुक्तच असणार. जगायला मदतच करणाऱ्या असणार. आणि आपल्याला असं काही जमत नाही याचा अर्थ उत्क्रांतीच्या या वाटेवर आपण जगायला नालायक असणार !

नाटकाच्या सुरवातीला सुखी माणसाचा सदरा घातलेले असे वाटणारे सत्यविजय दाभाडे नाटकाच्या शेवटी ' मरताना माझे हात बांधू नका.' अशी इच्छा व्यक्त करतात ते विमनस्क अवस्थेत असतात म्हणून नाही तर या पृथ्वीवर मनुष्य उपरा आहे, जाताना तो काही घेऊन जाणार नाही त्यातील अपरिहार्यता समजल्यामुळे ! हीच इच्छा जगज्जेत्या पृथ्वीराज चौहानने व्यक्त केली होती हेही ते सांगतात. पृथ्वी जिंकणाऱ्या या राजाचे हात जाताना कसे रिकामे होते हे जगाला कळलं पाहिजे असं दाभाडे म्हणतात. दाभाडेंची झोळीही जाताना पृथ्वीराजसारखीच रिकामी आहे.

दाभाडे हे एक मध्यमवर्गीय, कुटुंबवत्सल, पापभीरू वृत्तीचे गृहस्थ आहे. दाभाडे यांचे दर्शनी रुप इतरांना हवेहवेसे वाटणारे आहे. ' सेफ इंडिया इन्शुरन्स कंपनी ' मध्ये डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून काम करणारे दाभाडे कोणत्याही व्यक्तिचा विमा काढण्यासाठी सदैव तत्पर असतात. किर्तनकाराच्या कुटुंबात जन्माला आलेल्या दाभाड्यांच्या आयुष्यावर झालेले संस्कार त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वा मध्ये दिसून येतात. आपण कोणाच्या अध्यात ना मध्यात असलो की आपले आयुष्य कोणतीही गुंतागुंत न होता जाते असा त्यांचा विश्वास होता पण त्यांचा तो विश्वास तुटतो आणि कोणाच्या अध्यात मध्यात नसताना त्यांचे रहाते घर केवळ सोन्याच्या भावाचे असल्यामुळे एक वादळ बनून त्यांच्या आयुष्यात येते आणि त्यांच्या आयुष्याची वाताहात होते.

विमा एजंट म्हणून काम करणाऱ्या दाभाड्यांच्या आयुष्यात प्रचंड मोठ्ठा विरोधाभास आढळतो तो म्हणजे विमा एजंट म्हणून काम करताना अनेकांना पूर्ण संरक्षण देण्याची भाषा करणाऱ्या दाभाड्यांना मात्र आपल्या आयुष्याची आणि सुरक्षिततेची हमी देता येत नाही. इतरांनी पॉलिसी घेणे किती आत्यावश्यक आहे हे सांगणाऱ्या दाभाड्यांची स्थिती त्यांनीच सांगितलेल्या गोष्टीतील विहिरीत मोडून पडलेल्या झाडाच्या फंदीच्या जाळीत अडकून पडलेल्या पात्राप्रमाणे होते. ( पृष्ठ ०८) एकीकडे दहशतीखाली जगावे की घर सोडावे असा यक्षप्रश्न दाभाड्यांना पडतो. घर सोडावे तर मुंबईसारख्या महानगरात बेघर, निराधार व्हावे लागेल ही भिती एकीकडे तर घरातच ठाम रहावे तर डोळ्यासमोर संपूर्ण कुटुंबाचे हाल

आणि शेवटी मृत्यूशिवाय पर्याय नाही अशा प्रचंड गुंतागुंतीच्या परिस्थितीत दाभाडे अडकलेले दिसतात.

**४.८.२. बबन येलमामे :-** सत्यविजय दाभाडे या मध्यवर्ती व्यक्तिरेखे बरोबर आणखी महत्वाची भूमिका म्हणजे बबन येलमामे याची दिसते. लेखक या व्यक्तीरेखे बद्दल सांगतात, " ... दुष्काळी प्रदेशातली स्थिती, तिथून शहरात स्थलांतर करणारी माणसं, शहरात येणारे परप्रांतातले मजूर, नाका कामगार, त्यांच शोषण, दमन, परप्रांतातून आलेल्यांचा स्ट्रगल हे बघताना, वाचताना नाटकाचा नायक दाभाडे याच्या कथानकाबरोबर बबन येलमामे ह्या मराठवाडा- नगरकडच्या दुष्काळी भागातून मुंबईत जगण्यासाठी आलेल्या तरुणाचं उपकथानक आकार घेऊ लागलं . ...' ( पृष्ठ बारा ' काय डेंजर वारा सुटालाय' ) याच आडनावाचा माणूस लेखकाला शिर्डीपासून आता चाळीस किलोमीटरवर असलेल्या एका दुष्काळी गावात भेटला होता आणि मग निवेदकाच्या निवेदनातून बबन येलमामे ची कहाणी उलगडत जाते. नाटकात बबन येलमामे याचे उपकथानक म्हणून येते. बबन येलमामे पहिल्या अंकात तीन तर दुसऱ्या अंकात चार अशा सात छोट्या-छोट्या दृश्यांमध्ये प्रेक्षकांसमोर येतो. हे पात्र नाटकात वर्तमानकाळातील असल्यामुळे नाटकाच्या परिपूर्तीसाठी त्याचे संभाषण नाटकाच्या सुरवातीला नाटकाच्या निवेदकाशी होतो आणि विशिष्ट प्रसंगी हवालदाराशी होताना दिसतो. बबन येलमामे ,त्याचा स्वभाव, त्याची भाषा यातून विनोद निर्मिती होत असली तरी या नाटकातील तीनही पात्रे आणि त्यांचे वेगवेगळ्या घटनांमधील संवाद हे जीवनातील गांभीर्य स्पष्ट करतात. त्यामुळे नाटकाची एकूण प्रवृती शोकात्म असल्याचे ठळक होत जाते. वेगवेगळ्या वर्गातील पात्रांचे self excistance साठी धडपडणे प्रेक्षकांच्या मनावर एक गंभीर आणि शोकात्म ताण निर्माण करतो.

बबन या नाटकातील उपकथानकाचा उपनायक म्हणून आपल्या समोर येतो. दाभाडे आणि बबन येलमामे यांच्यात एक समान सूत्र आहे ते म्हणजे विस्थापितांचे प्रश्न ! बबन वर्तमान काळातील व्यक्तिरेखा असून त्याला देखील दाभाड्यांप्रमाणेच वाताहतीला सामोरे जावे लागते. दाभाडयांना आपल्या चौकोनी सुखी कुटुंबाची दैन्यावस्था झालेली बघावयास मिळते तर बबनला आपल्या पहिल्या मुलाला गमवावे लागते . मूलभूत गरजांपैकी ' निवारा' ही गरज प्राधान्यक्रमाने दोघांच्याही आयुष्यात महत्त्वपूर्ण ठरते. आणि त्यात संपूर्ण कुटुंबाची होणारी वाताहत या नाटकाची शोकांतिका ठरते. . हे वास्तव असुरक्षिततेचा आणि भीताचा अनुभव देणारे आहे. दाभाडे यांना देखील कायद्याचे रक्षक, अर्थकारणी, भांडवलदार, राजकारणी यांनी आपल्या उबदार घरट्यात राहू देणे नाकारले आहे अणि बबन येलमामे ला देखील ! महानगरीय सत्य पचवायला कठीण आहे पण राज्यघटनेने दिलेल्या मानवाधिकारांची होणारी पायमल्ली हीच खरी या नाटकाची शोकांतिका होय.

### ४.८.३. निवेदक :-

निवेदक हे पात्र नाट्यगत वास्तवात महत्वाचे ठरते. नाटकात इव्हेंट चालू असतानाच ' तो पाहू नये ' असे आवाहन करत निवेदक रंगमंचावर प्रवेश करतो शिवाजी पार्क येथील सी फेसिंग असलेल्या ' कुसुमकुंज ' नावाच्या इमारतीत काही वर्षांपूर्वी रहाणारे हे पात्र आहे. या इमारतीत राहणाऱ्या दाभाडे नावाच्या एका फ्लॅटधारकाची वाताहत प्रत्यक्षात पाहिलेले हे पात्र आहे. पडद्यावरील इव्हेंट आणि निवेदकाने अनुभवलेले भूतकाळातील वास्तव आणि

त्यातील विरोधाभास आणि त्याच्यामागील सत्य या दोन्ही गोष्टी जोडणारा दुवा म्हणजे निवेदक होय.

सत्यविजय दाभाडे यांची झालेली वाताहत निवेदकाने प्रत्यक्ष अनुभवली आहे हे पात्र पहिल्या अंकात तीन वेळा व दुसऱ्या अंकात पाच वेळा येते. मात्र सतत कोणत्या ना कोणत्या तरी व्यक्तिरेखेबरोबर येते. ' बिल्डररत्न अवॉर्ड चा इव्हेंट आणि दाभाडे यांच्यातील परस्परसंबंध निवेदक अधोरेखीत करतो त्याचप्रमाणे त्यातील खरे खोटेपणा सातत्याने मांडत असताना निवेदक या महानगरात घडणाऱ्या अनेक गोष्टी परस्परांच्या साहचर्याने सांगून टाकतो. त्यात बिल्डर लॉबी, त्यांची राजकारण्यांची झलिली हातमिळवणी, राजकारण्यांचे नवभांडवलदारां शी असलेले साटेलोटे, त्यासाठी कोणत्याही थराला जाण्याचे क्रौर्य आणि त्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात ' भय इथले संपत नाही ' अशी झालेली अवस्था, बबन येलमामे याच्यासारख्या स्थलांतरीत, विस्थापित गटांची शोकांतिका या सगळ्यांचा समावेश होतो. बबन येलमामेच्या आयुष्यात मुंबई सारख्या महानगरात घडणाऱ्या गोष्टी निवेदक आणि बबन यांच्या संवादातूनच प्रेक्षकांना कळतात ज्या रंगमंचावर दिसत नाहीत, घडत नाहीत.

अशा या महानगरीय जाणिवा स्पष्ट अधोरेखित करणारे निवेदक हे पात्र नाटकात महात्वाची भूमिका बजावताना दिसते. हे पात्र ' बिल्डररत्न अवॉर्ड' च्या इव्हेंट चे निवेदन करणारे आहे. त्याची स्क्रिप्ट लिहिणारे आहे पण प्रत्यक्षात मात्र जसाजसा कार्यक्रम सुरु होतो तस तसा निवेदक या ' इव्हेंटच्या' विरुद्ध बोलू लागतो. कारण त्या मागील सत्य त्याला माहित आहे. दाभाड्यांची शोकांतिका त्याला माहिती आहे. विस्थापितांचे , स्थलांतरीताचे आणि ज्यांना जबरदस्तीने स्थलांतर करायला भाग पाडले त्यांचे प्रश्न त्याच्या समोर ' आ' वासून उभे आहेत. मृणन त्याला इव्हेंटमधून बाहेर काढले जाते. पण नेमके कारण अधोरेखीत होत नाही. निवेदक दोन गृहस्थांच्या शिव्या, धक्काबुक्की सहन करतो. त्यांना बोलून काही फायदा नाही म्हणून तो त्यांना काहीच बोलत नाही . ते दोघ निघून गेल्याचे दिसताच निवेदक प्रेक्षकांशी संवाद साधतो.

झगमगाटात चाललेला स्क्रीनवरील इव्हेंट आणि प्रत्यक्ष वास्तव यांच्यामधील प्रचंड दरी तो प्रेक्षकांसमोर दाखवण्याचा प्रयत्न करतो. मुंबई सारख्या महानगरात मध्यमवर्ग आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय लोकांची कशी लुबाडणूक होते, पिळवणूक होते. माणसाच्या मूलभूत गरजांपैकी निवाऱ्याची गरज कशी भागत नाही, विकासात्मक प्रकाल्यांच्या नावावर ,त्यांना मोठमोठी अमिषे दाखवून आणि तरीही त्यांनी नाही ऐकले तर येन केन प्रकारे त्यांना ऐकायला भाग पाडून किंवा साम दाम दंड भेद बळाचा वापर करून त्यांना मुंबई महानगराच्या बाहेर कसे काढले जाते हे भयाण वास्तव सत्यविजय दाभाडे या पात्राच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न करतो. बबन येलमामेबरोबरच्या संवादातून निवेदकानेविस्थापितांचे प्रश्न उपस्थित केले आहेत ; तर दाभाड्यांच्या माध्यमातून राजकारणी, उदयोजक, नवभांडवलदार आणि बिल्डर लॉबी यांचे असलेले संबंध, सर्वसामान्यांना घातक ठरणाऱ्या त्यांच्या सामाजिक कृती या सर्व गोष्टींचे दर्शन नाटकातून निवेदक घडवताना दिसतो.

निवेदक नाटकात महत्वाची भूमिका बजावताना दिसतो. निवेदकानेच या सोहोळ्याची स्क्रीप्ट लिहिली आहे, सर्वसाधारणपणे ज्या सोहोळ्याची स्क्रीप्ट लिहिणारा त्याच

सोहोळ्याविरुद्ध बोलत नाही. पण इथे मात्र निवेदक सर्व हितसंबंध टाळून उपस्थितांसमोर सत्य सांगण्याचा प्रयत्न करतो. याची परिणती कशात होऊ शकते याचाही त्याला अंदाज आहे ; पण तरीही तो ते धाडस करतो. कारण सत्य प्रेक्षकांसमोर आलेच पाहिजे. असे कितीतरी दाभाडे असतील, या प्रेक्षकामधील काही जणांवर हा प्रसंग येऊ शकतो याची दुरान्वयाने कल्पना देण्याचा प्रयत्न करतो. निवाऱ्यासारख्या मूलभूत गरजेसाठी मुंबईसारख्या महानगरात काय भयंकर प्रकार घडू शकतात याची जाणीव निवेदक प्रेक्षकांना भूतकाळातील पात्र दाभाडे आणि वर्तमानकाळातील पात्र बबन येलमामे यांच्या माध्यमातून सांगण्याचा यत्न करतो तसेच भविष्यात हे कोणासोबतही होऊ शकते याचेही सुतोवाच करतो.

नाट्यगत निवेदकाला सोहोळ्याविरुद्ध बोलताना बघून हाकलून दिले जाते. त्याला या सोहोळ्याच्या बाहेर काढणारा निघून गेल्याची खात्री पटताच निवेदक प्रेक्षकांशी बोलू लागतो. " प्लीज... प्लीज नका बघू हे. धीस इज ब्लडी हम्बग. हे सोडून काहीही बघा. डोंबाऱ्याचा खेळही याच्यापेक्षा खूप चांगला. ऐका माझं. हे काही खरं नाही. बंडलबाजी आहे. शुद्ध फसवाफसवी. आतमध्ये हेच ओरडत होतो म्हणून बाहेर काढलं त्यांनी मला. खाईन मी मार ; पण हेच सांगीन , नका बघू . " वास्तविक या सोहोळ्याचा तो एक महत्वाचा भाग आहे. आतील सत्यासत्यता त्याला ज्ञात आहे. तो या सगळ्या गोष्टी उघड करत आहे हे बघताच त्याला धक्का मारून या सोहोळ्यातून हाकलून दिले जाते.. समाजातील बुद्धीवादी वर्गाचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य सत्ताधारी कसे हिरावून घेतात ते निवेदकाच्या माध्यमातून दाखवण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसतो. सत्ताधीश नेहेमीच बलवान ठरून दुर्बलांचे कान पिळताना दिसतात. भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात नागरिकांच्या अधिकारांची पायमल्ली होण्याचा प्रकार सर्रास दिसतो आणि तत्कालिन समाजाचे तेच प्रतिबिंब नाटकात पडलेले दिसते.

प्रत्यक्ष निवेदक या सोहोळ्याच्या विरोधात बोलतो आहे यामुळे प्रेक्षकांचे औत्सुक्य चाळवले जाते. निवेदकाच्या मनातील खंत बाहेर पडते. ज्या ठिकाणी हा सोहोळा चालला आहे त्यासमोरील भला मोठा टॉवर बघून निवेदकाच्या भूतकालीन स्मृती जागृत होतात कुसुमकुंज ही इमारत आज नाही , त्या इमारतीशी निवेदकाच्या स्मृती निगडीत आहे. निवेदकाबरोबरच इतर रहिवाशांनाही कुसुमकुंज ही इमारत साम, दाम, दंड, भेद या सगळ्या गोष्टी सोसून या ना त्या मार्गाने सोडावी लागली आहे. त्यांचे हक्काचे ठिकाण त्यांच्याकडून हिरावून घेतले गेले आहे. कुसुमकुंज च्या जागी वर्तमानकाळात एक गगनचुंबी टॉवर उभा आहे ; पण त्यात मूळ ' कुसुमकुंज ' मधील एकही रहिवासी नाही . निवेदका बरोबरच इतर कुटुंबियांनाही ही इमारत सोडावी लागली हे कटू सत्य येथे अधोरेखित होते. असा कुसुमकंजच्या जागेवर उभा राहिलेला टॉवर पाहून निवेदकाला त्याच्या लहानपणीच्या आणि त्यासंलग्न असलेल्या आठवणी जागृत होतात. त्या आठवणीत दुःख, संताप आणि हतबलता आहे. दुःख अशासाठी की कुसुमकुंज मधील एकूण एक कुटुंब कोणत्या ना कोणत्या मार्गाने विस्थापित झाले आहे. संताप अशासाठी की ज्या सरकारला आपण निवडून दिले तेच सरकार, बिल्डर भांडवलदार आणि जनतेचे रक्षकच भक्षक बनले आहेत आणि हतबलता अशासाठी की आजही आपण या सत्याधिशांच्या हातातले बाहुले होऊन रहात आहोत. संविधनाने दिलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा सर्वसामान्य माणसांना काहीच उपयोग नाही.

मुंबईसारख्या महानगरात घडणारी ही गोष्ट कोणत्याही महानगरात घडू शकते. वर्षानुवर्षे स्थायिक असलेल्या रहिवाश्यांप्रमाणे कोणालाही जाण्याची वेळ येऊ शकते. मुंबईसारखे महानगर वाढत्या सामाजिक समस्यांच्या विळख्यात तुमचा मुलगाही अडकू शकतो, महानगरीय वास्तव्यात ' भय इथले संपत नाही ' या अवस्थेत तुमची मुलगी देखील अलिप्तपणे पलायनवाद स्विकारु शकते , आणि बबन येलमामे सारखे असंख्य बबन या मायानगरीच्या विळख्यात कुठे लुप्त होऊन जातील याचा भरवसा नाही अशा सगळ्या शक्यता लेखक निवेदकाच्या माध्यमातून व्यक्त करतो.

एकूणच निवेदक आपल्या रंगमंचीय वावरात भांडवलशाहीने, बिल्डर लॉबीने, राजकारणी लोकांनी विकासाचे जे मॉडेल स्वीकारले आहे त्यामध्ये सर्वसामान्यांचे जीवन कसे भरडले गेले आहे, कसे दिशाहीन झाले आहे आणि त्याच्या जिविताची शाश्वती कशी उरली नाही याचे दर्शन घडवतो. निवेदकाला दाभाड्यांचा भूतकाळ माहित आहे, कुसुमकुंज मधल्या रहिवाश्यांचे विस्थापन कसे झाले याचा इतिहास त्याला ज्ञात आहे. त्याचप्रमाणे बबन येलमामे या स्थलांतरित व्यक्तीचा वर्तमानकाळ देखील निवेदकाला माहित आहे. या दोघांमधील दुवा निवेदक असून या दोघांचे भावविश्व उलगडताना दोन स्तरांवरील समतोल त्याने साधला आहे. तो भूतकाळ आणि वर्तमानकाळ या दोघांमध्ये लिप्त आहे तसाच अलिप्त देखील आहे निवेदकाची अशी स्थिती नाटकाला एक सौंदर्य प्राप्त करून देते.

**४.८.४ इतर :-** ' काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकात उदयोजक असे एक पात्र असून ते या नाटकाचा खलनायक म्हणता येईल. प्रत्यक्ष रंगमंचावर हे पात्र येत नाही पण दाभाडे आणि त्याच्या पत्नीच्या संवादातून उदयोजक या पात्राची ओळख प्रेक्षकांना होते. हे पात्र दाभाड्यांच्या आयुष्यात येते तेव्हापासूनच दाभाड्यांच्या आयुष्याला उतरती कळा लागते. एक वेगळ्याच प्रकारचा खलनायक या नाटकाच्या निमित्याने मिळालेला दिसतो. अर्थांत त्याची देखील स्वार्थांधता दिसून येते आणि

याशिवाय भूतकालीन दाभाड्यांची पत्नी , त्यांचा मुलगा, मुलगी दाभाड्यांच्या घरात घुसलेले घुसखोर, मुन्ना, शेजारी ही पात्र देखील नाटकास सहाय्यक ठरतात.

निवेदक, दाभाडे, बबन येलमामे, हवालदार यांच्या व्यतिरिक्त ' कुसुमकुंज' मध्ये राहणारे शेजारी कुसाळकर, नाडकर्णी, बाजी प्रभाकर देशपांडे, स्त्री , पुरुष-१ , पुरुष-२ ही पात्रे परिस्थितीला शरण गेलेली दिसतात . व्यवस्थेने निर्माण केलेली ही परिस्थिती शरण प्रवृत्ती आहे. दाभाड्यांना मदत न करणारे जाणत नाहीत की जी गत आज दाभाड्यांची झाली आहे तिच उदया आपली होणार आहे. **महानगरीय परात्मता या पात्रांच्या माध्यमातून लेखकानी अचूकपणे व्यक्त केली आहे. बाजी प्रभाकर देशपांडे** नावातील विरोधाभास त्या पात्राची तत्कालिन समाजातील परिस्थितीलीन प्रवृत्ती दाखवून जाते. नाडकर्णी यांचा चिनी कानवले हा जोक अस्थानी वाटतो पण या महानगरात आपण असुरक्षित आहोत ही जाणीवच येथे अशा प्रकारे बोलणे सुचवून जाते.

स्त्री, पुरुष-१ , पुरुष-२ ही नाटकातील पात्रे वरवर बघता खालयात्रे वाटू शकतात. त्याच्या कृतीतून त्याच्या बोलण्यातून ते दाभाडयांचे शत्रू आहेत असे वाटू शकते; पण ही पात्रे राजकारणी , भांडवलदार आणि बिल्डर लॉबी यांनी आपल्या स्वार्थासाठी निर्माण केलेली आहेत. दारिद्र्यामुळे त्यांना हे कृत्य करावे लागते, वास्तविक दाभाड्यांविषयी त्यांना



munotes.in

वैयक्तिकरित्या काही राग लोभ नाही. ही पात्रे साध्य नाहीत ती साधने आहेत. तर दाभाड्यांचे शेजारी कुसाळकर, नाडकर्णी यांच्या ठिकाणी असलेली परिस्थिती शरणता ही बदलत्या समाजव्यवस्थेने निर्माण केली आहे. मराठी साहित्यात एकूणच पात्रांच्या ठिकाणी परिस्थितीशरणता दिसते पण या नाटकातील पात्रांच्या माध्यमातून परिस्थितीशरणतेचे एक वेगळेच रुप लेखक मांडतात. सर्वसाधारणपणे प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध न करता समाजभवस्थेने निर्माण केलेल्या कालबाह्य मूल्यांना सर्वसामान्य स्वभावाची माणसे शरण जातात. त्यास माणसांची परिस्थितीशरणता म्हटली जाते पण या नाटकातील परिस्थिती ही स्वतःला समाजव्यवस्थेत प्रभावी ठरवून घेतलेल्या राजकारणी लोकांनी, भाडवलदारांनी आणि बिलुर लॉबीने निर्माण केली आहे त्यामुळे सर्वसामान्य माणसाची ' भय इथले संपत नाही' अशी अवस्था झालेली दिसते. आणि अशा प्रकारे भय, असुरक्षितता, परिस्थिती शरणता निर्माण होण्याचे कारण जागतिकीकरणामुळे निर्माण होणारे बाजारीकरण, महानगरीय परात्मता , सत्तासंघर्ष आणि त्यामुळे निर्माण होणारा स्वार्थ होय.

## ४.९ रचनातंत्र

नाटकाचे रचनातंत्र एका वेगळ्याच पातळीवरचे दिसते. नाटकाचा अवकाशपट दोन स्तरांवर चालतो. एक वर्तमानकालीन अवकाशपट तर दुसरा भूतकालीन अवकाशपट ! वतमानकालीन अवकाशपटात नाटकात एक झगमगीत, रंगबिरंगी इव्हेंट चालला असून त्यात निवेदक निवेदन करीत आहे. ' बिल्डररत्न' अवॉर्ड त्या व्यक्तीला मिळणार असते ज्या व्यक्तीने या ठिकाणी पूर्वी असणाऱ्या ' कुसुमकुंज' इमारतीतील सत्यविजय दाभाडे यांच्या आयुष्याची वाताहत केलेली असते आणि आज त्याठिकाणीच हा इव्हेंट चालू असतो

नाटकाचे दोन स्तर आपणास दिसतात. पहिल्या स्तरात नाटकाच्या पहिल्या अंकाची सुरवात ' बिल्डर रत्न' अवॉर्डच्या मोठ्या इन्हेंटने होते. तसेच दुसऱ्या अंकाची सुरवातही पुढे नाटक चालू ठेवण्याने आणि नाटकाचा शेवट ही ' बिल्डररत्न' पारितोषिक देण्याच्या शानदार सोहोळ्याने होतो. नाटकाच्या या दोन्ही अंकात मिळून एकूण सात इव्हेंट रंगमंचावर दृश्यमान होतात. तर दुसऱ्या स्तरात या सोहोळ्यामागील राजकारण, बिल्डर लॉबीचा दहशतवाद, त्यामागील सामाजिक वास्तवसंदर्भ प्रत्यक्षात रंगमंचावर अभिनया द्वारे दिसतत. हा इन्हेंट घडण्यामागील घटनांचे दृश्यमान होत जाणे म्हणजे ' काय डेंजर वारा सुटलाय ' हे नाटक होय. या नाटकात आतली आणि बाहेरची अशा दोन बाजू दिसतात त्यासाठी लेखकाने नाटक सादर करत असताना अनेक तंत्रे वापरली आहेत. रंगमंचावरील अवकाश पट, रंगमंचावर दाखवलेली स्क्रीन आणि निवेदन अशा विविध स्तरावर या नाटकाचा पहिला अंक दिसतो . पहिल्या प्रवेशात ' बिल्डररत्न' अवॉर्डचा इव्हेंट दाखवला आहे. हे लाईव्ह प्रसारण असते. घरोघरी चॅनेलमार्फत हे सगळ्यांपर्यंत पोहोचलेले असते. त्याचा अनुभव घरोघरचे प्रेक्षक कोणत्याही संदर्भाशिवाय घेत असतात पण त्याच वेळी या इव्हेंटला आलेले प्रेक्षागृहातील प्रेक्षक मात्र संदर्भासहीत दुहेरी अनुभव घेतांना दिसतात.

म्हणजेच घरी बसून हा सोहोळा बघणाऱ्या प्रेक्षकाला या बिल्डररत्न अवॉर्डमागील कारणमीमांसा ज्ञात नसते; पण प्रेक्षागृहात बसून हा सोहोळा बघणाऱ्या प्रेक्षकांना मात्र पडद्यावर चाललेला सोहोळा आणि निवेदक सांगत असलेले वास्तव (म्हणजेच या सोहोळ्याच्या ठिकाणासमोर असणाऱ्या गगनचुंबी इमारतीच्या उभारणी मागील दाभाड्यांची

शोकांतिका) या दोघांचा दहशतीखाली असणारा अनुभव घेत असतात. लेखक औदयोगिक मुंबई चे सिमेंट काँक्रिटच्या जंगलात होत असणारे रुपांतर आणि त्यामागील हिंसेची, दहशतीची उकल करून सांगणारे राजकारण एकाचवेळी स्पष्ट करण्यासाठी दोन माध्यमांचा महत्वपूर्ण वापर करताना दिसतात एका बाजूला मुंबईचे झगमगाटी रुप तर दुसऱ्या बाजूला तिची तितकीच काळीकुट्ट ,कुरुपता ! ही कुरूपता रंगमंचावर दाखवण्यासाठी लेखकाने ' बिल्डररत्न हा अवॉर्ड सोहोळा स्क्रीनवर दाखवला आहे हा एक वेगळाच प्रयोग नाटकात दिसून येतो.

या नाटकात एकमेकांना समांतर अशा घटना अभिनयाच्या माध्यमातून दाखवल्या जात असल्याने नाटकात **स्थलावकाश** देखील महत्वाचा ठरतो. 'कुसुमकुंज' मधील दाभाडे आणि त्याचे शेजारी आणि बबन येलमामे यांच्याशी संबंधित घटनांची दोन वेगवेगळी स्थळे आहेत. ती म्हणजे दाभाड्यांचे 'कुसुमाकुंज ' मधील घर आणि रंगमंचावरील मोकळा स्थलावकाश ही आहेत. त्याचप्रमाणे रस्ता , शिवाजी पार्कचा कट्टा , या ठिकाणीही काही गोष्टी घडतात. बदलत्या राजकारणाचे प्रतीक असलेले **गृहस्थ हे** गृहस्थ दाभाडयांना जिथे भेटतात ती हॉटेलमधली खोली आहे असे स्थलावकाशात दिसते. डॉक्टरांची केबिन आणि मुख्यमंत्र्यांची केबिन या स्थळांचा उल्लेख महत्त्वपूर्ण आहे कारण या ठिकाणीच दाभाड्यांची होणारी वाताहत प्रेक्षकांच्या लक्षात येऊ लागते आणि नाटकाचे चित्र स्पष्ट होऊ लागते . दाभाड्यांबरोबरच प्रेक्षकांचीदेखील हतबलता वाढू लागते. एक आरोग्याचा रक्षक एक कायद्याचा रक्षक दोन्ही सर्वसामान्यांचे भक्षक झालेले लेखकाने अतिशय समर्पकपणे अधोरेखित केले आहे. डॉक्टरांची केबिन या स्थलावकाशात घडणारे नाट्य डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील परस्परसंबंध किती परात्म होत गेले आहेत याची साक्ष देतात. ' फॅमिली डॉक्टर' ही संकल्पनाच हळू हळू नष्ट होत जाईल याचे सूतोवाचच लेखकाने त्याकाळीच करून ठेवलेले दिसते. जागतिकीकरणाचा आरोग्यव्यवस्थेवर होणारा परिणाम, डॉक्टर आणि रुग्ण यांचे सौहार्दपूर्ण संबंध न रहाणे, कार्पोरेट आरोग्य सेवा आणि या नात्यांमध्ये आलेली अलिप्तता या सगळ्या गोष्टी येथे कमालीच्या नेमकेपणाने अधोरेखीत होताना दिसतात. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यामधील आपुलकीचे भावबंध संपुष्टात आले आहे आणि त्याजागी केवळ व्यावहारीक संबंध उरले आहे हे डॉक्टरांची केबिन दर्शविते.

मुख्यमंत्र्यांची केबिन हा स्थलावकाश राजकारणी लोकांची स्वार्थांधता अधोरेखीत करते. सर्वसामान्यांच्या जीवावर आपण सत्तेवर आलोत त्या लोकांच्याच प्रश्नाला बाजूला सारले जाते आणि आपला स्वार्थसाधणारा वर्ग याच्याकडेच मुख्यमंत्री जास्त लक्ष देत आहेत असे दिसते. बिल्डर लॉबी चे पाठबळ, भांडवलशाहीचा उदय आणि त्याला पोषक असे सत्ताराजकारण खेळणारे राजकारणी या सगळ्यांचा परिपोष या मुख्यमंत्र्यांच्या केबिनमध्ये झालेला दिसतो. त्यामुळे हे स्थळ राजकारणी आणि सर्वसामान्य जनता यांच्यामधील सर्वच बाबतीतील अंतर अधोरेखीत करते. बबन येलमामे याचे अस्तित्त्व रस्ता या कालावकाशात घडते. आणि ते बरोबरच आहे. ग्रामीण भागातून रोजगाराच्या ओढीने आणि अस्तित्त्व टिकवण्याच्या संघर्षात महानगरात आलेला बबन रस्त्यावर असणे हे संयुक्तिकच आहे कारण मुंबईसारख्या महानगरात स्थलांतरित होऊ पाहणाऱ्या बबनची अस्थिरता, त्याचे उपरेपण, त्याचा असित्वाविषयी चा लढा त्यातून दृष्टोत्पतीस पडतो. तसेच झोपडपट्टी, पोलीस स्टेशन, स्मशान, पार्कच्या बाहेर रस विकायला बसणे या सगळ्या स्थळांचा उल्लेख त्याच्या सद्य:स्थितीवर प्रकाश टाकणारा आहे. प्राईम लोकेशन पाहून

इतरांचा रहाण्याचा मूलभूत हक्क हिरावून घेणारी बिल्डर लॉबी आणि त्यांना पाठीशी घालणारे कायद्याचे रक्षण आणि राजकारणी यांची युती ; यामुळे दाभड्यांसाख्यांच्या आयुष्यात येणारा महानगरीय उपरेपणा आणि बबनच्या आयुष्यात येणारा महानगरीय उपरेपणा लेखकाने अतिशय तीव्रतेने रेखाटला आहे .महानगरीय जीवनातील तुटलेपण याठिकाणी अधोरेखित झालेले असल्यामुळे नाट्य स्थलावकाशाचे हे कार्य महत्वपूर्ण ठरते.

## ८.१० नाटकातील कालावकाश

नाटक आणि नाटकात रेखाटलेला काळ यामधील संबंध व्यामिश्र असतात. त्यात भरपूर गुंतागुंत असते. तो बहुविध आणि बहुस्तरीय असतो . प्रत्येक कथानकातून विशिष्ठ काळ अधोरेखित होत असतो प्रत्येक घटनांना आणि प्रसंगांना काळाचे परिमाण असते. ' काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकात नाटकातील काळाचे विभाजन राजीव नाईक यांनीसांगितल्याप्रमाणे ' संभाषण काळ व कथानक काळ' असल्याच दिसते. दाभाडे या मुख्य कथानायकाच्या जीवनातील वास्तवाचे आणि बबन येलमामे या उपकथानायकाच्या जीवनातील वास्तवाचे व एकूण बदलत्या वास्तवातील प्रश्नांचे दर्शन घडवण्यासाठी दाभाडे आणि बबन या पात्रांच्या कथाविषयाच्या दृष्टीने समांतरपणे घडणाऱ्या घटना कल्पिल्या आहेत. दाभाडेंच्या जीवनातील कथानक काळ हा प्लॅशबॅक ने उलगडत जातो. तर निवेदक, हवालदार, बबन यांच्या संभाषणाचा काळ हा वर्तमान काळातील आहे. दाभाडे यांच्या घटनामध्ये एक क्रोनॉलॉजिकल ऑर्डर दिसते तसेच त्याला एक ऐतिहासिक परिमाण देखील लाभले आहे असे दिसते. स्क्रीनवरील दृश्य घटनामधून काळाचे परिमाण याच पद्धतीने दिसते. ' बिलररत्न ' अवॉर्ड दरवर्षी वेगवेगळ्या बिल्डरला देणे यामधून देखील काळाची गतीशीलता दिसून येते.

munotes.in

नाटकाचा कालावकाश पाच वर्षांचा असावा असे अनुमान काढता येते. कारण स्क्रिनवरील दृश्यांमधून बिल्डररत्न अवॉर्ड सतत पाच जणांना दिले गेले आहे. यावरून दाभाड्यांचा प्रत्यक्ष संघर्षाचा कालावकाश पाच वर्षाचा मानावा लागेल. तसेच त्यांना मानसोपचार तज्ज्ञाची देखील आवश्यकता लागते त्यावरूनही दाभाड्यांचे मानसिक संतुलन बिघडण्याचा कालावधी निश्चितच बराच प्रदीर्ध आहे यावरूनही दाभाड्यांचा संघर्षकाल (कथानक काल) बराच मोठा आहे असे दिसते. याच कालाच्या मोजपट्टीनुसार बबन येलमामेचा महानगरातील संघर्षकाळ साधारण तीन - साडेतीन वर्षाचा असावा असे दिसते. या दोघांच्या संघर्षाच्या काळाची ही गुंतागुंतीची गुंफण नाटकाचे कलात्म मूल्य आणि सौंदर्यमूल्य वाढवताना दिसते. अर्थात या दोन पात्रांच्या संघर्षकाळाचे अंतिम परिणाम शोकात्म असून त्यात विरोधलय तत्व दिसून येते. तसेच दाभाड्यांचे मुख्य कथानक आणि बबनचे उपकथानक यामधील वृत्तीमधील वेगळेपणा देखील येथे महत्त्वपूर्ण ठरतो.

## ४.११ नाटकातील संवाद/ भाषाशैली

जयंत पवार यांची भाषाशैली मुळातच भेदक आणि उपरोधिक आहे अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी प्रसंगी रस्त्यावर उतरणारा आणि सामाजिक राजकीय 'प्रश्नांवर निर्भयपणे भूमिका घेणारा लेखक अशीच त्यांची मराठी साहित्य विश्वास ओळख आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच चे खूप मोठा भोक्ते होते असे म्हणता येईल. सामाजिक आणि राजकीय

परिस्थितीचे भान ठेवून अन्याय्य घटनावर आपल्या नाटकातून त्यांनी संवादाच्या माध्यमातून प्रकाश टाकलेला दिसतो. ' काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकात त्यांनी वापरलेली भाषा समाजातील प्रत्येक स्तराचे प्रतिनिधित्व करते त्यामुळेच प्रदेश- भाषेच्या सीमा ओलांडून त्यांच्या नाटकातील आशय सर्वांच्या मनापर्यंत जाऊन पोहोचला. त्यांच्या नाटकामधून आजूबाजूला घडणाऱ्या घटनांबद्दल सूक्ष्म चिंतन आणि तात्विक बैठक असून त्यांच्या नाटकाचा विषय वैश्विक आहे. कालातीत आहे त्यामुळेच त्याचे विविध स्वरूपातून, शैलीतून आलेले लेखन प्रेक्षकांच्या मनापर्यंत पोहोचते. (संदर्भ दै. लोकसत्ता , 30 ऑगस्ट २०२१)

दाभाडे यांची साधी सोज्ज्वळ पांढरपेशी मध्यमवर्गीय व्यक्तीला साजेशी भाषा, निवेदकाची सोफिस्टीकेटेड पॉलिश्ड भाषा, बबन येलमामे ची ग्रामीण ढंगाची भाषा, शेजाऱ्यांची त्यांच्या त्यांच्या वयानुसार, व्यवसायानुसार, सामाजिक स्तरानुसार भाषा, गृहस्थाची टिपिकल व्यावसायिक गुज्जु भाषा या सगळ्यांचा मनोहरी संगम या नाटकात झाला आहे असे असले तरी शेवटी दाभाड्यांची मनोविकारता आणि गुंडांची भाषा यामुळे संपूर्ण नाटकाला एक शोकात्म अनुभूती येते ती वैशिपठ्यपूर्ण भाषा वापराल्यानेच !

नाटकात त्या त्या प्रसंगाला समर्पक काव्य लेखकाने मांडले आहे त्या भाषिक रचनेमुळे देखील नाटकाचा शोकात्म परिणाम आणखीनच गडद होण्यास मदत होते.

**नाटकाची भाषाशैली :-**

या नाटकात जागतिकीकरणानंतरच्या व्यवस्थेचे बारकावे आयंत नेटकेपणाने रेखाटले आहेत कधीकधी प्रमाणभाषा सोडून नाटकातील पात्रे आणि नाटकाची भाषा कमीअधिक तीव्रतेने नाटकाची गती वाढवताना दिसते. दाभाडेंची आणि त्यांच्या पत्नीची मध्यमवर्गीय पांढरपेशा पापभीरु आणि वांझोटा संताप दाखवणारी भाषा नाटकाचे वैशिष्टय ठरावे. बबन येलमामे या पात्राची भाषा अत्यंत जीवंत असून त्याचे ग्रामीण हेल युक्त भाषा नंतर मुंबई ची बंबय्या हिंदी मिश्रीत मराठी भाषा, मराठीच पण खालच्या स्तरातील भाषा शैली एक वैशिष्ठय दिसते.

**आपली प्रगती तपासा “**

१) एक महानगरीय संस्कृती म्हणून ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकाचे मूल्यमापन करा?

## ४.१२ समारोप

राजकारणी उदयोजक आणि बिल्डर यांचे असलेले घनिष्ठ संबंध त्यांची एकप्रकारची अभद्र युती, सर्वसामान्यांचे संविधानिक हक्क त्यांना न मिळणे, त्यांना दाखवली जाणारी खोटी सहानुभूती या गोष्टींचे दर्शन ' काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकातून घडते.

'काय डेंजर वारा सुटलाय ' नाटकाची भाववृत्ती शोकात्म आहे असे दिसते. नाटकातून प्रकटणारा नाटयार्थ बघितला तर नाटककाराची सामाजिक बांधिलकी या नाटकातून दिसते. जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात नाटकाचे स्थान पाहाता नाटकात समकालीन प्रश्न

रेखाटले आहेत. कनिष्ठ व मध्यमवर्गीयांच्या जागेच्या प्रश्नांविषयी लेखकाने फार मोठा विचार केला आहे. साधारण ८० च्या दशकात सर्वसामान्य नागरिकांचे हक्क संकोच होऊ लागले होते. मानवी हक्कांचा जाहीरनामा ' ही केवळ अभ्यासापुरती असणारी गोष्ट झाली होती. कोणालाही मानवी हक्कांपासून वंचित व्हावे लागेल याची शाश्वती उरली नाहीं. त्यामुळे कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार प्रत्यक्षात घडत होता  प्रत्यक्षात संविधानात्मक संरक्षण ज्यांनी द्यायला पाहिजे ते सरकारच बिल्डर, नवभांडवलदार यांच्याशी संगनमत करून सर्वसामान्यांना किड्यामुंग्या प्रमाणे वागवू लागले होते. त्यामुळे ' कुसुमकुंज' मधील सत्यविजय दाभाडे यांची जी अवस्था झाली तशी तुमची आमची कोणाचीही सध्याच्या काळात किंवा भविष्यात घडू शकेल , असा सतर्कतेचा इशारा नाटकादवारे देण्यात नाटककार जयंत पवार यशस्वी झाले आहेत.

## ४.१३ सरावासाठी प्रश्न

१. ' महानगरीय जाणीवा व्यक्त करणारे नाटक म्हणून ' काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाचे परीक्षण करा.

२. "विस्थापन आणि स्थलांतर या जागतिकीकरणोत्तर जगाच्या अविभाज्य ठरत असलेल्या गोष्टींच्या गाभ्याशी हे नाटक आपल्याला नेऊन ठेवत." या विधानाची ' काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाच्या संदर्भात चर्चा करा.

३. "समकालाच लख्ख भान ठेवत, त्यातील व्यामिश्रतेला कवेत घेण्यासाठी रुपबंधाचे प्रयोग करत एका निर्दयी व्यवस्थेचं विक्राळ रूप समोर ठेवणारं हे नाटक आहे." —- हे विधान 'काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाच्या संदर्भात स्पष्ट करा.

४. एक महनगरीय साहित्यकृती म्हणून "काय डेंजर वारा सुटलाय "या नाटकाचे मुल्यमापन करा.

५. महानगरीय जीवन चित्रण यात कालपरत्वे घडत गेलेले बदल  ' काय डेंजर वारा सुटलाय ' या नाटकाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१. ' डेंजर वारा सुटलाय ' नाटकाचे कथानक

२.'काय डेंजर वारा सुटलाय ' नाटकाच्या निर्मितीमागील प्रेरणा

३.' काय डेंजर वारा सुटलाय ' नाटकातील निवेदक

४. 'काय डेंजर वारा सुटलाय ' मधील स्थल-कालावकाश

५.'काय डेंजर वारा सुटलाय ' रचनातंत्र

munotes.in

## ४.१४ संदर्भ ग्रंथ

१. ' काय डेंजर वारा सुटलाय ' - जयंत पवार- पॉप्युलर प्रकाशन ( दु. आ. २०१९ )

२. विकिपिडीया

३. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य:- डॉ. गीता मांजरेकर

४.https://www.academia.edu/3615901/Globalisation_and_Terror_Underworld_Appreciation_of_Marathi_Play_Kay_Danger_Wara_Sutlay_Marathi_

५.https://www.weeklysadhana.in/view_article/maharashtra-foundation-awards-mangala-aathlekar-on-play-kay-danger-vara-sutlay-by-jayant-pawar

६. https://maharashtratimes.com/drama/-/articleshow/6384459.cms?minitv=true

## ४.१५ विद्यार्थ्यांसाठी पूरक वाचन

१ . https://youtu.be/fnBumnjcCWo

https://www.bytesofindia.com/newsdetails?NewsId=5313990233594108780&title=Kay%20Danger%20Wara%20Sutlay&SectionId=1002&SectionName=Be%20Positive&TagName=%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%AF%20%E0%A4%A1%E0%A5%87%E0%A4%82%E0%A4%9C%E0%A4%B0%20%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%BE%20%E0%A4%B8%E0%A5%81%E0%A4%9F%E0%A4%B2%E0%A4%BE%E0%A4%AF

२. महानगरी नाटक :- कमलाकर नाडकर्णी - अक्षर प्रकाशन

❖❖❖❖